अंकुश पिसाळ - वाई, डॉ. हेमलता जोहरापूरकर - नागपूर. द. तु. नंदापुरे - यवतमाळ, सुरेंद्र देवस्थळी,डॉ.श्रीकांत गोखले-मुंबई, म. श्री. देशपांडे-नासिक, साक्षी वाणी-रत्नागिरी, वैशाली कुऱ्हेकर, म. अ. खांडवे, राजेश तायडे-अमरावती, प्रणिता बनसोडे, प्रतिक्षा बनसोडे, अदिब रफिक, जुबेर अयूब, भगवान बनसोडे, रफिक सत्तर-कंधार, संजय कुलकर्णी-नगर.

**प्रायोजक**

**श्री राजू जगदीशचंद्र मेहता**, मे.हिराचंद नानचंद अँड कंपनी, मालेगाव, जि.नाशिक.


## विज्ञान प्रयोग

| | | |
|---|---|---|
| वैज्ञानिक खेळणी | डी. एस्. इटोकर | ५० |
| छंदातून विज्ञान | डी. एस्. इटोकर | ६० |
| फक्त खेळण्यांसाठी | डी. एस्. इटोकर | ७० |
| **(राज्य पुरस्कार २०००-०१)** | | |
| खेळणीच खेळणी | डी. एस्. इटोकर | ६० |
| **(राज्य पुरस्कार २००४)** | | |
| विज्ञान गमती | | |
| **(राज्य पुरस्कार ९४-९५)** | डॉ. अरुण मांडे | ५० |
| विज्ञान जमती | | |
| **(राज्य पुरस्कार ९४-९५)** | डॉ. अरुण मांडे | ६० |




मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.    पोस्टेज खर्च वेगळा





◆ ऑगस्ट २००७
◆ वर्ष सातवे
◆ अंक आठवा


# मेहता मराठी ग्रंथजगत


संपादक : सुनील मेहता

कार्यकारी संपादक : शंकर सारडा

संपादन सहाय्य : अनिरुद्ध पाटील, शिल्पा कुलकर्णी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | १० |
| **पुस्तक परिचय** | |
| **प्रे (सावज)** : अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३६ |
| **सेक्स वर्कर** : अनु. सुप्रिया वकील | ४८ |
| **द लास्ट फ्रन्टियर** : अनु. अशोक पाध्ये | ५५ |
| **सुंदर मन** : अनु. सुभाष जोशी | ६२ |
| **फॉर हिअर, ऑर टू गो?** : अपर्णा वेलणकर | ६९ |
| **डिझाईन युअर करिअर** : श्रीनिवास पंडित | ७७ |
| **अंतराळवीर सुनीता विल्यम्स** : अनु. चित्रा वाळिंबे | ८४ |
| **साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे | ९० |
| **पुरस्कार** | ९७ |
| **श्रद्धांजली** | १०१ |
| **बालनगरी** | १०२ |



मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-२४४७५४६२
**Email - info@mehtapublishinghouse.com**
**Website - www.mehtapublishinghouse.com**


**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**



*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

# इयान फ्लेमिंगची जन्मशताब्दी



'००७ जेम्स बाँड' ही व्यक्तिरेखा आज जगभर रसिक वाचकांना ज्ञात आहे. तिचा जन्मदाता 'इयान फ्लेमिंग' याची जन्मशताब्दी २८ मे २००८ पर्यंत साजरी होणार आहे.

या जन्मशताब्दीच्या निमित्ताने एक अभिनव उपक्रम राबवला जाणार आहे. तो म्हणजे जेम्स बाँडवरील नवीन कादंबरीच्या प्रकाशनाचा. आता तुम्ही म्हणाल,यात अभिनव ते काय? त्याचीच कादंबरी तर प्रकाशित होणार! या नव्या कादंबरीची अपूर्वाई ती काय? आता, इयान फ्लेमिंगचे देहावसान होऊन चार दशकांपेक्षा जास्त काळ उलटून गेला आहे. त्याच्या हयातीत त्याच्या १२ कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. त्याच्या मृत्यूनंतर **'दि मॅन वुईथ दि गोल्डन गन'** ही १३ वी कादंबरी प्रकाशित झाली. ती त्याच्या टिपणावरून व्यवस्थित संपादित करून प्रकाशकांनी बाजारात आणली. त्यानंतर १९६६ मध्ये **'ऑक्टोपसी अँड द लिव्हिंग डिलाइट्स'** हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यामुळे आता पुढील वर्षी प्रसिद्ध होणारी कादंबरी ही जेम्स बाँड या गुप्तहेर नायकाची असली तरी ती स्वत: इयान फ्लेमिंगने लिहिलेली नाही; तर ब्रिटिश लेखक 'सेबॅस्टिअन फॉल्क्स' याने लिहिलेली असणार आहे. एका कादंबरीकाराच्या जन्मशताब्दीला त्याच्या लोकप्रिय नायकाला केंद्रस्थानी ठेवून एका नव्या कादंबरीचे प्रकाशन करून श्रद्धांजली वाहणे ही गोष्ट म्हणूनच अभिनव ठरते.

या नव्या कादंबरीचे नाव असणार आहे- **'डेव्हिल मे केअर'.**

इयान फ्लेमिंग इस्टेटद्वारे फाल्क्सकडे ही कादंबरी लिहिण्याचे काम सोपविण्यात आले आहे. १९५२ ते १९६४ या बारा वर्षाचा काळात इयान प्लेमिंगने जेम्स बाँड या विलक्षण गुप्तहेराच्या अफलातून पराक्रमाच्या १२ कादंबऱ्या लिहिल्या.आरंभी



त्याकडे वाचकांचे फारसे लक्ष गेले नाही. परंतु एकेक नवी कादंबरी प्रसिद्ध होऊ लागली तसतसे जुन्या पुस्तकांनाही मागणी वाढू लागली. १९६२मध्ये 'डॉ.नो' हा चित्रपट आला आणि जेम्स बाँड या व्यक्तिरेखेने जगभरच्या प्रेक्षकांना अनोखा आनंद दिला. एक बेदरकार, धाडसी, नवीन तंत्रज्ञानाने आणि युद्धसाधनांनी सज्ज, खाण्यापिण्याचा आस्वाद घेणारा, मदिराक्षींना सहज गटवणारा, बुद्धिमान हरहुन्नरी ब्रिटिश गुप्तहेर या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांना दिसला. आणि ह्या नव्या हीरोची सगळ्यांनाच भुरळ पडली. पराक्रमी पुरुषत्वाचा मूर्तिमंत आदर्श त्याच्या रुपाने समोर दिसला. दुर्दैवाने १९६४ मध्येच इयान फ्लेमिंगचे निधन झाले. नव्या कादंबऱ्यांचे लेखन थांबले. परंतु त्याच्या कादंबऱ्यांच्या आवृत्त्यावर आवृत्त्या निघत राहिल्या.त्याच्या कादंबऱ्यांवरचे चित्रपट लक्षावधी डॉलर्सची कमाई करू लागले. त्याच्या कादंबऱ्यांचे अनुवाद वेगवेगळ्या भाषांमध्ये होऊ लागले. आणि त्याच्या पुस्तकांचे व चित्रपटांचे हक्क असणाऱ्या फ्लेमिंग इस्टेटची आर्थिक आवक सतत वाढत राहिली. त्याच्या पुस्तकांच्या ४ कोटीवर प्रती खपल्याचा व तो एक उच्चांक असल्याचा दावा केला जातो.

इयान फ्लेमिंग हा ब्रिटनच्या सँढर्स्ट रॉयल मिलिटरी अ‍ॅकॅडमीत प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर परराष्ट्र खात्यात काम करायचे मनोरथ रचत होता. परंतु त्याला ती संधी मिळाली नाही. तेव्हा रॉयटर्स न्यूज एजन्सीत प्रवेश मिळवून तो परदेशातील वार्तांकन करू लागला. दुसऱ्या महायुद्धात त्याच्या या विविध देशातील वार्ताहरकीचा लाभ घेण्यासाठी त्याला नौदलाच्या गुप्तचर खात्यात घेण्यात आले आणि त्या खात्याच्या डायरेक्टरचा स्वीय सचिव म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली. त्याच्या कादंबऱ्यात 'एम' ही व्यक्तिरेखा येते, ती त्याच्या बॉसवरच बेतलेली आहे. युद्धाच्या त्या धामधुमीत ब्रिटिश हेरखात्याची कार्यपद्धती त्याला जवळून जाणून घेणे शक्य झाले. त्याला कमांडरपदी नेमण्यात आले. महायुद्ध संपल्यावर इयान फ्लेमिंग हा किम्सली न्यूजपेपर्स या वृत्तसंस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय व्यवस्थापक म्हणून काम करू लागला. याच काळात त्याने जमैकामध्ये जमीन घेऊन समुद्रकाठी स्वत:ची वास्तू उभारली. वर्षातून दोन महिने तो या वास्तत राहात असे.

१९५२ साली त्याने जेम्स बाँड या गुप्तहेराला केंद्रवर्ती ठेवून गुप्तहेरकथा लिहिण्याचा निर्णय घेतला. जमैकामधील सुटीचा विनियोग त्याने कॅसिनो रॉयल ही थरारकथा लिहिण्यासाठी केला. नंतर दरवर्षीच्या रजेच्या काळात एकेक कादंबरी लिहिण्याचा क्रम जारी राहिला. डॉ.नो या चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर(१९६२)जेम्स बाँडचा खरा गाजावाजा सुरू झाला. परंतु त्याच्या तब्येतीच्या तक्रारी त्याचवेळी वाढू लागल्या आणि दोन वर्षांनी त्याने जगाचा निरोपच घेतला. युद्धकाळातील ब्रिटिश गुप्तहेरखात्यातील अनुभवांचा, निरीक्षणांचा आणि कार्यपद्धतीचा अत्यंत साक्षेपी वापर करून इयान फ्लेमिंगने आपल्या थरारकथा लिहिल्या. त्या रहस्यपूर्ण

आणि नाट्यपूर्ण होत्याच; मानवी स्वभावाचे, मानवी क्रौर्याचे विस्मयकारक नमुनेही पेश करणाऱ्या होत्या. आणि त्यावेळच्या अत्यंत महत्त्वाच्या घटनांच्या अनुषंगाने कथावस्तूंची उभारणी केल्यामुळे, तसेच त्याबद्दलचे चौफेर तपशील दिल्यामुळे वाचकांपुढे एक नवे विश्वच उलगडत आहे, असे जाणवले. गोल्ड फिंगरमध्ये आंतरराष्ट्रीय सोन्याचा चोरट्या आयातीचा एकूण व्यवसाय कसा चालतो आणि अमेरिकेतील फोर्ट नॉक्स येथे सोन्याचा प्रचंड साठा कडेकोट बंदोबस्तात कसा ठेवला जाता, याचे जे तपशील येतात तेही थक्क करतात.

ब्रिटन,रशिया आणि अमेरिका यातील गुप्तचर यंत्रणांच्या कार्यशैलीतील बारकावे 'फ्रॉम रशिया वुईथ लव्ह' सारख्या कादंबऱ्यात वाचताना एका गुंतागुंतीच्या जगातून आपला फेरफटका लागला आहे याची खात्री पटते. साध्या घटनांमागेही आंतरराष्ट्रीय कटकारस्थाने दडलेली असतात. त्या घटनांमुळेही जागतिक शांतता व सुव्यवस्था धोक्यात येऊ शकते याची जाणीव होऊन मन धास्तावते.. तशातच पंचतारांकित हॉटेल्समधील आलिशान वास्तव्य, उंची मद्यांचा आणि रुचकर खाद्यपदार्थांचा मनसोक्त चोखंदळ आस्वाद, सहज फिदा होणाऱ्या सौंदर्याचा अॅटमबॉम्ब असणाऱ्या लावण्यलतिका हा सगळा मालमसाला वाचकांना आणि प्रेक्षकांना स्वप्नरंजनासाठीही भरपूर चेतना देणारा. त्यामुळे बॉँडच्या पुरुषार्थाचे आणि पौरुषाचे कौतुक अपरंपार वाटले तर नवल ते काय?

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या शीतयुद्धाच्या काळात या कादंबरीची रशियात खळबळ उडवली. जेम्सबाँडला प्रतिस्पर्धी गुप्तहेर तयार करण्याचा प्रयत्नही रशियात झाला. जेम्स बाँडवर मात करणारी कथानके रचण्यात आली.

जेम्स बाँडच्या मृत्यूनंतरही त्याच्या कादंबऱ्यांची आणि चित्रपटांची लोकप्रियता कायम राहिली. एवढच नव्हे तर चित्रपटात जेम्स बाँडच्या भूमिका करणाऱ्या स्वीन कॉनेरी वगैरे नटानांही कल्ट फिगरचे स्थान प्राप्त झाले.

त्याच्या लोकप्रियतेमुळे किंग्सले अॅमिस, जॉन गार्डनर रेमन्ड बेन्सन या ब्रिटिश लेखकांनी जेम्स बॉड हा नायक ठेवून कादंबऱ्याही लिहिल्या. १९६८ मध्ये किंग्सले अॅमिसची 'कर्नल सन' ही कादंबरी आली. १९९५ मध्ये जॉन गार्डनरने दि गोल्डन आय ही थरारकथा प्रसिद्ध केली. रेमंड मेन्सनची 'दि मॅन वुईथ दि रेड टॅटू' ही कादंबरी इ.स.२००२ मध्ये बाजारात आली. परंतु मूळ जेम्स बाँडच्या कथांपुढे हे प्रयत्न काहीसे फिके पडले.

फ्रान्सच्या पार्श्वभूमीवर 'दि गर्ल अॅट द लायन डी ओर, बर्ड साँग, शार्लोट ग्रे' या तीन कादंबऱ्यासांठी प्रसिद्ध असलेला सेबॅस्टियन फॉल्कसने नवी जेम्स बाँड कथा लिहिण्याचे काम स्वीकारून लेखन सुरू केले आहे. इयान फ्लेमिंग जमैकामधील घरात रोज सकाळी एक हजार शब्द लिहून व्हावेत असा कटाक्ष बाळगत असे. त्यानंतर तो समुद्र किनाऱ्यावर फेरफटका करी. कॉकटेल्स व लंच घेई. दुपारी पुन्हा एक हजार शब्द लेखन व्हावे म्हणून टाइपरायटर घेऊन बसे. त्यानंतर त्याचे मदिरा-मदिराक्षी सेशन चाले.'आपण लंडनमध्ये राहून याच प्रकारचा दिनक्रम फक्त शेवटचा मदिराक्षीचा प्रकार वगळून पाळत आहोत' असे सेबॅस्टिअनने म्हटले आहे. जेम्स बॉंडला एका अभिनव पद्धतीने जन्मशताब्दी निमित्त श्रद्धांजली वाहण्याच्या हा उपक्रम जेम्स बाँडच्या चाहत्यांना रुचायला हरकत नाही.

मराठी वाचकांनाही या जन्मशताब्दीच्या निमित्ताने जेम्स बाँडच्या सर्व पुस्तकांचा मराठीतून आस्वाद घेता येईल. मेहता पब्लिशिंग हाऊसने जेम्स बॉंडच्या सर्व पुस्तकांचे मराठी अनुवादाचे हक्क मिळवलेले असून आतापर्यंत **कॅसिनो रॉयल, मूनरेकर, फ्रॉम रशिया वुईथ लव्ह, फॉर युवर आइज ओन्ली, ऑक्टोपसी, थंडरबॉल, द स्पाय हू लव्हड् मी, लिव्ह अँड लेट डाय, द मॅन वुईथ द गोल्डन गन, गोल्डफिंगर, यू लिव्ह ओन्ली ट्वाईस** या कादंबऱ्यांचे अनुवाद पूर्ण झाले आहेत. उर्वरीत अनुवादही लवकरच येतील.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धातील सर्वात नामांकित गुप्तहेर आणि गुप्तहेरकथा यांचा परिचय आणि आस्वाद घेण्याचा हा योग आनंददायकच ठरेल हे नक्की!

❒

## सिॲटलचे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन

मराठी साहित्यक्षेत्रातील घडामाडींकडे लक्ष देताना काही आंतरराष्ट्रीय घडामोडींकडेही लक्ष जातेच. कारण मराठी माणसाला आता हे 'विश्वचि माझे घर' या ज्ञानेश्वरांच्या उक्तीची महती कळू लागली आहे. मराठी माणूस आज युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा,मध्यपूर्वेतील देश, जपान-चीन यातही आपले बुद्धिवैभव आणि वैज्ञानिक कौशल्य दाखवू लागला आहे आणि साहित्य-कलाक्षेत्रातही त्याचे पडसाद उमटल्याविना राहत नाहीत.

अमेरिकेतील सिअॅटल येथे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन २९-जून आणि १जुलै२००७ या दरम्यान झाले. अमेरिकेतील कानाकोपऱ्यातून तीन हजारावर मराठी माणसे या द्वैवार्षिक अधिवेशनांना आवर्जून उपस्थित राहतात. विशेष म्हणजे अमेरिकेतील तरुणतरुणीही याला हजेरी लावतात. तीन दिवस वाङ्मयीन आणि कलात्मक कार्यक्रम, चर्चासत्रे आणि मुलाखती यांची रेलचेल असते.

पत्रकार अपर्णा वेलणकर यांनी अमेरिकेत राहणाऱ्या मराठी कुटुंबाना भेटी देऊन, गेल्या चार वर्षात दोन वाऱ्या करून गेल्या चाळीस वर्षात मराठी स्थलांतरितांच्या मानसिकतेत कसकसा फरक पडत गेला आहे याचा आलेख काढणारे 'फॉर हिअर ऑर टू गो' हे पुस्तक लिहून काढले. त्याचे प्रकाशनही

या अधिवेधनात झाले.

मंडळाने सांस्कृतिक आणि करमणुकीच्या कार्यक्रमावर आणि घटनांवर आपले लक्ष केंद्रित केले. आता येथील समाजाचे स्थानिक प्रश्न आणि वैचारिक घटक यांच्याकडे वळण्याची वेळ आली आहे. आजची तरुण पिढी आपला भारतीय सांस्कृतिक वारसा जतन करण्याची धडपड करीत असतानाच येथील समाजजीवनात मिसळण्याची आणि नेत्रदीपक यश मिळवण्याची कसरत करीत आहे. .या पिढीतील तरुणवर्ग इन्व्हेस्टमेंट, बँकिंग, मार्केटिंग, सोशल वर्क या सारख्या अपारंपारिक क्षेत्रात धडपडत आहे. राजकारणातही मराठी तरुण शिरकाव करून घेत आहेत. असे प्रास्ताविकात अर्थतज्ज्ञ जगदीश वासुदेव यांनी म्हटले आहे˝ या पुस्तकामुळे तेथील मराठी माणसांच्या संर्घषाची आणि मानसिकतेची बदलती रूपे स्पष्ट होतात. हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने पुस्तक काढले आहे.

सिॲटलला मुख्यमंत्री विलासराव देशमुख हेही गेले होते. त्यांनी तेथील मराठी जनांचा गौरव केला. बिल गेट्सला भेटून हिंजवडीला सायबर पार्क उभारण्याच्या योजनेला गती दिली. बोईंग विमानाच्या कारखान्यात भेट दली. सुधीर गाडगीळ यांनी यशस्वी व्यक्तींच्या रंजक प्रबोधनपर मुलाखती घेतल्या. एकूण सोहळा उत्तम झाला असणार.

या अधिवेशनात ‘नको रे बाबा’ हे बालनाट्य सादर करण्यात आले. श्रीरंग गोडबोले यांनी ते लिहिलेले होते. सोनाली कुलकर्णी यांची त्यातील भूमिका हे एक आकर्षण होतेच. अमेरिकेतील नव्या पिढीचे जीवन, आईसोबत राहणाऱ्या दोन मुलांना, आईच्या ऑफिसमधील एक सहकारी नवीन बाब म्हणून घरात येणार म्हणून वाटणारे औत्सुक्य, त्यामुळे होणारी छोटीमोठी वादळे... यांचे चित्रण करणारे हे नाटक....इतर देशातही त्याचे प्रयोग होणार आहेत.

मराठी ग्रंथप्रदर्शनाला या संमेलनात स्थान असतेच. यंदाही विकास परांजपे (ज्योत्स्ना प्रकाशन,पुणे) हे पाचशे पुस्तके घेऊन सिॲटलला गेले होते. चार हजार प्रतिनिधींपैकी ३०० लोकांनी मराठी ग्रंथप्रदर्शनाला भेट दिली आणि पुस्तके घेतली.. मराठी पुस्तके वाचण्याची सवय मध्यमवयीन मराठी माणसांनाच काय ती आहे. नवी पिढी मराठी फक्त घरात बोलते. वाचन-लेखनापासून दूर असते असे दृश्य दिसले.

तरीही मराठी भाषा अमेरिकेत टिकवण्याचे प्रयत्न होताहेत ही स्वागतार्ह व दिलासा देणारी बाब आहे. तेथे प्रमुख शहरातील निवडक ग्रंथदालनात मराठी पुस्तके कायम उपलब्ध असतील अशी यंत्रणा सुरू होणे गरजेचे आहे.





# आगामी

## सॉफ्टवेअर

**ह. मो. मराठे**

**२००रु. पोस्टेज २५ रु.**




उद्योगप्रधान होत जाणाऱ्या, हळूहळू भल्याबुऱ्या स्वरुपातील औद्योगिक संस्कृतीला सामोरे जाऊ पहाणाऱ्या आपल्या समाजातील बदलत्या मानवी अनुभवांचे वेध कथा-कादंबरीतून घेण्याचा प्रयत्न करणारे लेखक ह. मो. मराठे यांची ही कादंबरी. एका पातळीवर ती मॅनेजमेंट फिलॉसॉफी नामक प्रकाराचा दंभस्फोट करते. तर दुसऱ्या पातळीवर दिवसेंदिवस अधिकाधिक संमिश्र आणि परस्परावलंबी बनत चाललेल्या सामाजिक, आर्थिक संबंधामुळे होणारी माणसांच्या जगण्याची कोंडी चित्रित करण्याचा प्रयत्न करते.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.



# साहित्यवार्ता

## * मनोहर धोत्रे यांच्या 'ब्लॅकबर्ड' या कादंबरीचे प्रकाशन

मुंबई शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय औद्योगिक कामगार संघटनेचा अमृत महोत्सव सांगता समारंभ नुकताच शासकीय मुद्रणालयाच्या आवारात झाला. या प्रसंगी गुणवंत कामगार, नाटककार, साहित्यिक मनोहर धोत्रे यांचा मुंबईच्या महापौर डॉ. शुभा राऊळ यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या सोहळ्याप्रसंगी मनोहर धोत्रे यांच्या 'ब्लॅकबर्ड' या 'मेहता पब्लिशिंग हाऊस' तर्फे प्रकाशित केलेल्या कादंबरीचे प्रकाशन अखिल भारतीय सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री. र. ग. कर्णिक यांच्या हस्ते झाले. कर्णिक यांनी धोत्रे यांच्या अष्टपैलूत्वाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला श्री. सुनील जोशी (सरचिटणीस- मुंबई जिल्हा सरकारी कर्मचारी संघटना), श्री. प. ज. गोसावी (व्यवस्थापक- शासकीय म. मुद्रणालय), श्री. किशोर वाईकर (अध्यक्ष- महाराष्ट्र प्रेस फेडरेशन) आणि कवि अविनाश दौंड उपस्थित होते. मनोहर मांदाडकर यांनी 'ब्लॅकबर्ड' या पुस्तकावर भाष्य करून धोत्रे यांच्या लेखनशैलीचा व पुस्तकाचा परिचय करून दिला. मनोहर धोत्रे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन देवेंद्र सावंत यांनी केले.

## * 'जीए'- जीवनरहस्याचा शोध घेणारा प्रतिभावंत

'जी. ए. कुलकर्णी' यांच्या ८५ व्या जन्मदिनानिमित्त पुण्यातील साधना मीडिया सेंटरमध्ये १० जुलै रोजी त्यांच्या ग्रंथांचे आणि त्यांनी काढलेल्या काही चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यावेळी डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी जीएंच्या निर्मितीप्रक्रियेचे रहस्य विशद करून सांगितले. जीए हे आत्मप्रकटीकरणासाठी, संप्रेषणासाठी अथवा प्रकाशकासाठी वा प्रसिद्धीसाठी लिहीत नव्हते, त्यांना जे जीवन दिसले त्यातल्या चैतन्यतत्त्वाचा शोध घेण्यासाठी, जीवनरहस्य जाणून घेण्यासाठी ते लिहीत होते. जीएंच्या कथा शब्दांतून अर्थाचा दृश्यात्मक प्रत्यय घडवतात आणि दृश्यातून चैतन्याचा अर्थात्मक प्रत्यय घडवतात. त्यापुढे त्यांच्या कथासंग्रहांवरील वा कथांमधील चित्रे निष्प्रभ, थिटी पडतात. कथा या वाङ्मयप्रकाराचा प्रचंड आवाका त्यांनी दाखवून दिला. त्यांच्या कथांनी इतर कथाकारांच्या कथांना लघुकथा बनवले. जीएंच्या कथेतील प्रत्येक घटक जिवंत आहे, त्यामुळे त्यांच्या कथा पुन:पुन्हा वाचाव्याशा वाटतात.' असे द.भिं.नी नमूद केले.



जी. ए. कुलकर्णी यांनी एक नाटकही लिहिले होते आणि ते लवकरच प्रकाशित होईल.

गेल्याच वर्षी त्यांच्या अप्रकाशित पत्रांचे दोन खंड 'जीएंची निवडक पत्रे' या नावाने मौज प्रकाशनाने त्यांच्या जयंतीलाच प्रकाशित केले. याच सुमारास जीएंच्या पुण्यातील भगिनी नंदा पैठणकर यांनी त्यांच्या हस्ताक्षरातील एक नाटक मौजेच्याच श्री. पु. भागवतांकडे सुपूर्त केले होते. या नाटकाला जीएंनी नावही दिलेले नाही.

जीएंच्या हस्ताक्षरातील हे नाटकाचे बाड आज कोणत्या अवस्थेत आहे? ते जीएंनी कधी लिहिले? आणि ते छापण्याच्या अवस्थेत आहे का? असे अनेक प्रश्न यातून निर्माण झाले आहेत.

जीए काळा चष्मा का वापरत? ते धारवाडमध्येच का राहिले? पुण्यावर त्यांचा का राग होता? ते सभासंमेलनांना का जात नसत? या सर्व प्रश्नांची उत्तरे एकच असल्याचे डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी सांगितले. स्वत:च्या जगण्याकडेही साक्षीभावाने पाहणाऱ्या जीएंनी काळा चष्मा घातला ते लोकांनी आपल्याकडे पाहू नये; पण आपल्याला सर्व दिसावे यासाठी! पुण्यात तसेच साहित्य संमेलनांना जीएंना ओळखणारे त्यांचे अनेक चाहते होते, पण धारवाडला त्यांना कुणीच ओळखत नव्हते! जीएंची वाङ्मयीन अनुभूती ही भाषांकित असल्यामुळेच त्यांनी सविस्तर अशी शेकडो पत्रेही लिहिली, असेही कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

## * शालेय विद्यार्थ्यांसाठी मराठी कॉम्प्युटर

भारतीय शिक्षण क्षेत्रासाठी शंभर कोटी रुपयांची देणगी देणाऱ्या मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या बिल गेटसने पुण्यातील गुरुजीवर्ल्ड या आयटी कंपनीच्या सहकार्याने मराठी मुलांसाठी एक स्वतंत्र पीसी तयार केला आहे.

मराठी विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला अशा प्रकारचा देशातला हा पहिलाच प्रकल्प आहे, असा दावा गुरुजीवर्ल्ड संस्थेचे कार्यकारी संचालक गिरीश प्रभू यांनी केला.

या योजनेची घोषणा मायक्रोसॉफ्टने काही दिवसांपूर्वी दिल्लीत केली होती. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी लागणाऱ्या सर्व बाबींचा विचार करून इंग्रजी आणि मराठीत माहिती लोड करण्यात आली आहे. २१ हजार रुपये किंमतीच्या या पीसी संचात मायक्रोसॉफ्ट विंडोज, ऑफिस वर्क, मायक्रोसॉफ्ट एनकार्टा, ट्यूटोरिअल्स, ज्युनियर ॲचिव्हमेंटस्, पॅकसॉफ्ट, कराडी टेल्स, एज्युराईट ट्यूटोव्हिस्टा अशा अनेक उपयुक्त गोष्टी घातल्या आहेत.

यातून माहिती-तंत्रज्ञान, इंटरनेट आणि इंग्रजी भाषेचे शिक्षण गुरुजीवर्ल्डने तयार केले आहे. स्वयंअध्ययनाचीही सोय आहे. विद्यार्थ्यांसाठी सॉफ्टवेअर तयार केले असून सध्या गोव्यातील शाळांमध्ये ते वापरले जाते.

## * 'प्रवास आत्मसन्मानाचा'चे प्रकाशन

'आपल्याकडे असलेल्या इच्छाशक्तीच्या जोरावर आजारावरच नव्हे, तर रुढींवरही

मात करता येते,' असे मत पुण्याचे पोलिस आयुक्त जयंत उमराणीकर यांनी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय कुष्ठ संघटनेचे अध्यक्ष डॉ. शरच्चंद्र गोखले संपादित 'प्रवास आत्मसन्मानाचा' या पुस्तकाचे प्रकाशन उमराणीकर यांच्या हस्ते झाले. नीता कुलकर्णी, प्रा. आर. के. मुटाटकर, प्रकाशक उल्हास लाटकर उपस्थित होते.

कुष्ठरोगाबाबत गैरसमज दूर करण्यासाठी समाजाची वृत्ती बदलण्याची गरज आहे, असे सांगून उमराणीकर म्हणाले, 'एड्ससारख्या गंभीर आजाराबाबत काम करणाऱ्या शेकडो संस्था आहेत; पण आजारावर पूर्ण मात करणारे औषध अजून सापडलेले नाही. दुसऱ्या बाजूला ज्यावर पूर्ण मात करता येणे शक्य आहे, अशा कुष्ठरोगासारख्या आजारांबाबत अपेक्षित जनजागृती करण्यात आपण कमी पडत आहोत. कुष्ठरुग्णांना डिवचण्याची वृत्ती हाच एक गंभीर रोग आहे. त्यामुळे कुष्ठरुग्णांनी स्वत:ला कमी न लेखता, आत्मविश्वासाच्या जोरावर या संकटावर मात करावी.'

गोखले म्हणाले, 'देशात दीड कोटी लोक औषधोपचाराने कुष्ठरोगापासून बरे झाले आहेत. मात्र त्यांना अद्यापही कलंकित मानले जाते. त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे आव्हान आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि केंद्र सरकारही यासाठी मदत करायला तयार आहे. ज्या जिल्ह्यात कुष्ठरुग्ण जास्त आहेत, तेथे जाऊन नागरिकांचे मतपरिवर्तन करण्याचे काम सहा राज्यांत चालू आहे. यापुढील काळात जिल्हा परिषद, तसेच राजकीय व्यक्तींना एकत्रित आणून समाजपरिवर्तन करण्यात येणार आहे.'

डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### * 'नक्षत्र' आणि 'प्रकाश शलाका' यांचे प्रकाशन

मानवी मनाचा तळ शोधून त्याचा मुक्त आविष्कार करणे ललित लेखनामध्ये अपेक्षित असते. लेखिका रेखा बैजल यांनी आपल्या ललित लेखसंग्रहात हे साधले आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती विकास किनगावकर यांनी केले.

संवाद प्रतिष्ठानतर्फे जालना येथील डॉ. आंबेडकर सभागृहात रेखा बैजल यांच्या 'नक्षत्र' या ललित लेखसंग्राहाचे प्रकाशन किनगावकर यांच्या आणि 'प्रकाश शलाका' या ललित लेखसंग्रहाचे लोकसत्ताचे निवासी संपादक मुकुंद संगोराम यांच्या हस्ते झाले.

श्री. किनगावकर म्हणाले, 'कोणत्याही साच्यात न अडकता अनुभवाच्या शिदोरीतून साकारलेले लेखन मनाचा ठाव घेते. 'नक्षत्र'मध्ये बैजल यांनी मनाचा ठाव घेतला आहे. ललित लेखन अतिशय अवघड असते. रहस्यकथा, कादंबरी यांमध्ये विशिष्ट संहिता असते. ललितलेखन संहिता लिहून करता येत नाही.



रेखा बैजल यांच्या ललितलेखनातील हरवलेले अंगण मला भावले. लेखिकेने तरल मनाच्या वेदना, संवेदना आणि सहवेदना चांगल्या रीतीने व्यक्त केल्या आहेत.'

श्री. संगोराम म्हणाले, 'वृत्तपत्रांनी केवळ माहिती देऊन चालणार नाही. वाचकांची आवड लक्षात घेऊन विविध विषयांवरील लेखन प्रसिद्ध झाले पाहिजे. ललित लेखांचे आकर्षण हळूहळू लोप पावत चालले आहे. त्याची जागा आता वैचारिक लिखाणाने घेतली आहे. लेखकाला स्वातंत्र्य दिले तर तेवढीच त्याची जबाबदारीही वाढते. ही तारेवरची कसरत रेखा बैजल यांना आपल्या लेखनात साधली आहे.'

### * 'लज्जा' कादंबरीचा पुढील भाग तस्लिमा नसरीन लिहिणार

'लज्जा' या कादंबरीमुळे मुस्लिम कट्टरतावाद्यांच्या रोषाचे लक्ष्य ठरलेल्या तस्लिमा नसरीन याच कादंबरीचा पुढचा भाग लिहिणार आहेत. या वर्षाच्या अखेरीस ही कादंबरी प्रसिद्ध होईल.

'लज्जा' कादंबरीचा जिथे शेवट झाला तिथेच 'शरम' या कादंबरीची सुरुवात आहे, असे तस्लिमा म्हणाल्या. 'लज्जाप्रमाणेच हे पुस्तकही वादग्रस्त ठरेल व त्याला प्रचंड विरोध होईल, याची मला जाणीव आहे, पण या विरोधाला मी जुमानणार नाही.'

या कादंबरीव्यतिरिक्त आत्मचरित्रही लिहिण्यास तस्लिमाने सुरुवात केली असून सात प्रकरणे लिहून झाली आहेत.

लज्जाच्या लिखाणानंतर मौलवींनी काढलेल्या फतव्यामुळे तस्लिमा नसरीन यांना विजनवासात जावे लागले. फ्रान्स, स्वीडन, अमेरिका व जर्मनी या देशांत त्यांनी आश्रय घेतला होता व नंतर त्या भारतात आश्रयाला आल्या.

सध्या त्या कोलकत्यात राहात आहेत. भारतात राहण्याची त्यांना देण्यात आलेली मुदत १७ ऑगस्टला संपत असून ती वाढवून मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्या म्हणाल्या, 'भारताने जर मला मुदतवाढ नाकारली तर जगात मला कोठेही स्थान नाही. बांगलादेशाने मला प्रवेशबंदी केली आहे. पुन्हा युरोपात जाण्याची माझी इच्छा नाही. मायदेशी जायला मलाही आवडेल पण ते शक्य दिसत नाही, अशा स्थितीत भारतातच रहायला मला आवडेल. हीच माझी पहिली आवड आहे.' असे त्यांनी नमूद केले.

### * 'अज्ञात विवेकानंद'चा दुसरा भाग लवकरच प्रकाशित

भारतीय संस्कृतीचा जगभर प्रसार करणारे स्वामी विवेकानंद उर्फ नरेंद्र दत्त यांची नवनवी माहिती आता उजेडात येत आहे. बंगाली लेखक शंकर यांच्या 'अज्ञात विवेकानंद' या पुस्तकाचा पुढचा भागही लवकरच बंगालीतून प्रसिद्ध होत असून तो मराठीतही येईल, असे अनुवादक मृणालिनी गडकरी यांनी सांगितले. विवेकानंद यांनी आपले गुरू रामकृष्ण परमहंस यांची निवड कठीण कसोट्या

लावून केली होती. आपल्या शिष्यांची निवड करताना ते असेच जागृत होते. ही माहिती या नवीन पुस्तकातून देण्यात आली आहे.

विवेकानंदांचा पुण्याशी जवळचा संबंध असून विंचूरकर वाड्यात लोकमान्य टिळकांबरोबर त्यांची भेट झाली तेव्हा स्वामीजींच्या विद्वत्तेची चुणूक पुण्यातील अनेकांनी अनुभवली होती. अमेरिकेत शिकागो येथील धार्मिक परिषदेत जाण्यापूर्वी त्यांचे वास्तव्य पुण्यातच होते. त्या काळात विवेकानंद टिळकांबरोबर हिराबागेत काशिनाथ गोविंद नातू यांच्या तत्त्वज्ञानावरील व्याख्यानाला नेले होते, तेव्हा त्या गहन विषयाची दुसरी बाजूही विवेकानंदांनी मांडली होती.

### * पनवेलचे वाचनालय

२६ जुलै २००५ च्या महापुराने उद्ध्वस्त झालेल्या पनवेलमधील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयातील हजारो पुस्तके व दुर्मिळ ग्रंथ चिखलमय झाले होते. मात्र, राज्यभरातील ग्रंथप्रेमी व संस्थांनी सहकार्याचा हात दिल्याने लिमये वाचनालय पुन्हा पूर्वीप्रमाणेच 'ज्ञानभांडार' बनले आहे.

१९४८ मध्ये स्थापन झालेल्या लिमये वाचनालयाचे हीरक महोत्सवी वर्ष चालू आहे. पुस्तकप्रेमींनी पुस्तके, रोख रक्कम व फर्निचरच्या माध्यमातून वाचनालयाला ११ लाख रुपयांपेक्षा अधिक देणगी दिली.

भिजलेल्या ३२ हजार पुस्तकांतून अंदाजे १३ हजार पुस्तके सुकवून बाइंडिंग करण्यात वाचनालयाला यश आले. मात्र, अनेक दुर्मिळ ग्रंथांना जलसमाधी मिळाली. पुणे मराठी ग्रंथालयाने ५०० दुर्मिळ ग्रंथांसह एक हजार पुस्तके भेट दिली.

दोन वर्षांत ८ हजार पुस्तकांची भेट मिळाली. वाचनालयाचे अध्यक्ष राणाप्रताप परदेशी यांनी सांगितले की, आता ग्रंथालयाकडे २८ हजार ७०० पुस्तके आहेत.

देणगीतून वाचनालयाने ४ हजारांपेक्षा जास्त पुस्तके विकत घेतली. वाचनालयाच्या इमारतीची दुरुस्ती व रंगरंगोटी केली.

रायगड जिल्हा परिषदेचे एक लाख, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे १० हजार, उषा मेहता व रेखा नार्वेकर यांचे ५ हजार रुपये यांचा उल्लेख त्यांनी केला.

### * राष्ट्रीय भाषा सर्वेक्षण

इंग्रजीच्या आक्रमणामुळे 'हिंग्लिश', 'मिंग्लिश' अशा 'हायब्रिड' भाषांचा वेगाने फैलाव होत आहे. त्यासाठी राष्ट्रीय भाषा सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे.

पारंपरिक बोली भाषांचे दृक्-श्राव्य माध्यमात जतन, देशाचा भाषावार नकाशा अशी या योजनेची वैशिष्ट्ये आहेत. संस्कृतच्या प्रसारासाठी स्वतंत्र ३३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

मनुष्यबळ विकास खाते आणि केंद्रीय भारतीय भाषा संशोधन संस्थेच्या वतीने विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावर पदव्युत्तर शिक्षण-संशोधन करणारे



प्राध्यापक-संशोधक यांना यात सहभागी करून घेतले जाणार आहे. भाषावार प्रांतरचनेच्या निमित्ताने राष्ट्रीय पातळीवर भाषा हा निकष लावून पाहणी करण्यात आली होती. नवी योजना भाषांच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी ठरेल. भारतीय भाषांचे जतन व विकासासाठी एकत्रित व्यासपीठ, असे या योजनेचे स्वरूप आहे. राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रसारासाठी केंद्रीय पातळीवरून प्रयत्न केले जात आहेतच. त्याचप्रमाणे २६ अधिकृत भाषांच्या संवर्धनासाठी विविध संस्था-संघटनांना निधी देण्यात येत आहे.

बारा मैलांवर भाषा बदलते. या भाषक वैविध्याची नोंद आपल्याकडे नाही. या राष्ट्रीय सर्वेक्षणाच्या माध्यमातून पारंपरिक-बोली भाषांची प्रथमच राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली जाणार आहे. शिवाय त्यांच्या संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यामध्ये मृत्युशय्येवर असलेल्या १०० दुय्यम उपभाषांचा समावेश आहे. त्यांचा लिखित व बोली धर्तीवरील माहितीसाठा विकसित करण्यात येईल. त्यामध्ये १० लाख शब्द आणि दृक्-श्राव्य संकलने यांचा समावेश असेल.

सर्वेक्षणाद्वारे राष्ट्रीय भाषा नकाशा, विभागवार भाषासूचीही विकसित करण्यात येणार आहे. भौगोलिक, पारंपरिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि सामाजिक निकष त्यासाठी विचारात घेतले जाणार आहेत. नॅशनल टेस्टिंग सर्व्हिसच्या माध्यमातून भाषविषयक अभ्यासक्रम विकसित केले जाणार आहेत. भाषांचे अभ्यासक्रम, अध्यापन-अध्ययन आदींबाबत गुणवत्तेचे निकष ठरवून भाषा अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली जाईल.

### * 'जागतिक रंगभूमी'चे प्रकाशन

अमरावतीचे नाट्यसमीक्षक प्रा. माणिक कानडे यांच्या सहस्रचंद्रदर्शनाच्या निमित्त जागतिक रंगभूमी (भाग १ व २) या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले आहे. पहिल्या पूर्वरंग भागात जपान, चीन, भारत यातील प्राचीन रंगभूमी, संस्कृत रंगभूमी, लोकनाट्य वगैरेंचा विचार केला असून पश्चिम रंग या दुसऱ्या भागात ग्रीक, रोमन, युरोपियन, अमेरिकन आणि ब्लॅक रंगभूमीची माहिती देण्यात आली आहे. महेश एलकुंचवार यांची प्रस्तावना असून, त्यांनी 'मानवजातीच्या ज्ञात इतिहासातील जागतिक रंगभूमीचा हा जाणकार आढावा आहे... मराठीत अशा प्रकारचा दुसरा ग्रंथ असेल असे मला वाटत नाही... रंगभूमीच्या अभ्यासकांसाठी हा ग्रंथ अत्यावश्यक गरजेचा ठरेल...' असे म्हटले आहे. या पुस्तकांचे संपादक मिलिंद चंपानेरकर हे असून पुण्याच्या रोहन प्रकाशनने त्यांची निर्मिती केली आहे.

### * डॉ. रा. चिं. ढेरे यांचा 'श्रीतुळजाभवानी'

लोकवाङ्मयाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. रा. चिं. ढेरे यांनी गेली आठ-दहा वर्षे केलेल्या संशोधनातून 'श्रीतुळजाभवानी' हा ग्रंथ साकार झाला आहे.

डॉ. ढेरे यांच्या ७७ व्या वाढदिवशी २१ जुलै रोजी एका अनौपचारिक

सोहळ्यात पुस्तकाचे प्रकाशन झाले. 'या निमित्ताने काही वर्षांपूर्वी वाचकांना दिलेले एक आश्वासन माझ्या हातून पूर्ण होत आहे,' असे डॉ. ढेरे म्हणाले. 'पद्मगंधा प्रकाशन'ने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. प्रस्तुत पुस्तकासाठी डॉ. ढेरे यांनी विपुल संशोधन केले आहे. संदर्भासाठी कागदपत्रे मिळवण्याकरिता तीनचारदा दक्षिण भारताचा दौराही केला. 'चक्रपाणी', 'लज्जागौरी', 'संतसाहित्य आणि लोकसाहित्य', 'शिखर शिंगणापूरचा शंभूहादेव' इत्यादी साहित्यकृतींतून डॉ. ढेरे यांनी मराठी लोकपरंपरेवर प्रकाश टाकला आहे. त्यांना नुकताच राज्य सरकारचा 'ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार' जाहीर झाला आहे.

### * पुण्यात या... पुस्तकांमध्ये रमा!

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृतीचा प्रसार व्हावा म्हणून लायब्ररी टुरिझम (ग्रंथालय सहल) ही संकल्पना पुणे मराठी ग्रंथालय १५ ऑगस्टपासून प्रत्यक्षात आणत आहे.

ग्रंथालयातील 'पु. ल. देशपांडे मुक्तांगण वाचनालय' विभागात एकावेळी ८० विद्यार्थी बसू शकतील, अशा दृष्टीने नऊ हजार मुलांची पुस्तकं, नऊ पर्सनल कम्प्युटर्स तसेच माहितीपूर्ण सीडी, डीव्हीडी पाहण्यासाठी एलसीडी प्रोजेक्शन हॉलची सुविधा उभारण्यात आली आहे.

या प्रकल्पासाठी तीस लाख रुपये खर्च येणार असून त्याच्या उद्घाटनाला ज्येष्ठ साहित्यिक तसेच बालकुमार मराठी साहित्य संमेलनाचे दहा माजी अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्रातल्या सर्व शाळा यात सहभागी होऊ शकतील. मुलांना वाचनात रमता येईल यासाठी वेगळ्या पद्धतीचे इंटिरिअर तसेच बसण्याची व्यवस्था केली आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड मिळून असणाऱ्या शाळांपैकी अकराशे शाळांमध्ये आजही ग्रंथालये नाहीत. पुण्याबाहेरच्या शाळांमध्येही फारशी वेगळी परिस्थिती नाही. या प्रकल्पापासून इतर शहरांमधील ग्रंथालयांनाही प्रेरणा मिळेल.

### * अर्थमंत्री पी.चिदंबरम यांचा लेखसंग्रह

२००२ ते २००४ या काळात 'इंडियन एक्सप्रेस' आणि 'फायनान्शियल एक्सप्रेस'मध्ये प्रसिद्ध झालेल्या पी. चिदंबरम यांच्या लेखांचा संग्रह 'अ व्ह्यू फ्रॉम दि आऊटसाईड : व्हाय गुड इकॉनॉमिक्स वर्क्स फॉर एव्हरीवन' या मथळ्याखाली पुस्तकरूपाने पेंग्विन प्रकाशनने प्रकाशित केला आहे. या पुस्तकातील निवडक उताऱ्यांच्या वाचनाचा कार्यक्रम चिदंबरम यांच्या उपस्थितीत १५ जून रोजी केम्प्स कॉर्नर येथील क्रॉसवर्ड या बुक शॉपीमध्ये झाला. या प्रसंगी आयीआयसीआय बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी के. व्ही. कामत तसेच प्रसिद्ध स्तंभलेखिका शोभा डे यांना निमंत्रित करण्यात आले होते.

विकास दर वाढण्यासाठी अनेक बाबी कारणीभूत असतात. चमत्काराने तो



वाढत नाही. त्यासाठी आधीपासूनच पायाभरणी करावी लागते. विकासाचा दर वाढला असे आपण म्हणतो तेव्हा तो सर्वसमावेशक कुठे आहे, असा प्रश्न उपस्थित केला जातो. जेव्हा विकास वाढतो तेव्हा तो साधारण सर्वसमावेशक असतो. आणि जेव्हा विकास मंदावतो तेव्हा तो आणखी सर्वसमावेशक असतो. विकासात वाढ झाल्यामुळेच आरोग्य, शिक्षण, रस्ते, ग्रामीण व शहरी विकास आदींवर गेल्या काही वर्षांत दुप्पट, तिप्पट नव्हे तर चारपट खर्च करणे शक्य झाले. त्यानंतरच विकास दर वाढला आहे. आर्थिक स्थिती एका रात्रीत सुधारलेली नाही. त्यासाठी यापूर्वी जी धोरणे आत्मसात केली आहे त्याचा परिणाम दिसून येत आहे. तरुणपिढी नजरेपुढे ठेवून खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणे आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. काळाबरोबर जो पुढे गेला तो टिकला. मात्र ज्यांना पुढे जाता आले नाही ते खुल्या आर्थिक धोरणावर टीका करीत आहेत. सुधारणांना सुरुवातीला विरोध होतोच. मात्र आम्ही योग्य मार्गावर आहोत आणि तेथून मागे हटणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

चिदंबरम हे वित्तमंत्री बनण्याआधी सडेतोड वकील होतेच. आता ते चांगले लेखकही आहेत हे त्यांच्या पुस्तकावरून सिद्ध होते असे 'आयआयसीआय'चे मुख्य कार्यकारी अधिकारी के. व्ही. कामत यांनी सांगितले. कमी शब्दांत अधिक आशय मांडणारे, वाचनाचा निर्भेळ आनंद देणारे हे पुस्तक आहे. आर्थिक स्थितीत सुधारणा यावी यासाठी काही टिप्स त्यांनी या पुस्तकातून दिल्या आहेत याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

इंडियन एक्सप्रेसचे मुख्य संपादक शेखर गुप्ता यांनी हा कार्यक्रम मुंबईत आयोजित करण्यामागील भूमिका मांडली. ''दिल्लीत अशा प्रकारचा कार्यक्रम विज्ञान भवन, पार्लमेंट हाऊस, अशोक कन्व्हेंशन हॉल किंवा पीएम हाऊसमध्ये प्रचंड सुरक्षा व्यवस्थेत पार पडतो. मात्र मुंबईत एका बुक शॉपीमध्ये कार्यक्रम होतो आणि तेही फारशी सुरक्षा व्यवस्था नसताना. राजकारणांबरोबर मैत्री करताना जशी भीती वाटते तशी चिदंबरम यांच्यापासून अजिबात वाटत नाही. ते जे बोलतात तेच करतात. सत्तेवर असताना चिदंबरम यांची जी मते होती तीच मते सत्ता गेल्यानंतरही कायम असतात. असा राजकारणी मिळणे विरळाच,' असेही गुप्ता यांनी सांगितले.

### * जखमा होतात तेव्हा कविता जन्माला येते– उत्तम कांबळे

जखमा होतात तेव्हाच कविता जन्माला येते. हीच कविता पुढे न्यायाची कल्पना देत जबाबदारीने वागायला शिकविते, असे उत्तम कांबळे यांनी नागपूर येथे काढले.

'युगसाक्षी' प्रकाशनातर्फे कवी यशवंत मनोहर पुरस्कार श्री. कांबळे यांना त्यांच्या 'जागतिकीकरणात माझी कविता' या काव्यसंग्रहासाठी देण्यात आला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार प्रा. सुरेश द्वादशीवार होते. श्री. कांबळे म्हणाले, की

व्यवस्था अडथळे निर्माण करते. त्यात जखमा होतात. याचे प्रतिबिंब कवितेत उमटते. कविता आसवं आणि आसवांमधून जखमा बघायला शिकविते.

प्रा. द्वादशीवार म्हणाले, की जागतिकीकरणाने जे दिले, त्याकडे डोळसपणे बघण्याची गरज आहे. समृद्धी देताना याच जागतिकीकरणाने सामाजिक न्यायाची जोड दिली आहे.

याच कार्यक्रमात कवी यशवंत मनोहर यांच्या 'मूर्तिभंजन', 'काव्यभीमायन', 'प्रतीक्षायन' हे तीन कवितासंग्रह आणि 'पत्र पौर्णिमा' हा पत्रसंग्रह यांचे प्रकाशनही झाले.

*** मराठी शुद्धलेखन : फेरविचाराची गरज**

मराठी साहित्य महामंडळाने शुद्धलेखनाचे नियम ४५ वर्षांपूर्वी केले असूनही शुद्धलेखनाची आजची बिकट अवस्था पाहताना त्यातील नियमांचे सुलभीकरण करणे अत्यावश्यक आहे, अशी मागणी मराठी भाषेच्या अध्यापक डॉ. स्नेहल तावरे यांनी केली.

गेली २४ वर्षे मॉडर्न महाविद्यालयात डॉ.तावरे मराठीचे अध्यापन करीत आहेत. विद्यार्थ्यांप्रमाणेच लेखक, डीटीपी ऑपरेटर, मुद्रितशोधक आणि सर्वसामान्य लोकांकडून आलेल्या अनुभवांमुळेच मराठीचे शुद्धलेखन आणि उच्चारण याबाबत काळजी करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

संस्कृतमधून मराठीत आलेल्या शब्दांना सामासिक शब्द लागल्यामुळे खूपच घोळ होतात. मराठीतले तत्सम इ-कारांत आणि उ-कारांत शब्द दीर्घांत लिहावेत असा नियम आहे. त्यानुसार कवि = कवी, बुद्धि = बुद्धी असे शब्द होतात. तसेच सामासिक शब्दांमध्येही इ-कारांत आणि उ-कारांत असताना ते 'बुद्धिवैभव' किंवा 'कविमन' असे ऱ्हस्वान्तच लिहावे हा नियम आहे.

त्याऐवजी जो शब्द आहे तसा मान्य करून त्याला सामासिक शब्द लागला तरी तो दीर्घच ठेवला तर गोंधळ कमी होतील. कविमन हा शब्द 'कवीमन' तसेच 'बुद्धीवैभव', 'दृष्टीकोन' असे लिहिणे अधिक सोपे जाईल, असे तावरे यांनी सांगितले. अशाच प्रकारे इन-अन्त शब्दांना असाच नियम लावल्यास ते दीर्घच राहतील. उदा. 'विद्यार्थीमंडळ', 'गुणीजन', 'प्राणीसंग्रह', 'पक्षीमित्र'.

शुद्धलेखनाबद्दल असणारी सर्वसामान्यांच्या मनातली भीती कमी होण्यासाठी बदल आवश्यक आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

*** 'अपंगत्वावर विजय'चे प्रकाशन**

'बालकल्याण संस्था' आणि 'स्नेहप्रकाश' यांच्या संयुक्त सहकार्याने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उषा शरण लिखित 'अपंगत्वावर विजय' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन 'हेल्पर्स ऑफ हँडिकॅप्ड'च्या अध्यक्षा नसीमा हुरजूक यांच्या हस्ते झाले. याच पुस्तकाच्या ब्रेल लिपीतील आवृत्तीचे प्रकाशन 'पुणे अंधजन मंडळा'चे संचालक निरंजन पंड्या यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी 'सकाळ'चे



व्यवस्थापकीय संचालक आणि 'बालकल्याण संस्थे'चे मानद सचिव प्रतापराव पवार, 'स्नेहप्रकाश'च्या अनुताई भागवत, डॉ. वा. ना. तुंगार हे उपस्थित होते.

अपंगत्वावर मात करून आयुष्यात स्वत:च्या पायांवर समर्थपणे उभे असलेले अमोल देशमुख, दिव्यांशू गणात्रा, भूषण तोष्णीवाल, काश्मिरा जोगळेकर, राजेश आपटे यांचे मनोगत 'शब्दाविना संभाषणे' प्रकारचे असूनही प्रेक्षकांच्या हृदयाला भिडले. श्रीमती शरण या वेळी म्हणाल्या, 'संवाद फक्त शब्दांनी होतो, असे नाही. पण आपण अन्य शक्यतांचा शोधच घेत नाही. तो घेतला तर अपंगांशी संवादाचे अनेक मार्ग दिसतील.'

*** 'आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण**

'आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आवाक्यात आले आहे. 'व्हर्चुअल स्कूल्स अँड लर्निंग होम्स'सारख्या तंत्रज्ञानाधारित शिक्षणप्रणाली खेडोपाडी दर्जेदार शालेय शिक्षण पोहोचवण्यासाठी उपयुक्त ठरू शकतील,' असा आशावादी सूर ३० जून रोजी एका परिसंवादात व्यक्त झाला.

त्याचवेळी 'आजच्या शिक्षकांमध्ये ध्येयवाद आणि समर्पित भाव उरलेला नाही,' याविषयी खंतही व्यक्त करण्यात आली. 'दर्जेदार शालेय शिक्षण- सर्वांसाठी, सर्वत्र' या विषयावर 'आयकन्सेंट' (इंडियन कन्सॉर्शिअम फॉर एज्युकेशनल ट्रान्सफॉर्मेशन) संघटनेने आयोजित केलेल्या या परिसंवादात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अरुण साधू, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष रावसाहेब शिंदे आणि डॉ. पु. ग. वैद्य सहभागी झाले होते. 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे यांनी त्यांच्याशी संवाद साधला. चर्चेमध्ये राज्यभरातील 'एमकेसीएल'च्या तीन हजार केंद्रांतील शिक्षक दृकश्राव्य माध्यमातून सहभागी झाले होते.

अरुण साधू म्हणाले, 'शिक्षणाचे उद्दिष्ट आज वाढत्या बाजारपेठेला काहीतरी उत्पादन पुरवण्यापुरते मर्यादित बनून राहिले आहे. उत्तम मानव निर्माण करण्याचे शिक्षणाचे मूलभूत ध्येय हरवत चालले आहे. 'कॉर्पोरेट' जगताच्या हाती आपण शिक्षणाचे व्यवस्थापन देत आहोत की काय? आपल्या संपूर्ण शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्याला विचार करायला शिकवण्याची कोठेही सोय नाही. या पद्धतीत बदल हवा. अजूनही मराठी ज्ञानभाषा बनलेली नाही.'

'शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी खेड्यांनी ऊर्जेबाबत स्वयंपूर्ण होण्याची गरज आहे,' असे मत व्यक्त करून डॉ. भटकर म्हणाले, 'खेड्यांनी स्वत:पुरती वीज निर्माण केली, तर विद्युतनिर्मितीचे विकेंद्रीकरण होऊ शकेल. यातून खेडी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास समर्थ बनतील. एकीकडे भारत 'आयटी'मध्ये महासत्ता बनण्याकडे वाटचाल करत असताना दुसरीकडे देश अजूनही संपूर्णपणे साक्षर नाही, हा विरोधाभास आहे. अद्यापही खडू-फळ्यात अडकलेले प्राथमिक शिक्षण

आधुनिक तंत्रज्ञानापासून दूर आहे.' डॉ. माशेलकर म्हणाले, 'मराठीने लवचिकता दाखवली, तर ती ज्ञानभाषा होऊ शकेल. ज्ञानभाषा झाल्याशिवाय मराठी टिकणार नाही. शिक्षण सर्वांसाठी, सर्वत्र आणि सर्वोत्तमही हवे.'

प्रा. ग. प्र. प्रधान आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. चित्रा नाईक यांनी दृकश्राव्य माध्यमातून चर्चेत भाग घेतला.

### * मदन मोहन यांच्यावरील पुस्तक प्रकाशित

सिन्थेसायझरचे कृत्रिम स्वर कानावर आदळण्याच्या आजच्या युगात वीस व्हायोलियनवादकांसह एकूण ३५ वादकांचा ताफा, मदन मोहनच्या मधाळ सुरावटी आणि मोठ्या कष्टाने आपल्या भावनांना आवर घालणारे मदन मोहन यांचे कुटुंबीय अशा तुडुंब गर्दीत 'मदन मोहन- अल्टिमेट मेलडीज' या पुस्तकाचे २२ जून रोजी प्रकाशन झाले.

विश्वास नेरुरकर आणि विश्वनाथ चॅटर्जी यांनी संपादित केलेले, मदन मोहनच्या कारकीर्दीचा आढावा घेणारे हे पुस्तक आहे. मदन मोहन यांच्या मृत्यूनंतर तीन दशकांनी, त्यांनी तयार करून ठेवलेल्या चालींचा आपल्या 'वीर झारा' या चित्रपटात वापर करणारे दिग्दर्शक यश चोपडा यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. मदन मोहन यांच्या संगीताचे विश्लेषण प्रसिद्ध छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष यांनी केले. साहित्य, सिनेमा, चित्रकला, नाटक अशा प्रत्येक क्षेत्रात अविस्मरणीय निर्मिती होण्याचा (१९४०-५० चा) काळ होता. शब्दांची जाण, चालींची निवड, वाद्यवृंद रचना पाहता मदन मोहन हे 'ॲरिस्टोक्रॅट कम्पोजर' (अभिजात संगीतकार) आहेत, असे निरीक्षण त्यांनी नोंदविले.

### * 'सरोदसम्राटां'चा सांगीतिक प्रवास

सरोदच्या तारांतून जगभरातील संगीत रसिकांना स्वर्गीय अनुभूती देणारे सरोद सम्राट उस्ताद अमजद अली खाँ यांनी आपले आत्मचरित्र लिहिण्यास सुरुवात केली आहे.

'यात माझ्या वयाच्या बाराव्या वर्षांपासूनचा संगीत प्रवास मी रेखाटला आहे,' असे अमजद अली यांनी सांगितले. अमजद अली यांचे पुत्र अमान आणि अयान बंगश यांनी यापूर्वी 'अब्बा : गॉड्स ग्रेटेस्ट गिफ्ट फॉर अस' हे पुस्तक लिहिले आहे.

अमजद अलींचे पूर्वज 'रबाब' हे अफगाणी वाद्य घेऊन भारतात आले होते. त्यात सुधारणा करून त्यांनी येथे सरोद हे वाद्य लोकप्रिय केले. अमजद अलींनी त्याला एका वेगळ्याच उंचीवर पोहोचवले.

'भारतीय शास्त्रीय संगीताची सध्या एका चांगल्या कालखंडातून भारतातच नव्हे, तर जगभरात प्रशंसा होत आहे. भारतीय शास्त्रीय संगीताची समज वाढत आहे. नवे कलाकारही चांगले काम करीत आहेत,' असे त्यांनी म्हटले.



### * मी शिवाजीराव भोसले बोलतोय.

शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची ओळख करून देण्यासाठी अभिनेता-दिग्दर्शक महेश मांजरेकर 'मी शिवाजीराव भोसले बोलतोय' हा सिनेमा काढणार आहेत.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी सिनेमाच्या निर्मितीला शुभेच्छा दिल्या.

या सिनेमाचे चित्रीकरण सप्टेंबरमध्ये होत असून रायगडासह, मुंबई आणि पुणे परिसरात ते होणार आहे. महाराजांच्या भूमिकेत महेश मांजरेकर असून दिनकरराव भोसलेची भूमिका सचिन खेडेकरने केली आहे. याशिवाय वंदना गुप्ते, विनय आपटे आणि विजय कदम यांच्याही त्यात भूमिका आहेत.

नोकरीपलीकडे आयुष्य दिसत नसणाऱ्या मराठी वर्गाने कोषातून बाहेर पडून स्वत:चा उत्कर्ष घडवायला हवा, असे खडे बोल सुनावताना महाराजांच्या बोलण्यातला आब कायम ठेवण्यात आला आहे. मराठी माणसाबद्दलची आस्था आणि तिरकस रोखठोकपणा नाट्यपूर्ण असल्याचे संवादलेखक पवार यांनी सांगितले.

### * सत्य इतिहास मांडणे हे इतिहासकाराचे कर्तव्य

'राष्ट्राच्या उत्कर्षाचा सत्य इतिहास समाजासमोर मांडणे हे इतिहासकाराचे आद्य कर्तव्य आहे,' असे प्रतिपादन इतिहासाचे अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांनी येथे केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या ३५० व्या जयंतीनिमित्त श्री. बलकवडे यांना नारायणकाका ढेकणे महाराज यांच्या हस्ते 'धर्मवीर पुरस्कार' देण्यात आला.

श्री. बलकवडे म्हणाले, 'गेली काही वर्षे समाजाचे स्वास्थ्य बिघडविण्याचे प्रयत्न सातत्याने केले जात आहेत. राजकीय आणि इतर महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी इतिहासाचा शिडीसारखा वापर केला जात आहे. इतिहासाचे पुनर्लेखन करण्याच्या नावाखाली सध्या लेखक इतिहासलेखनशास्त्रापासून दूर जात आहेत, हे खेदजनक आहे. राष्ट्राच्या उत्कर्षाचा सत्य इतिहास समाजासमोर मांडणे हे प्रत्येक इतिहासकाराचे कर्तव्य आहे.'

'अठरापगड जातींना बरोबर घेऊन शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यापूर्वीच्या सुलतानी राजवटींच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केल्याशिवाय शिवरायांच्या कार्याची महती पटणार नाही. १६८३ ते ८९ या कालावधीत छत्रपती संभाजीराजांनी स्वराज्याला कुशल नेतृत्व दिले. त्यांच्या बलिदानाने तत्कालीन समाजाला जागे करण्याचे कार्य केले. संस्कृती आणि धर्माचे रक्षण करण्याची प्रेरणा त्यांच्या चरित्रातून घ्यावी. नव्या पिढीच्या उत्कर्षासाठी याच इतिहासाची उजळणी करणे आवश्यक आहे,' असेही ते म्हणाले.

'संभाजीराजांच्या चरित्रातून त्यागाची आणि राष्ट्रप्रेमाची प्रेरणा घ्यावी. ही प्रेरणा कोणत्या स्वरूपाची असावी, हे संभाजीराजांनी कृतीतून सिद्ध केले, त्यामुळे ते कृतीवीरही आहेत,' असे श्री. ढेकणे म्हणाले.

सुधीर जाधव यांनी मानपत्राचे वाचन केले.

## * राजा रविवर्मा यांचे मळवलीचे मुद्रणालय

भारतातील पहिल्या छापखान्याचा आणि ज्येष्ठ चित्रकार राजा रविवर्मा यांच्या कलेचा इतिहास सांगणारी मळवलीची प्रसिद्ध 'राजा रविवर्मा फाईन आर्ट लिथो प्रेस'ची इमारत लवकरच जमीनदोस्त होईल असे दिसते.

या इमारतीला राष्ट्रीय ठेवा म्हणून घोषित करून, तिचे संग्रहालयात रूपांतर व्हावे, अशी मागणी केली जात होती. परंतु, ती कागदोपत्रीच राहिल्यामुळे 'रविवर्मा लिथो प्रेस' सध्या शेवटच्या घटका मोजत आहे. सन १८९५ मध्ये स्वत: राजा रविवर्मांनी 'लिथो' तंत्रज्ञानाचा छापखाना मळवलीत चालू केला. देशात छपाईचा नवा अध्याय सुरू केला. आपली कला राजे-रजवाड्यांसह देशातील घराघरांत पोहोचावी हा त्यांचा हेतू होता. त्यासाठी त्यांनी जर्मनीतून 'लिथो' तंत्राच्या छपाईची यंत्रे, हजारो लिथो (दगड), तंत्रज्ञ, कलाकार भारतात आणून मळवलीत छापखाना सुरू केला. आज घराघरात दिसणारी रविवर्मांची चित्रे, देवी-देवतांची क्लेंडर याच छापखान्यातून तयार झाली आहेत. एका वेळी पाच 'लिथो' यंत्रे आणि पाच 'ऑफसेट' यंत्रांमधून छपाई करण्यासाठी या प्रेसमध्ये १५० कामगार होते भारताच्या सर्व भागांतून या ठिकाणी छपाईची कामे येत असत. परंतु १९८० मध्ये लागलेल्या आगीमुळे हा प्रेस बंद पडला. छपाईची काही यंत्रे, लिथो आणि काही चित्रांच्या दुर्मिळ प्रतींसह ही इमारत रविवर्मांच्या कलेचा आणि तत्कालीन तंत्रज्ञानाचा इतिहास सांगत उभी होती.

'रविवर्मांनी १९०५ च्या दरम्यान जर्मनीच्या 'स्लाईसर' यांना हा प्रेस विकला. त्यांचे नातू, पीटरबाबा संधू गेल्या काही वर्षांपर्यंत प्रेस आणि मालमत्तेची देखभाल करीत होते. या छापखान्याचे संग्रहालयात रूपांतर व्हावे अशी मागणी रविवर्मा स्मारक समितीने पाच वर्षांपूर्वी पीटरबाबा यांच्याकडे केली होती. त्यांनीही या गोष्टीला तत्काळ मान्यता दिली. केरळ सरकारनेही मदतीची तयारी दर्शविली. परंतु, पीटरबाबांच्या अकस्मात मृत्यूमुळे संग्रहालयाची कल्पना अर्धवट राहिली.'

## * वारी हे अद्‌भुत भक्तिनाट्य : डॉ. ढेरे

'वारी हे एक अद्‌भुत भक्तिनाट्य आहे. एका अर्थाने लोकमानसात उतरलेले आणि वैश्विक अनुभव देणारे हे दैवत आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांनी केले.

संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांच्या 'वारी : स्वरूप आणि परंपरा' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. 'पद्मगंधा प्रकाशन'तर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

डॉ. देखणे हे भारूड सादरीकरणासाठी प्रसिद्ध असून, संतवाणीचेही अभ्यासक आहेत. 'गोंधळ' या कलाप्रकारावर पुस्तक लिहून त्यांनी यापूर्वीच आदिशक्ती



भवानीचा जयजयकार केला आहे, असे सांगून डॉ. ढेरे म्हणाले, ''कीर्तन-प्रवचन करीत दिंडीत सहभागी झालेले देखणे या पुस्तकाच्या माध्यमातून 'साधक' झाले आहेत. भारूडांचे सामर्थ्य केवळ वारकरी संप्रदाय, पंचदेवस्मार्त नव्हे; तर जैन, महानुभाव, वीरशैव आदी समाजांनीही ते मानले आहे. ज्ञानदेवांनी गीतेला मंत्रप्रतिपाद्य भगवती म्हटले आहे. मी भारूडाला शतरूपा भगवती म्हणतो. हे लेखन मातृशक्तीचा गौरव आहे.'

डॉ. देखणे म्हणाले,'वारी हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक लोकप्रवाह आहे. आळंदी-देहू या ज्ञानपीठापासून वारीची सुरुवात होते. पंढरपूरच्या योगपीठाशी ती संपत असली तरी वारी खऱ्या अर्थाने प्रेमपीठाची वाटचाल आहे.'

## * बनावट पुस्तके

सदाशिव पेठ आणि जंगली महाराज रस्त्यावर छापे घालून सुमारे १३ लाख रुपये किमतीची पावणेपाच हजार नकली पुस्तके जप्त करण्यात आली.

अधिकृत प्रकाशन संस्थांच्या पुस्तकांची कमी प्रतीच्या कागदावर आणि कमी दर्जाची छपाई करून नक्कल करण्यात येत असल्याची तक्रार पोलिसांकडे आली होती. नवी दिल्लीतील 'आय. पी. ब्युटिक इन्फर्मेशन अँड रिसर्च' संस्थेच्या प्रतिनिधींनी ही तक्रार केली. सहायक पोलिस आयुक्त विनोद सातव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राजेंद्र भामरे, तुळशीदास महाजन, सहायक पोलिस निरीक्षक सुनील शिंदे आदींनी ही कारवाई केली.

याप्रकरणी विनोद कांतिलाल ठक्कर (वय ४३, रा. १२५०, भवानी पेठ), अजित जमुनादास ठक्कर (वय ४९, रा. मोतीराम पार्क, कोथरूड), अजय मुकुंद दुधाळ (वय ३६, रा. अप्पर बिबवेवाडी) आणि अजय कन्हय्यालाल सोळंकी (वय २९, रा. ५०३ गणेश पेठ) यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांच्या पथकाने ठक्कर बुक डेपो या दुकानावर छापा घालून सव्वातीन लाखांची बनावट पुस्तके जप्त केली. डेक्कन जिमखान्याजवळ सक्सेस चेंबरमध्ये ठक्कर बुक स्टॉल, संभाजी उद्यानाजवळील टपरी व लष्कर भागात पादचारी मार्गावर छापे घातले.

या पुस्तकांची छपाई मुंबई किंवा अन्यत्र होत असावी, असा संशय असून आरोपींच्या माध्यमातून बनावट पुस्तके बाजारात आणणारी यंत्रणा उजेडात येण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## * ऋग्वेदाची हस्तलिखिते : सांस्कृतिक वारसा

ऋग्वेदाच्या हस्तलिखित प्रती, नेल्सन मंडेला यांच्यावरील खटल्याच्या सुनावणीच्या नोंदी, मध्ययुगीन फ्रेंच बनावटीचे पडदे, सहस्रकापूर्वीच्या काळातील इराणी महाकाव्य, 'द विझार्ड ऑफ ओझ' हा हॉलिवूड चित्रपट यासह किमान ३८ नवीन

चिजांचा समावेश संयुक्त राष्ट्रांच्या सांस्कृतिक वारसा यादीत करण्यात आला आहे.

हिंदूंचा पवित्र धर्मग्रंथ असलेल्या ऋग्वेदाची तीस प्राचीन हस्तलिखिते उपलब्ध आहेत. ती १८००० ते १५००० ख्रि.पू. या काळातील आहेत.

कवी व विभाजनवादी नेते ख्रिस्तोफर ओकिंगबोस यांनी लिहिलेल्या साहित्यातील अप्रकाशित कृतींचाही समावेश सांस्कृतिक वारसा यादीत केला आहे. वर्णविद्वेषाच्या विरोधात लढा देणारे नेल्सन मंडेला यांच्याविरोधात चाललेल्या खटल्याच्या नोंदीचा समावेशही या यादीत केला आहे. मंडेला यांना या खटल्यात जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. याशिवाय गटेनबर्गचे बायबलही त्यात समाविष्ट आहे.

ज्या दस्तऐवजांना जागतिक सांस्कृतिक वारसा यादीत स्थान मिळाले आहे, ते दस्तऐवज डिजिटल स्वरूपात जतन करून उपलब्ध करून दिले जातील. इराणचे कवी फिरदोसी (१९४१-१०२०) यांच्या 'बुक ऑफ किंग्ज' या साहित्यकृतीचा समावेशही त्यात केला आहे. चीनमधील यांगत्सी लेई या राजघराण्याने १७ ते २० वे शतक या काळात ज्या राजप्रासादांची बांधणी केली, त्यांचे नकाशेही जतन करण्यात येणार आहेत.

दक्षिण कोरियातील बौद्धसाहित्य त्रिपीटिका कोरियाना या ग्रंथात आहे. हा ग्रंथ ८१,२५८ लाकडी ठोकळ्यांवर कोरलेले असून त्याचे जतन केले जाणार आहेत. सध्या हे ठोकळे दक्षिण कोरियातील माऊंट काया या पर्वतावर ठेवलेले आहेत. फ्रान्समधील अकराव्या शतकात तयार करण्यात आलेले २३० फूट लांबीचे पडदे जतन करण्यात येणार आहेत.

## * ११० वर्षांपूर्वीची गीतेची प्रत

१८ एप्रिल १८९८ या दिवशी मृत्यूला सामोरे जाताना हातामध्ये गीतेची प्रत असावी म्हणून चापेकरांनी लोकमान्य टिळकांकडे त्यांच्याकडील गीतेची प्रत मागितली होती.

या प्रसंगाचे वर्णन वि. श्री. जोशींनी 'कंठस्नान आणि बलिदान' या चापेकरांच्या चरित्रात केले आहे. 'चापेकरांचे हात मागे बांधण्यात आले व चेहऱ्यावर बुरखा घालण्यात आला. हात मागे बांधलेले असतानाही चापेकरांनी हातामध्ये गीतेची प्रत घट्ट धरली होती. फाशी दिल्यानंतर तासाभराने जेव्हा त्यांना खाली उतरवण्यात आले तेव्हा महत्प्रयासाने ती गीता त्यांच्या हातातून सोडवण्यात आली.'

सदर गीतेची प्रत लोकहितवादी देशमुखांचे खापरपणतू व शिवरामपंत परांजपे यांचे नातू डॉ. यशवंत देशमुख यांच्याकडे असल्याचे 'सीओईपी'तील निवृत्त प्रा. आनंद रेणावीकर यांनी सांगितले. ही प्रत हस्तलिखित असून, तिची लांबी सुमारे सहा इंच, तर रुंदी सुमारे चार इंच आहे. सदर प्रत पुठ्ठ्याने व्यवस्थित बांधलेली आहे. काळी व लाल शाई लिहिण्यास वापरलेली असून, अक्षर सुरेख व पहिल्या पानापासून शेवटपर्यंत सारखे आहे. दोन्ही हातांच्या अंगठ्यांच्या खुणा गीतेच्या



वरील भागात आजही दिसून येतात.

डॉ. देशमुखांच्या वडिलांना त्यांचे मामा सोहोनी यांच्याकडून १९०१ मध्ये ही प्रत मिळाली. हातामध्ये घट्ट पकडल्याने हा ग्रंथ वाकलेला होता तो जड पुस्तकांखाली ठेवून सरळ करावा लागला. १९७० मध्ये डॉ. देशमुखांकडे त्यांच्या वडिलांनी हा ठेवा सुपूर्त केला. ही अमूल्य ठेव असल्याने कुठल्याही संग्रहालयास देण्याचा विचार केला नाही. १९७१ च्या सुमारास वि. श्री. जोशींनी चापेकर बंधूंचे चरित्र लिहिले. त्यामध्ये तिन्ही बंधू हातात गीता घेऊन मृत्यूस सामोरे गेले, असे लिहिले आहे.

## * आयुर्वेद उत्तम, पण योग्य प्रमाणीकरणाची गरज

'आयुर्वेदाची उपचार पद्धती उत्तम असली, तरी वनस्पतींमध्ये विषारी द्रव्य असल्याने त्यापासून बनविलेल्या औषधांचे योग्य प्रमाणीकरण होण्याची आवश्यकता आहे,' असे मत ज्येष्ठ वनस्पतिशास्त्रज्ञ डॉ. आनंद कर्वे यांनी व्यक्त केले.

वनस्पतींचे अस्तित्व टिकून राहावे म्हणून त्या त्यांच्या शरीरात विषारी द्रव्य तयार करतात. मनुष्यास सुमारे ७० वनस्पतींपासून बाधा येत नसल्याचे सांगून डॉ. कर्वे म्हणाले, की आयुर्वेदाची औषधे ही वनस्पतींपासूनच बनविली जातात. त्यामुळे त्यांचे योग्य प्रमाणीकरण होणे जरुरी आहे. याबरोबरच शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होऊ शकतील अशा वनस्पतींपासून कीटकनाशके तयार करता येऊ शकतील. त्यासाठी त्यांना आवश्यक ज्ञान देण्याची गरज आहे.

श्रीकांत पागनीसलिखित 'कॅन्सर रिटर्नड्' व 'व्हाय सफर' या डॉ. ॲन विग्मोर लिखित पुस्तकाचा डॉ. विजया साठे यांनी मराठी अनुवाद केला आहे. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत डॉ. ह. वि. सरदेसाई, कर्करोगतज्ज्ञ डॉ. शेखर कुलकर्णी, पागनीस, डॉ. साठे, शशिकला उपाध्ये आदी उपस्थित होते.

## * सानेगुरुजींचे साहित्य

सानेगुरुजींनी मराठीतून केलेले विपुल साहित्य लेखन आणि त्यांचे विचार लवकरच देशांतील इतर भाषकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने (एनबीटी)पुढाकार घेतला आहे.

'एनबीटी'चे अध्यक्ष प्रा. बिपीनचंद्र यांनी नुकतीच त्याविषयी विचारणा केली. सानेगुरुजींचे साहित्य आणि विचार अजूनही नव्या पिढीसाठी मार्गदर्शक आहेत.

'एनबीटी'च्या आदान-प्रदान योजनेअंतर्गत विविध भारतीय भाषांमधील साहित्य इतर भाषांत अनुवादित केले जाते.

## * मी स्त्रीवादी नाही आणि बंडखोरही नाही : मेघना पेठे

'मी स्त्रीवादी नाही. स्त्रीवाद ही माझ्यासाठी अद्यापही उलगडत जाणारी एक प्रक्रिया आहे. अशा कुठल्या जाणिवा मनात ठेवून मला लिहिता येत नाही,' असे

मत प्रसिद्ध लेखिका मेघना पेठे यांनी मांडले.

साहित्य अकादमी आणि एसएनडीटी महाविद्यालयाचा पदव्युत्तर मराठी विभाग यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध लेखिका कविता महाजन आणि मेघना पेठे यांनी आपल्या गद्यलेखनाचे आणि कवितांचे वाचन केले. पेठे यांनी 'प्रेमस्वरूप आई' या कथेतील काही भाग आणि स्वत:च्या काही कविता सादर केल्या, तर महाजन यांनीही 'भिन्न' या त्यांच्या आगामी कादंबरीतील काही भाग आणि काही कविता म्हटल्या. यावेळी साहित्य अकादमीच्या पश्चिम विभागीय प्रादेशिक कार्यालयाचे सचिव प्रकाश भातंब्रेकर, निमंत्रक डॉ. सदानंद मोरे; तसेच डॉ. रेखा इनामदार-साने व्यासपीठावर उपस्थित होत्या.

दोन्ही लेखिकांच्या साहित्याच्या वाचनानंतर प्रेक्षकांशी खुला संवाद झाला.

'तुमच्या लेखनावर स्त्रीवादी असा शिक्का मारला जातो, हे अन्यायकारक वाटते का?' या प्रश्नावर पेठे म्हणाल्या, 'लेबले लावली की मोकळे होता येते, या वृत्तीने शिक्के मारले जातात. मी स्त्रीवादी नाही, असे माझे मत आहे. मला बंडखोर म्हटले जाते; पण मी तसे मानत नाही. बंडखोरी विरोधातून जन्म घेते. मला आजवर विरोधाचा सामना करावा लागलेला नाही. कामप्रेरणा मनुष्याला असतेच; तीत स्त्री-पुरुष असा भेद नाही. ती निसर्गदत्त आहे.'

'सामाजिक काम आणि लेखन यात प्राधान्य कशाला,' या प्रश्नावर महाजन म्हणाल्या, 'माझ्या दृष्टीने प्रथम माणूस महत्त्वाचा आहे. लेखन करत असताना कुणाला मदत लागल्यास मी लेखन बाजूला ठेवून त्याला मदत करीन.' भातंब्रेकर यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. साने यांनी आभार मानले.

### * ब्रिटनच्या इतिहासातून चर्चिल, गांधी हद्दपार

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि दुसऱ्या महायुद्धात ब्रिटनला विजयश्री मिळवून देणारे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांना ब्रिटनमधील इतिहासाच्या पुस्तकातून हद्दपार करण्यात आले आहे. येथील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या इतिहासाच्या नव्या अभ्यासक्रमात ही करामत करण्यात आली आहे.

पुढच्या शैक्षणिक वर्षापासून अमलात येणाऱ्या या अभ्यासक्रमात गांधीजी आणि चर्चिल यांच्यासह कृष्णवर्णीयांच्या हक्कांसाठी लढणारे मार्टिन ल्युथर किंग; तसेच जर्मनी, रशिया आणि इटलीचे दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील हुकूमशहा ॲडॉल्फ हिटलर, जोसेफ स्टॅलिन आणि बेनिटो मुसोलिनी यांनाही 'विसाव्या शतकाचा इतिहास' या धड्यातून वगळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'वॉर ऑफ रोजेस'सारखी प्रकरणेही या अभ्यासक्रमातून गाळण्यात आली आहेत. त्याऐवजी ११ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना पहिले व दुसरे महायुद्ध, ब्रिटिश साम्राज्य, गुलामांचा व्यापार असे विषय अभ्यासण्यासाठी देण्यात येणार आहेत.



अभ्यासक्रम मंडळानुसार या विद्यार्थ्यांना समकालीन लेखकांमधील डग्लस ॲडम्स, ॲलन बेनेट, विसाव्या शतकातील टी. एस. इलिएट, जॉर्ज ऑरवेल आणि त्यांच्याही आधीचे जेन ऑस्टेन व चार्ल्स डिकन्स यांच्या लेखनाचा अभ्यास करावा लागणार आहे. शेक्सपिअरच्या एका तरी नाटकाचा अभ्यास करण्याची सक्तीही करण्यात आली आहे. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम अधिक सुसंगत करण्यासाठी आणि अध्यापनात अधिक लवचिकता येण्यासाठी हे बदल करण्यात आले असल्याचे सांगण्यात येत आहे.

### * संगीत रंगभूमी

संगीत ऐकवण्याची कलाकारांची कुवत कमी झाली, हे संगीत रंगभूमीच्या खालावलेल्या प्रतिसादाचे प्रमुख कारण आहे, असे मत ज्येष्ठ हार्मोनियमवादक पं. पुरुषोत्तम वालावलकर यांनी 'बालगंधर्व गुणगौरव पुरस्कार' स्वीकारताना म्हटले. बालगंधर्व यांचे पुतणे वसंतराव राजहंस यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी महेश पाटणकर, चंद्रकांत घैसास यांचाही सत्कार झाला.

वालावलकर म्हणाले, 'काळ बदलला हे खरे असले तरी आजच्या कलाकारांची संगीत ऐकवण्याची कुवत पूर्वीसारखी उरलेली नाही. एकूणच 'कला' कमी झाली आहे. तडजोडी स्वीकारल्या जात आहेत. परिणामी संगीत नाटकांचा प्रतिसाद कमी झाला आहे.'

'बालगंधर्व हे माझे दैवत आहे. त्यांच्या नावाचा पुरस्कार म्हणजे त्यांचा आशीर्वाद आहे आणि माझ्या आयुष्यातील अत्यंत अविस्मरणीय दिवस आहे. मी पहिला षड्ज ऐकला तो बालगंधर्वांचा, रंगभूमीवर पहिले पाऊल बालगंधर्वांच्या कडेवर बसून ठेवले, त्यांचे संस्कार रक्तात भिनले आहेत. गंधर्वांसह अनेक दिग्गज कलाकारांचे रियाज तासन्तास ऐकण्याचे भाग्य मला लाभले आहे,' असेही ते म्हणाले. पं. सुहास व्यास यांनी 'सृजनशीलतेला आकार देणारे कलाकार' या शब्दात वालावलकर यांचा गौरव केला. मंडळाचे उपाध्यक्ष सुरेश साखवळकर यांनी प्रास्ताविक केले. महेश पाटणकर यांनी आभार मानले.

### * 'प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची भारतात वानवा'

'चीनच्या तुलनेत लोकशाही, तरुणांची अधिक संख्या आणि नैसर्गिक-सांस्कृतिक वैविध्य या भारताच्या जमेच्या बाजू आहेत. मात्र, भारताकडे प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची कमतरता आहे,' अशी खंत ज्येष्ठ संशोधक डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केली.

जनसेवा फाउंडेशन, 'कास्प', 'यशदा' आणि 'लायन्स क्लब' यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या 'भेटूया दिग्गजांना' या कार्यक्रमात डॉ. माशेलकर यांची प्रकट मुलाखत डॉ. शरच्चंद्र गोखले आणि सविता भावे यांनी घेतली.

'डेमॉक्रसी', 'डेमोग्राफी' आणि 'डायव्हर्सिटी' या तीन 'डी' आघाड्यांवर

चीनच्या तुलनेत भारत पुढे आहे,' असे सांगून डॉ. माशेलकर म्हणाले, 'मात्र 'डिसिप्लिन'च्या चौथ्या आघाडीवर आपण मागे आहोत. त्यासाठी प्रत्येक भारतीयामध्ये 'माय इंडिया' ही भावना निर्माण होण्याची गरज आहे. भारतीयांनी निराशावादी मनोवृत्ती बदलायला हवी. 'सीएसआयआर'चे महासंचालक म्हणून काम करत असताना राजकीय दबावाला न जुमानता मी काही कठोर निर्णय घेतले. मी घडवून आणलेल्या बदलांमुळेच 'सीएसआयआर' आज जागतिक पातळीवरील परिषद बनली आहे.

'आईमुळेच मी घडलो,' असे सांगून डॉ. माशेलकर म्हणाले, 'विज्ञानाकडे वळल्यामुळे न जोपासता आलेली लेखनाची आवड आता आत्मचरित्र लिहून पुरी करण्याचा विचार आहे. ते वाचून प्रत्येक वाचकामध्ये 'होय, मी करू शकतो,' अशी भावना निर्माण व्हायला हवी.''

## * अनुवादित पुस्तकांच्या वाचकसंख्येत वाढ

मराठी वाचक अन्य भाषांतील उत्तम साहित्याकडे मोठ्या प्रमाणावर वळत आहेत. गेल्या पाच वर्षांत अनुवादित साहित्याच्या वाचकांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

ठिकठिकाणी होणारी प्रदर्शने, पुस्तक दालने, प्रकाशनसंस्था, अनुवादक आणि काही वाचक यांच्याशी चर्चा केल्यावर ही बाब स्पष्ट झाली. त्यातही अन्य भारतीय भाषांतून आणि इंग्रजीतून मराठीत अनुवादित झालेल्या पुस्तकांना वाचकांची प्राधान्याने पसंती आहे.

अनुवादित पुस्तकांच्या प्रकाशनात आघाडीवर असणाऱ्या 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे सुनील मेहता म्हणाले, 'इंग्रजीतून तसेच अन्य भारतीय भाषांतून अनुवादित झालेल्या किरण बेदी, सुधा मूर्ती, तस्लिमा नसरीन, एस. एल. भैरप्पा, अरुंधती रॉय, बेट्टी मेहमूदी, फ्रँक बंकर गिलब्रेथ, कार्मेन बिन लादेन, झुंपा लाहिरी यांच्या लेखनाला वाचकांचा उत्तम प्रतिसाद आहे. मुख्य म्हणजे त्यात चरित्र, आत्मचरित्र, कादंबरी, कथा, कविता, लेख, विज्ञान असे अनेक आकृतिबंध आहेत.'

'श्री शुभम'चे संचालक रवींद्र कासार आणि गणेश लोंढे म्हणाले, 'आचार्य अत्रे सभागृहात सुरू असलेल्या आमच्या पुस्तक प्रदर्शनात सर्वाधिक मागणी अनुवादित पुस्तकांना आहे. खुशवंतसिंग, एस. एस. गिल, अरुंधती रॉय, शोभा डे तसेच इयान फ्लेमिंग, मायकेल क्रॉम्प्टन, डेव्हिड जोसेफ, ॲलिस्टर मॅक्लिन, सिडने शेल्डन, जेफ्री आर्चर यांच्या अनुवादित पुस्तकांना वाचकांकडून उदंड प्रतिसाद मिळत आहे. 'डॉलरबहू', 'गोष्टी माणसांच्या', 'अस्तित्व' या सर्वच पुस्तकांचा खप वाढता आहे. तसेच रवींद्र गुर्जर, प्रमोद जोगळेकर, मंगला निगुडकर, विजय देवधर, अशोक पाध्ये, अपर्णा वेलणकर, लीना सोहनी या अनुवादकांच्या नावानेही पुस्तकांची विचारणा होत आहे.'



'राजहंस प्रकाशन'चे संपादक आनंद हर्डीकर म्हणाले, ''अनुवादित पुस्तकांचा वाचक वाढत आहे. 'अग्निपंख', 'एक होता कार्व्हर', 'सुटेबल बॉय', 'दीपस्तंभ' या अनुवादित पुस्तकांची वाढती मागणी हे अधोरेखित करीत आहे.'

अनुवादित पुस्तके आवर्जून घेणारे अरविंद काटदरे म्हणाले, 'मी प्रामुख्याने अनुवादित पुस्तकेच घेतो आणि भेट म्हणूनही पुस्तकेच देतो. वेगळी संस्कृती, वेगळी मनोवृत्ती, वातावरण आणि विश्लेषण अनुवादित पुस्तकांतून भेटते. अनुवादही दर्जेदार असतात.'

### सर्वाधिक खपाची पुस्तके

- चीपर बाय दी डझन- (फ्रँक गिलब्रेथ- मंगला निगुडकर)
- नॉट विदाऊट माय डॉटर- (बेट्टी मेहमूदी- लीना सोहनी)
- वाईज अँड अदरवाईज- (सुधा मूर्ती- लीना सोहनी)
- आय डेअर- (किरण बेदी- आशा कर्दळे)
- इट्स ऑलवेज पॉसिबल- (किरण बेदी- लीना सोहनी)
- लज्जा- (तस्लिमा नसरीन- लीना सोहनी)
- बिझनेस महाराजे- (गीता पिरामल- अशोक पाध्ये)

## * अमेरिकेच्या सिनेटमध्ये वेदमंत्रांचे उच्चारण

अमेरिकी संसदेच्या २१८ वर्षांच्या इतिहासात प्रथमच सिनेट अधिवेशनाच्या प्रारंभी वेदमंत्रांचे पठण करण्यात आले. काही ख्रिस्ती नागरिकांनी त्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला; पण तो फोल ठरला.

नेवाडा येथील मंदिराचे पुजारी राजन झेद यांना सिनेटमध्ये प्रार्थना म्हणणारे पहिले हिंदू पुजारी होण्याचा मान मिळाला. प्रार्थनेची सुरुवात त्यांनी 'ओम'ने केली आणि दहशतवादाच्या छायेत असलेल्या अमेरिकेसाठी कदाचित 'शांती'ची ही प्रार्थना अधिकच भिडणारी ठरली असावी.

भगवा सदरा आणि गळ्यात रुद्राक्षाची माळ घालून श्री. झेद सभागृहात आले. ऋग्वेद आणि भगवद्गीतेतील श्लोक त्यांनी म्हटले. 'परधर्मीयांविषयी दाखवल्या जात असलेल्या आस्थेमुळे सांस्कृतिक सलोखा वाढण्यास मदत होईल,' असे झेद म्हणाले. 'व्हॉइस ऑफ अमेरिका'वरून त्याचे थेट प्रसारण करण्यात आले. हिंदू धर्माची प्रार्थना करण्याचा निर्णय घेणारे सभागृह नेते हॅरी रीड म्हणाले, 'भारत आणि हिंदू यांच्याविषयी गैरसमज असेल, तर गांधींचे स्मरण करा. त्या माणसाने आपले सारे आयुष्य शांततेसाठी वाहून घेतले होते. अब्जावधी लोक जो धर्म आचरतात, त्याचा प्रतिनिधी अमेरिकेच्या सभागृहात येतो आणि आपल्या आकाशस्थ पित्याकडे शांततेची प्रार्थना करतो, ही गोष्ट आपल्यासाठी भूषणावह आहे.'

## * साहित्य अकादमीतर्फे भारतीय काव्याचा विश्वकोश

स्वातंत्र्योत्तर काळातील कथा-कादंबऱ्या, नाटक व काव्य या विषयांवरील

तीन ग्रंथ या व पुढील वर्षी (२००८) प्रकाशित करण्याचे साहित्य अकादमीने ठरविले आहे. सध्या अकादमीतर्फे भारतीय काव्याचा विश्वकोश करण्याचे काम सुरू आहे. या योजनेसाठी ९.७५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

*** संत तुकोबांच्या अप्रकाशित रचना सापडल्या**

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या प्रमाण मानल्या जाणाऱ्या 'गाथे'त समाविष्ट नसलेले तीन अभंग आणि दोन अप्रकाशित आरत्या सापडल्याचा दावा अभ्यासक प्र. रा. अहिरराव यांनी केला आहे.

ते म्हणाले, 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेत कराडच्या जी. एन. जोशी यांच्याकडील एक बाड मी आणि अभ्यासक वा. ल. मंजूळ यांनी आणले. जोशी यांच्या परंपरागत संग्रहात हे बाड होते. त्यातील रचनांचा सूक्ष्म अभ्यास भाषा, विचार, लेखनपद्धती, तत्त्वज्ञान अशा विविध निकषांवर केला आहे. गाथेचे ज्येष्ठ अभ्यासक आणि तुकारामांचे वंशज श्रीधरअण्णा मोरे, डॉ. सदानंद मोरे, दिलीप धोंडे यांच्याशीही याबाबत चर्चा केली असून, मी आणि मंजूळ यांनी 'हे अभंग व आरत्या संत तुकाराम यांच्याच असून त्या अप्रकाशित असाव्यात,' असा निष्कर्ष काढला आहे.

'वाकडे पागोटे पायपोसा गोंडे,' या अभंगात तुकाराम महाराजांनी ढोंगावर आसूड ओढले आहेत. 'हरी जागरणा का रे जाता नये मना' या अभंगात भक्तीविषयीच्या त्यांच्या तीव्र भावना दिसतात. 'येका जिवे आता जिणे जाले दोन्ही' या अभंगात त्यांनी ईश्वराशी असलेले अभिन्नत्व स्पष्ट केले आहे. भाषेची धाटणी, मांडणीतील स्पष्टता थेट तुकोबांची आहे. आराध्य दैवताची स्तुती, भक्तीचा जिव्हाळा आणि श्रद्धा यांनी परिपूर्ण असणारी पांडुरंगाची आरती तुकोबांनी केली आहे. 'ओवाळू आरती पंढरीराया, सर्व भावे शरण आलो तुझिया पाया,' अशी या आरतीची सुरुवात आहे. दुसरी आरती महादेवाची आहे. 'महान महादेवा महाकाळमर्दना' असा तिचा प्रारंभ आहे. या रचना आणि हस्तलिखित अडीचशे वर्षांपूर्वीचे आहे, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. बाडलेखकाला हा ठेवा कुठे मिळाला, याचा उल्लेख नसल्याने यावर अधिक संशोधन होणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

*** आठवे जागतिक हिंदी संमेलन**

आठव्या जागतिक हिंदी संमेलनातील शिफारसी अमलात आणण्याच्या दृष्टीने भारत त्वरित कार्यवाही करील. तसेच, संयुक्त राष्ट्रसंघात हिंदी भाषेला अधिकृत दर्जा मिळावा म्हणून राजनैतिक मार्गाने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही भारताचे परराष्ट्र राज्यमंत्री आनंद शर्मा यांनी दिली.

संयुक्त राष्ट्रसंघात हिंदी भाषेला अधिकृत दर्जा मिळावा म्हणून काही कालावधी निश्चित करणार काय, याबाबत मात्र त्यांनी काहीही सांगितले नाही.

जागतिक हिंदी संमेलनाच्या उद्घाटनाला राष्ट्रसंघाचे सरचिटणीस आणि पन्नास देशांचे राजदूत उपस्थित होते. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघात हिंदी भाषेला अधिकृत दर्जा मिळण्याची शक्यता बळावली आहे.

अधिकृत दर्जा मिळावा म्हणून दोन-तृतीयांश देशांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. हिंदी भाषा आणि देशाच्या सन्मानापुढे खर्चाची पर्वा नाही, असे आनंद शर्मा यांनी येथे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

*** 'जेम्स बाँड'ची नवी कादंबरी**

आपल्या अचाट साहसांनी जगभरात प्रेक्षकवर्ग तयार करणाऱ्या 'जेम्स बाँड'वर प्रख्यात ब्रिटिश लेखक सेबॅस्टियन फालुक्स कादंबरी लिहिणार आहेत. 'डेव्हिल मे केअर' या शीर्षकाची ही कादंबरी 'बाँड'चा मानसपिता इयान फ्लेमिंग याच्या जन्मशताब्दीदिनी, म्हणजे २८ मे २००८ रोजी प्रकाशित केली जाईल.

ब्रिटनमध्ये 'पेंग्विन'तर्फे, अमेरिकेत 'डबलडे'तर्फे आणि 'भारतात 'पेंग्विन बुक्स इंडिया'तर्फे ही कादंबरी वितरित केली जाणार आहे. 'बाँड'वर नवी कादंबरी प्रकाशित होणार असल्याची घोषणा 'इयान फ्लेमिंग पब्लिकेशन'तर्फे गेल्या वर्षी झाली होती. 'दी गर्ल अॅट दी लायन डी'ओर', 'बर्ड साँग' आणि 'शार्लोटी ग्रे' या कादंबऱ्या फालुक्सच्या नावावर जमा आहेत. 'डेली' व 'संडे टेलिग्राफ' आणि 'इंडिपेंडंट' या दैनिकांत त्यांनी पत्रकारिताही केली आहे. आपल्या मानसपुत्रासाठी फ्लेमिंगने लिहिलेल्या 'ऑक्टोपसी' व 'दी लिव्हिंग डेलाईट्स' या कादंबऱ्या १९६६ मध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. 'डेव्हिल मे केअर' ही कादंबरीही 'बाँड'ची परंपरा जपणारी असल्याचे सांगण्यात आले.

'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने 'जेम्स बाँड'च्या ११ कादंबऱ्यांचे अनुवाद प्रकाशित केले असून त्यालाही वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

*** माउंटबॅटनच्या कन्येचे पुस्तक**

'एकाकी' जवाहरलाल नेहरू आणि एडविना माउंटबॅटन यांच्यात गहिरे प्रेमसंबंध निर्माण झाले होते, अशा शब्दांत एडविना यांची कन्या पामेला माउंटबॅटन यांनी उभयतांमधील नात्याचे वर्णन केले आहे. पामेला यांनी 'इंडिया रिमेंबर्ड : ए पर्सनल अकाउंट ऑफ द माउंटबॅटन्स ड्युरिंग द ट्रान्सफर ऑफ पॉवर' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यात एडविना आणि नेहरू यांच्यातील संबंधांविषयी 'ए स्पेशल रिलेशनशिप' नावाचे स्वतंत्र प्रकरण आहे.

आपण नेहरू यांना प्रेमाने 'मामू' अशी हाक मारत असू, अशी आठवण सांगून पामेला यांनी या प्रकरणात लिहिले आहे, 'माझी आई त्यापूर्वीही परपुरुषांच्या प्रेमात पडली होती. वडिलांनाही हे सवयीचे झाले होते. पहिल्यांदा त्यांना खूप

दुःख झाले होते. अर्थात नेहरू व आईचे संबंध काहीसे वेगळे होते.' लॉर्ड माउंटबॅटन यांनी आपल्या थोरल्या मुलीला, म्हणजे पामेलाच्या थोरल्या बहिणीला जून १९४८ मध्ये लिहिलेल्या पत्रातील अवतरण देऊन पामेल यांनी 'शी (एडविना) अँड जवाहरलाल आर सो स्वीट टुगेदर' असे म्हटले आहे.

नेहरूंनी एडविनाला मार्च १९५७ मध्ये लिहिलेल्या पत्राचाही उल्लेख पामेला यांनी केला आहे. या पत्रात नेहरू लिहितात, 'अचानक मला असे वाटू लागले आहे (आणि कदाचित तुलाही असेल), की आपल्यात एक खूप गहिरा बंध निर्माण झाला आहे. अशी अनियंत्रित शक्ती, जिची मला अंधुक जाणीव आहे, आपल्याला एकमेकांकडे खेचते आहे. मी अनेकदा या जाणिवेत पूर्ण बुडून जातो आणि काही वेळा त्यामुळे उल्हसितही होतो. आपण आता अधिक उत्कटतेने बोलतो. जणू एखादा पडदा दूर व्हावा, तसे होऊन आता आपण एकमेकांच्या डोळ्यांत कोणत्याही भय किंवा त्रासाविना पाहू शकतो.'

एडविना १९४७ मध्ये भारतात आली, तेव्हा ४४ वर्षांची होती. एडविना अत्यंत अंतर्मुख होती. या काळात भारतातील अस्थिर राजकीय परिस्थिती सांभाळण्यासाठी वडिलांनी एडविनाच्या जवाहरलालशी असलेल्या नात्याचा सुरेख उपयोग करून घेतला, असे निरीक्षण नोंदविले आहे. त्या लिहितात, 'नेहरू सत्तेच्या सर्वोच्च स्थानी होते आणि एकाकी होते. त्यांच्या मुलीचा विवाह झाला होता आणि तिला नवरा व मुलांची काळजी घ्यायची होती. अशा स्थितीत एडविना नेहरूंची खास मैत्रीण झाली. दोघांचे नाते 'प्लेटॉनिक' स्वरूपाचे होते; शारीर नव्हते. हे प्रेम अखेरपर्यंत टिकले.'

## * 'वास्तव आणि अवास्तव यातील काळ टिपणं म्हणजेच कविता'

आपल्याकडे चांगल्या कविता करणारे कवी फार कमी असून कवितेचे खरे मर्म वास्तव आणि अवास्तव यामधील काळ टिपण्याचे आहे, असे प्रतिपादन 'अभिधानंतर' चे संपादक हेमंत दिवटे यांनी केले.

सलील वाघ लिखित 'ब्लॉग पहिला' या निवडक समीक्षालेखांचे पुस्तक प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी खेळचे संपादक मंगेश नारायणराव काळे, कवी मन्या जोशी, संदीप देशपांडे, डॉ. जयंत गाडगीळ आदी उपस्थित होते.

दिवटे पुढे म्हणाले, कविता आणि गाणी यांच्यामधील फरक रसिकवर्गाला समजत नाही. कवी ग्रेस, मंगेश पाडगावकर यांनी लिहिलेल्या रचना या कविता नसून गाणी आहेत. तर तुकाराममहाराज, मर्ढेकर, अरुण कोल्हटकर, नेमाडे, ढसाळांपासून ते आजच्या नवोदित कवीच्या रचना म्हणजे कविता आहेत. त्यांच्या कवितांना योग्य न्याय आणि प्रसिद्धी मिळावी, असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी सलील वाघ यांनी आपल्या पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त केले, 'अनौपचारिक पद्धतीने कुठलाही गाजावाजा न करता प्रकाशन व्हावे, अशी इच्छा असल्याने



साध्या पद्धतीने समकालीन लेखकांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन केले. समीक्षा, मुलाखत, लेख अशा संमिश्र स्वरूपात हे पुस्तक लिहिले आहे.'

## * राज ठाकरे यांचे ग्रंथप्रदर्शन

ग्रंथप्रसारासाठी गावोगाव होणारे ग्रंथमहोत्सव मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरतात. पुणे, नाशिक, सातारा, मुंबई, सांगली, औरंगाबाद, नागपूर वगैरे ठिकाणी वर्षानुवर्षे महानगरपालिका, नगरपालिका, नॅशनल बुक ट्रस्ट, स्थानिक संस्था वा ग्रंथालये वगैरे वेगवेगळ्या माध्यमातून हे ग्रंथमहोत्सव भरतात. त्यांना प्रतिसादही चांगला मिळतो. सातारा सारख्या ठिकाणीही दरवर्षी होणाऱ्या ग्रंथमहोत्सवात तीन दिवसांत एक कोटी रुपयांची पुस्तके विकली जातात. लोक त्यासाठी उत्सुकतेचे वाट बघत असतात. 'अक्षरधारा', 'साहित्ययात्रा', 'शुभम साहित्य', 'श्रीशुभम्', 'ज्ञानगंगा', 'समर्थ एजन्सीज' वगैरे संस्थाही ग्रंथप्रदर्शने भरवून ग्रंथप्रसाराला मोठा हातभार लावतात (अशा संस्था आज पन्नासावर आहेत). आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक राज ठाकरे यांनीही मुंबईत दरवर्षी भव्य ग्रंथप्रदर्शन भरविण्याची घोषणा केली आहे. यंदा २७ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर या कालावधीत मराठी पुस्तकांचे प्रदर्शन शिवाजी पार्कसारख्या मध्यवर्ती ठिकाणी भरविण्यात येईल. विविध कार्यक्रमांचीही जोड देण्यात येईल. राज्यातील वेगवेगळ्या भागातील विद्यार्थ्यांना या प्रदर्शनाला भेट देण्यासाठी आणण्यात येईल. तालुका पातळीवर ग्रंथालयेही सुरू करण्याचा राज ठाकरे यांचा मानस आहे. राष्ट्रवादीने खेड्यापाड्यांत ग्रंथालये काढली आहेत. त्याद्वारे कार्यकर्त्यांना एक केंद्र मिळवून दिले आहे. राज ठाकरे त्याच धर्तीवर आपला पाया भक्कम करीत असतील तर उत्तमच!

## * ब्रिटिश लायब्ररी- १०,००० सदस्य

ब्रिटिश लायब्ररीने गेल्या चार दशकांत पुण्यातील वाङ्मयप्रेमी रसिकांना ब्रिटनमधील अद्ययावत माहिती देण्याचे कार्य अत्यंत जागरुकपणे चालवले आहे. श्री. शहाणे, वसंत जोशी, सौ. बी या ग्रंथपालांनी आत्मीयतेने व्रतस्थ भावनेने ब्रिटिश लायब्ररीला पुणेकरांची ज्ञानक्षितिजे विस्तारावीत या दृष्टीने वाढवले. लोकाभिमुख धोरण ठेवून सदस्यसंख्येत भर पडावी अशी धोरणे राबवली. ४७ वर्षांपूर्वी पुण्यात स्थापन झालेल्या या ग्रंथालयाने आता दहा हजार सदस्य संख्या गाठली असून चाळीस हजारावर ग्रंथ सतत वाचकांच्या हाती राहू शकतील असा विस्तार केला आहे. १४००/- रुपये वार्षिक शुल्क असूनही पुण्यात दहा हजारावर सदस्य असणारे हे ग्रंथालय पुणेकरांच्या ज्ञानलालसेची साक्ष पटवते. पुण्यात शतकोत्तर वाटचाल करणारीही काही ग्रंथालये आहेत; परंतु त्यांची सदस्य संख्याही एवढी नाही. सदस्य संख्या फार वाढू नये असाच जणू त्यांचा कटाक्ष असतो. पुस्तके बंदिस्त कपाटात ठेवून, ती तशीच धूळही न झटकता ठेवण्यात त्या ग्रंथालयाच्या पदाधिकाऱ्यांना कृतकृत्यता वाटते. गोखले हॉलमधल्या शासकीय

ग्रंथालयात गेल्यावर तर आपण एखाद्या पुरातन तळघरात किंवा उंच उंच रॅक्सच्या भुलभुलैय्यात आलोय असे वाटते. एखादे मासिक हवे असले तरी तेथील कर्मचाऱ्यांच्या कपाळावरच्या आठ्या आधी बघाव्या लागतात; पंधरावीस वाचक एका वेळी आले तरी तेथील खुर्च्या-टेबले भरून जातात. ब्रिटिश ग्रंथालयात शंभरएक वाचक आरामात बसून ओपन शेल्फमधली पुस्तके स्वच्छंदपणे हाताळू शकतात. झेरॉक्स करून घेऊ शकतात. इंटरनेटवर पुस्तकांची माहिती मिळवू शकतात. नवीन डीव्हीडी, मासिके, वृत्तपत्रे चाळू शकतात... ब्रिटिश ग्रंथालयातील अशा सेवा-सुविधा बघून तरी आपण काही करावे असे आपल्या ग्रंथालयांना कधी वाटत नाही– याला काय म्हणावे?

ब्रिटिश ग्रंथालयाने आता विद्यार्थ्यांसाठीही सदस्यत्वात सवलत जाहीर केली आहे. विद्यमान व्यवस्थापक श्रीमती कजरी मित्रा यांनी ब्रिटिश विद्यापीठांची माहिती देण्याचीही खास व्यवस्था करून, तेथे पुणेकर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवण्यासाठी मुलाखती, परीक्षा या सोयीही उपलब्ध केल्या आहेत. एका वेळी तीन पुस्तके, एक मासिक किंवा सीडी सदस्याला घरी नेता येतात. दहा हजार सदस्य असणे याचाच अर्थ एका वेळी चाळीसएक हजार पुस्तके/सीडी बाहेर असणे... यावरून ग्रंथालयाचा व्याप आणि व्यवहार लक्षात येऊ शकेल. इंग्लंडशी संबंधित कुठल्याही विषयाची माहिती मिळण्याचे हे केंद्र भारत व ग्रेट ब्रिटन यांच्यातील सामंजस्य वाढविण्यासाठी आपल्या परीने हातभार लावत आहे यात शंकाच नाही.

❐

**प्रिय वाचकमित्रहो........**

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन
आत दर रविवारी नियमित सुरु राहील.
वेळ - सकाळी १० ते दुपारी ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**



# आगामी




## विद्युत्-प्रकाश

❐

**वि. स. खांडेकर**

❐

**किंमत : ९० रु.**
पोस्टेज : २० रु.

'कथा बीजं दाही दिशांनी मनात येऊन पडतात. प्रत्यक्ष अनुभवलेल्या एखाद्या भावनेच्या छटेपासून ते सहजगत्या कानांवर पडलेल्या चार-दोन ओळींच्या एखाद्या घटनेपर्यंत....

अशा अनेक अनुभवांत कथाबीजं लपलेली असतात. झोपलेलं माणूस एकदम काही तरी टोचल्यामुळं जागं व्हावं, त्याप्रमाणं ज्या अनुभूतीनं संवेदना सचेतन होते आणि कल्पना, भावना व विचार यांच्या त्रिवेणी संगमानं न्हाऊ लागते, तीचं पुढं स्वत:ला हवं तसं कथारुप धारण करु शकते. गेल्या काही वर्षात ज्यांचा कथारुपानं माझ्या हातून अविष्कार झाला, असे काही अनुभव या संग्रहात प्रतिबिंबित झाले आहेत.

या संग्रहातील कथांनी कुणाचं थोडं सात्त्विक रंजन केलं, कुणाला थोडा वाङ्‌मयीन आनंद दिला. एखाद्याला त्यात दिलासा सापडला, तर माझं लेखन सफल झालं, असं मी मानेन.'

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## भक्ष्य-भक्षक या संकल्पनेवर आधारित एका प्रोग्रॅमने उडवलेला हाहाकार

# प्रे (सावज)

**मायकेल क्रायटन**

**अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर**

प्रे (सावज) ही मायकेल क्रायटनची बेस्टसेलर कादंबरी आता मराठीत उपलब्ध झाली आहे. डॉ. प्रमोद जोगळेकर यांनी याआधी मायकेल क्रायटनच्या 'ज्युरॅसिक पार्क', 'द लास्ट वर्ल्ड' वगैरे कादंबऱ्यांचा अनुवाद केला आहे. त्यामुळे मायकेल क्रायटनच्या वाङ्मयीन शैलीशी त्यांचा चांगला परिचय आहे. या कादंबऱ्या काल्पनिक आहेत; परंतु त्यात अद्ययावत वैज्ञानिक संशोधनाचा अत्यंत साक्षेपाने वापर केलेला आहे.

प्राचीन काळातील सजीवांचे डीएनए रेणू मिळवून डायनोसॉरसारखे लाखो वर्षांपूर्वी अस्तंगत झालेले प्राणी पुन्हा निर्माण करणे शक्य आहे ही त्यावेळी केवळ कल्पनेतच शक्य वाटणारी गोष्ट– आता जैवतंत्रज्ञानाने प्रत्यक्षात आणणेही शक्य असल्याचे दाखवून दिले आहे.

'टाइमलाइन'मध्ये टेलिपोर्टेशन द्वारे इतिहासात मागे जाण्याची कल्पना वापरून कथावस्तूची उभारणी केली आहे.

'प्रे'मध्ये नॅनोटेक्नॉलॉजी, जैवतंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रातील अद्ययावत संशोधनाचा मागोवा घेत कथानकाचा डोलारा उभा केला आहे. केवळ सात दिवसांच्या अवधीत घडलेल्या घटना या कादंबरीत आल्या आहेत.

**१**

या कादंबरीचा निवेदक-नायक जॅक फोरमन हा प्रोग्रॅमर आहे. तो भक्षक-भक्ष्य ही कल्पना वापरून एक मॉडेल बनवतो. या कंपनीसाठी हे काम तो करतो, ती कंपनी त्याला कामावरून काढून टाकते. इतरत्रही त्याला काम मिळू देत नाही. त्यामुळे त्याला आपल्या तीन मुलांची देखभाल करीत 'घर-नवरा' बनावे लागते. त्यातील सर्वात लहान मुलगी अमान्डा केवळ नऊ महिन्यांची



असते... त्याची पत्नी ज्युलिआ ही झायमॉस टेक्नॉलॉजी या संस्थेत उपाध्यक्ष असते. या कंपनीने अमेरिकन लष्करासाठी युद्धभूमीवरील शत्रूच्या हालचालींची छायाचित्रे पाठवणारे उडते कॅमेरे (यंत्रमानव) तयार करण्याचे काम स्वीकारलेले असते... त्यासाठी जॅकने तयार केलेला भक्षक-भक्ष्य प्रोग्रॅमचा उपयोग झायमॉस करते, परंतु त्या प्रोग्रॅममध्ये काही बदल केल्याने त्यातून अशा कॅमेऱ्यांची जी निर्मिती होते, ती थव्यांच्या रूपात ढगाप्रमाणे वावरताना बंडखोर वर्तन दाखवते. त्यामुळे नोकरीवरून काढून टाकलेल्या जॅकला ती समस्या सोडवण्यासाठी पाचारण केले जाते... त्याला या थव्यांच्या बंडखोरीचे स्वरूप जाणून घेऊन त्यांचा बंदोबस्त करायचा मार्ग शोधायचा असतो; हे थवे कॉम्प्युटरमधील मेमरी चिपचा फडशा पाडण्यात पटाईत असतात...

**अमेरिकेच्या संरक्षणखात्याला शत्रूच्या प्रदेशात उडत राहून युद्धभूमीवरची छायाचित्रे वा प्रतिमा रिअल टाइममध्ये-तात्काळ पाठवू शकतील असे उडते कॅमेरे- यंत्रमानव हवे होते.**

झायमॉस टेक्नॉलॉजीची प्रयोगशाळा नेवाडाच्या वाळवंटात असते. तेथे जॅक जातो... झायमॉसचे तंत्रज्ञ व जॅकचे पूर्वीचे सहकारी– तसेच ज्युलिआ देखील– चमत्कारिक वागतात, काहीतरी लपवून ठेवतात असे त्याला आढळते... तशात मुलांची देखभाल करण्यासाठी जॅक बहिणीला बोलावतो... या थव्याच्या वर्तनाबाबतचे भयानक वास्तव लक्षात आल्यावर जॅक फोरमन त्यांना नष्ट करण्यासाठी पावले उचलतो तेव्हा ज्युलियाच त्याला विरोध करते... कारण या थव्याने तिला आणि तिच्या सहकाऱ्यांना ई कोलाय या जीवाणूंच्या उत्क्रांतीतून तयार झालेल्या फाज या विषाणूंनी बाधित केलेले असते...

जॅक या भयानक विषाणूंचा पूर्ण संहार करण्यासाठी जे जे प्रयत्न करतो त्याची कहाणी 'प्रे'मध्ये आली आहे.

अमेरिकेच्या संरक्षणखात्याला शत्रूच्या प्रदेशात उडत राहून युद्धभूमीवरची छायाचित्रे वा प्रतिमा रिअल टाइममध्ये– तात्काळ पाठवू शकतील असे उडते कॅमेरे– यंत्रमानव हवे होते. हे उडते कॅमेरे कबुतराप्रमाणे दिसले तर त्यांना शत्रू निकामी करू शकतो, म्हणून हे कॅमेरे अगदी सूक्ष्म– कीटकाच्या आकाराचे बनवण्याची गरज होती. सूक्ष्म कीटकाला नेमके लक्ष्य करून मारता येणे अवघडच नव्हे तर असंभवनीय ठरते. आता कीटकाच्या आकाराच्या यंत्रमानव कॅमेऱ्यासाठी उर्जेचा पुरवठा करणे ही देखील सोपी गोष्ट नव्हे. त्यासाठी कमी आकाराचे नियंत्रण करणारी प्रणाली बनवून तिच्या भिंगाची वियोजनक्षमता ठरवणे हीही एक

**नॅनोकणांच्या एखाद्या ढगामधून हवं तेवढं मोठं भिंग असणारा कॅमेरा बनवला की तो पक्ष्यांच्या थव्याप्रमाणे कमीजास्त विखरू शकतो. गोळी त्याच्या आरपार जाऊ शकते. त्यामुळे हे कण विखुरतात. ते पुन्हा एकत्र येईपर्यंत कॅमेरा अदृश्य होतो.**

समस्याच होती. त्यासाठी पक्ष्यांच्या थव्याची संकल्पना (स्वार्म) वापरून मार्ग काढण्यात आला. नॅनोकणांच्या एखाद्या ढगामधून हवं तेवढं मोठं भिंग असणारा कॅमेरा बनवला की तो पक्ष्यांच्या थव्याप्रमाणे कमीजास्त विखरू शकतो. गोळी त्याच्या आरपार जाऊ शकते. त्यामुळे हे कण विखुरतात. ते पुन्हा एकत्र येईपर्यंत कॅमेरा अदृश्य होतो.

नॅनोकणांना प्राथमिक पातळीवरील बुद्धिमत्ता पुरवणे, थवा बनवण्यासाठी आकाशात घिरट्या घालत असताना त्या नॅनो कणांमध्ये परस्परसंपर्क ठेवण्याची क्षमता निर्माण करणे आवश्यक होते.

थवा बनवणे किंवा विशिष्ट आकारात हालचाल करणे यासाठी त्या थव्याचे नेतृत्व करणारा कोणीतरी हवा असे माणसाच्या सामाजिक वर्तनावरून आपण गृहीत धरतो. परंतु पक्ष्यांच्या थव्याचे वा समुद्रातील मत्स्यांचे नेतृत्व करणारा कोणी नसतो. ते एकमेकांना साध्या उत्तेजना संकेताद्वारे प्रतिसाद देतात आणि त्यामधून सुसूत्र वर्तन निर्माण होते. प्रत्यक्षात कोणीही त्यांचे निमंत्रण वा संचलन करीत नाही... एकेकट्या पक्ष्यामध्येही थवा निर्मिती वर्तनासाठी लागणारी आनुवंशिक नियमावली वा पूर्वरचना अस्तित्वात नसते; त्यांच्या मेंदूमध्येही थवा निर्मिती करण्यास प्रवृत्त करणारी व्यवस्था नसते. 'तुमच्या सर्वात जवळ असणाऱ्या पक्ष्याजवळ राहा– पण त्याच्यावर आदळू नका– तेवढी काळजी घ्या' एवढ्या साध्या नियमामुळे पक्षी थवा करून सुसूत्रपणे उडू शकतात. 'जे वर्तन समूहातल्या एकाही घटकामध्ये प्रोग्रॅमिंग केलेले नसूनही समूहात दिसून येते, त्याला उद्भवणारे वर्तन म्हणतात, ते संगणकांच्या समूहामध्ये, यंत्रमानवांच्या समूहामध्ये किंवा नॅनोकणांच्या थव्यामध्ये आढळून येते. प्रोग्रॅममध्ये प्रक्रिया करणारे घटक, सूक्ष्म यंत्रमानवी घटक (म्हणजे वैयक्तिक एजंट) त्यांच्यामध्ये विशिष्ट ध्येय साधण्यासाठी परस्पर सहकार्याचे किंवा स्पर्धेचे प्रोग्रॅमिंग करता येते... हे प्रोग्रॅम यांत्रिक वा मानवनिर्मित कृत्रिम असूनही ते प्रत्यक्षात सजीवाप्रमाणे वर्तन करू शकतात. परंतु त्यामुळे उद्भवणारे वर्तन अत्यंत अनियमित स्वरूपाचे असते; हे एजंट स्पर्धा करण्याच्या नादात निष्क्रिय होतात किंवा एकमेकांवर अशा प्रकारे प्रभाव टाकतात की आपले ध्येय सोडून इतरच काहीतरी करीत बसतात. त्यामुळे प्रोग्रॅम लिहिणाऱ्यांपुढे अनेक समस्या उभ्या राहतात. खऱ्याखुऱ्या सजीवांच्या वर्तनाचा



नमुना समोर ठेवून प्रोग्रॅममध्ये अपेक्षित ध्येय आणि ते कसे गाठायचे यासाठी आज्ञावली अंतर्भूत करण्याचा मार्ग स्वीकारला गेला. त्यासाठी मुंग्यांच्या वाळवींच्या वारूळांचा अभ्यास करण्यात आला. (१३५)

**यासाठी जॅक हा प्रोग्रॅमर भक्षक-भक्ष्य (प्रेड-प्रे) ही कल्पना वापरून एक मॉडेल बनवतो. भुकेला शिकारी आपल्या ध्येयापासून कधी ढळत नाही, शिकार मिळेपर्यंत तो स्वस्थ बसत नाही.**

यासाठी जॅक हा प्रोग्रॅमर भक्षक-भक्ष्य (प्रेड-प्रे) ही कल्पना वापरून एक मॉडेल बनवतो. भुकेलेला शिकारी आपल्या ध्येयापासून कधी ढळत नाही, शिकार मिळेपर्यंत तो स्वस्थ बसत नाही. त्यासाठी जॅक तरसांच्या टोळ्या, शिकारी कुत्र्यांच्या टोळ्या, लष्करी मुंग्यांची सावजावर हल्ला करण्याची पद्धत यांचा अभ्यास करतो.

## २

हा प्रोग्रॅम ज्या कंपनीसाठी त्याने बनवला त्या मिडिआट्रॉनिक्स कंपनीच्या काही गैरव्यवहारांमुळे जॅक ती कंपनी सोडून देतो... ती कंपनी त्याला अन्यत्र जॉब मिळू नये अशी व्यवस्था करते... त्यामुळे जॅकला घरी बसून आपल्या तीन मुलांची देखभाल करण्याचे काम करावे लागते. त्याची पत्नी ज्युलिया ही झायमॉस टेक्नॉलॉजी या नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेत काम करीत असते. या दांपत्याला कन्या निकोल (१२ वर्षे), एरिक (आठ वर्षे) आणि मुलगी अमान्डा (९ महिने) अशी तीन मुले असतात.

जॅक हा 'वितरित समांतर संगणक प्रक्रिया' किंवा 'एजंटवर आधारित संगणक कार्यक्रम' या प्रक्रियेतला तज्ज्ञ असतो. मुंग्यांच्या अन्न गोळा करण्याच्या पद्धतीची नक्कल करणारा एक प्रोग्रॅम तो लिहितो, अन्नाकडे जाण्याचा सर्वात जवळचा मार्ग मुंग्या कसा शोधतात हे बघून त्या कल्पनेचा वापर टेलिफोनच्या जाळ्यांमध्ये संदेशवहन करण्याचा मार्ग ठरवण्याच्या प्रोग्रॅममध्ये तो करतो. भक्ष्याचा पाठलाग करणारा सिंह, थवा वेगळा करणाऱ्या मधमाशा, वाळवींची गृहरचना याचा अभ्यास करूनही 'वितरीत समांतर संगणक प्रक्रिया प्रोग्रॅम' तयार करतो. या कंपनीच्या सोर्स कोर्डची चोरी झाल्यामुळे जॅक सुरक्षिततेकडे लक्ष देतो; त्यात आपला बॉस डॉन ग्रॉस याचाच हात असावा असा संशय त्याला येतो... तेव्हा त्याचा वकील त्याला ती कंपनी सोडायचा सल्ला देतो. तसे तो बॉसच्या कानावर घालतो तेव्हा 'बेजबाबदारपणा आणि गैरवर्तन' या आरोपावरून त्यालाच कंपनीमधून डच्चू

**रेणू पातळीवरील उत्पादन ही अत्यंत अवघड गोष्ट. ती साध्य करण्यासाठी ऑक्टोपस सारखी असेंब्ली यंत्रणा नेवाडा वाळवंटात एका तीन मजली काचेच्या आवरणात उभारण्यात येते.**

दिला जातो आणि गुप्तता राखण्याच्या निवेदनावर सही करण्यास त्याला भाग पाडण्यात येते.

त्याचा त्या क्षेत्रातील व्यासंग अत्युत्कृष्ट असूनही इतर कंपन्या त्याला जॉब देण्याचे टाळतात... त्यामुळे सहा महिने त्याला घरीच राहावे लागते. आपल्याविरुद्ध जणू कटच रचला गेला आहे असे त्याला जाणवत राहते. 'घर-नवरा' होणे त्याला आवडत नाही, परंतु जॅकची पत्नी ज्युलिया झायमॉस टेक्नॉलॉजीमध्ये उपाध्यक्ष होती. ही कंपनी 'रेण्वीय उत्पादन' या नवीन तंत्रज्ञानाच्या संशोधनात कार्यरत होती. अमेरिकन संरक्षणखात्याने या कंपनीला युद्धभूमीवरची छायाचित्रे वा प्रतिमा तात्काळ पाठवू शकतील असे उडते कॅमेरे– यंत्रमानव तयार करण्याचे काम झायमॉस टेक्नॉलॉजीला देण्यात येते. ही संस्था डॉन ग्रॉस याच्या मीडिआट्रॉनिक्स या कंपनीकडून प्रेड-प्रे प्रोग्रॅमचे सॉफ्टवेअर घेऊन प्रयोगशाळेत नॅनो तंत्रज्ञानाने सूक्ष्म यंत्रमानवी कणांचे थवे निर्माण करते. त्यांच्याकडून हवे ते काम करवून घेता येते.

रेणू पातळीवरील उत्पादन ही अत्यंत अवघड गोष्ट. ती साध्य करण्यासाठी ऑक्टोपस सारखी असेंब्ली यंत्रणा नेवाडा वाळवंटात एका तीन मजली काचेच्या आवरणात उभारण्यात येते. ती रचना प्रथमदर्शनी हवेत तरंगत आहे असा भास होतो. अनेक फांद्या असणाऱ्या झाडासारखी ही रचना असते. मध्यभागी खालपासून वरपर्यंत जाणारी चौकोनी नळी, तिच्यापासून निघालेल्या व सगळीकडे पसरलेल्या नळ्या, त्या छोट्या नळ्यांच्या पुढे आणखी छोट्या नळ्या, सर्वात छोट्या नळ्या पेन्सिलसारख्या जाडीच्या. त्यावर हिऱ्यांच्या पावडरीचा लेप चढवलेला. अंतिमत: काच हा द्रवपदार्थ असल्याने त्यामधून रेणू सहज आतबाहेर करू शकतात म्हणून त्यावर लेप. छोट्या नळीमधून रेणूंचे तुकडे आत पाठवल्यावर त्यांच्यात आणखी अणूंची जोडणी करून ते पुढच्या मोठ्या नळीत जात; तेथे आणखी अणूंची भर पडे व ते मोठ्या नळीत जात. रचना पूर्ण झाल्यावर हे रेणू मुख्य नळीत येतात. कारच्या असेंब्ली लाइनसारखीच ही रचना असते. रेणूला प्रथिनाचे रेणू आणि मिथाईल रेणूगट जोडण्याचे काम झाल्यावर ३३ टेस्ला चुंबकीय क्षेत्र निर्माण करणाऱ्या पल्स फील्ड मॅग्नेटमधून नेण्यात येतात... किटलीसारख्या मोठ्या टाक्यांमध्ये सूक्ष्म जीवांचे संवर्धन करून रेणू बनवण्यासाठी



झायमॉसने जीवाणूंकडून नॅनो असेंब्लरचे काम करून घेण्याचा अभिनव मार्ग शोधून काढला होता. जनुक अभियांत्रिकी आणि नॅनो तंत्रज्ञान यांची सांगड घातली होती. जीवाणूच्या जनुकामधील संकेत उलगडणे किंवा जीवाणूच्या जनुकामध्ये नवीन भाग घुसवण्यासाठी संगणकाची मदत घेणे यामध्ये तसा फरक नसतो. या प्रकारे थीटा-डी-५९७२ या पेशी (इ. कोलायचा एक प्रकार) वाढवून, सत्तावीस प्रकारचे प्राथमिक रेणू मिळवले जातात; जीवाणूच्या पृष्ठभागावर चिकटवण्यासाठी मेदपदार्थावर आधारित रचना सुसह्य व्हावी म्हणून असेंब्लरचा आराखडा बदलून, थिटा-डी-जीवाणूवर असेंब्लर स्वार होतात आणि हे असेंब्लर कॅमेऱ्याची जुळणी करतात... हा कॅमेरा हवेत उडतो- रेणू स्वरूपातील हेलिकॉप्टरसारखा त्याची बाहेर आलेली टोके मोटारीचे काम करतात... हे सूक्ष्म यंत्र हवेच्या अर्धप्रवाही गुणधर्माचा वापर करून हवेत उडते...

**या प्रकारे थीटा-डी-५९७२ या पेशी (इ. कोलायचा एक प्रकार) वाढवून, सत्तावीस प्रकारचे प्राथमिक रेणू मिळवले जातात; जीवाणूच्या पृष्ठभागावर चिकटवण्यासाठी मेदपदार्थावर आधारित रचना सुसह्य व्हावी म्हणून असेंब्लरचा आराखडा बदलून, थिटा-डी-जीवाणूवर स्वार होतात**

अत्यंत सूक्ष्म पातळीवर काम करणारे हे यंत्र, हा कॅमेरा बाहेरच्या वातावरणात साध्या झुळकीमुळेही वाहून जात असल्याने अमेरिकन संरक्षण विभागाच्या दृष्टीने व्यवहार्य ठरत नाही. त्यामुळे संरक्षण विभाग झायमॉसशी केलेला रद्द करतो. हा प्रकल्प गुंडाळण्याची पाळी लवकरच येणार असे सर्वांना वाटते. तशी पाळी येऊ नये म्हणून ज्युलिया आणि प्रकल्पावर काम करणारे सर्वजण धडपडत असतात.

नेवाडा वाळवंटात एक प्रयोगशाळा उभारलेली असते. तिच्यात दहा संशोधक-शास्त्रज्ञ काम करीत असतात. अत्यंत दक्षता घेत त्यांचे रेणूच्या पुनरुत्पादनाचे कार्य चालू असते. हा प्रकल्प रद्द झाला तर फार मोठा आर्थिक फटका बसणार हे उघड असते.

## ३

झायमॉसच्या तंत्रज्ञांकडून या प्रयोगात एक मोठी चूक होते. खरे तर ती चूक कंत्राटदाराची आहे असे तंत्रज्ञ मानतात.

सूक्ष्मजीव गाळू शकणाऱ्या हवेच्या गाळण्यांचे अनेक थर असणारी हवेसाठीची झडप या प्रयोगाला लागते. ही झडप तयार करताना कंत्राटदार त्यामध्ये गाळण्या बसवायचे विसरतो. त्यासाठी आवश्यक त्या खाचा तो पाडत नाही. तसेच यंत्र चालू होते– आणि तीन आठवड्यात न गाळलेली हवा वातावरणात मिसळत

**एजंटसाठी प्रोग्रॅम लिहिताना, एजंटनी परस्पर सहकार्य करून विशिष्ट काम पूर्ण करणे हे उद्दिष्ट समोर असते. एजंट स्वतंत्र वृत्तीने वागू लागतील असा विचारही मनात येणे अशक्य होते. हा एजंट इतका सूक्ष्म असतो की त्याला बाहेरून ऊर्जा पुरवावी लागते.**

जाते. या हवेत ई-कोलाय, असेंब्लर रेणू– हे सर्व असतात. ते कण वाऱ्यामुळे नेवाडाच्या वाळवंटात शेकडो मैलपर्यंत विखुरले जातात. सूक्ष्म कॅमेऱ्यांच्या थव्यांचे ढग सतत आकार बदलत वातावरणात इकडेतिकडे जात राहतात. त्यांच्यावर या प्रयोगशाळेचे नियंत्रण उरत नाही. प्रयोगशाळेतील रेडिओ संदेशांना हा थवा प्रतिसाद देत नाही. हा थवा बंडखोर वर्तन करीत आहे. तो ढग स्वतंत्र असल्यासारखा वागतो... त्याचा बंदोबस्त करण्यासाठी हा प्रोग्रॅम लिहिणाऱ्या जॅकने मदत करावी म्हणून त्याला पाचारण करण्यात आलेले असते.

जॅकला प्रथमच या समस्येचे भयंकर स्वरूप जाणवते. अशी समस्या उद्‌भवेल असे त्याला काय, कुठल्याही प्रोग्रॅमरला जाणवले नव्हते.

एजंटसाठी प्रोग्रॅम लिहिताना, एजंटनी परस्पर सहकार्य करून विशिष्ट काम पूर्ण करणे हे उद्दिष्ट समोर असते. एजंट स्वतंत्र वृत्तीने वागू लागतील असा विचारही मनात येणे अशक्य होते. हा एजंट इतका सूक्ष्म असतो की त्याला बाहेरून उर्जा पुरवावी लागते. उर्जेचा स्रोत बंद केला तर एजंट मृतप्राय होतात.

झायमॉसने या एजंटांमध्ये पाइझो चकती बसवलेली असते. ती फोटॉनपासून उर्जा तयार करते. त्यामुळे हे एजंट उर्जेबाबत स्वयंपूर्ण असतात... तीन तासापर्यंत चार्ज राहू शकणारे कपॅसिटर्सही त्यात बसवलेले असतात. हा थवा अंधार पडल्यावर तीन तासांनी खलास व्हायला हवा. त्यांच्यात अल्ट्राव्हायोलेट किरणांमध्ये निळसर-हिरव्या रंगाने चमकणारे मार्कर बसवलेले आहेत; परंतु रात्रीच्या वेळी तरीही त्यांचा शोध घेणे व त्यावर ताबा मिळवणे हे झायमॉसच्या तंत्रज्ञांना शक्य होत नाही...

'हे थवे रात्रीच्या वेळी एखाद्या बिळात किंवा आडोशात लपून राहत असणार– त्यांच्यात लपण्याची क्षमता असणार...' जॅक आपला तर्क प्रकट करतो.

संगणकाच्या स्क्रीनवर या थव्याच्या ढगाची हालचाल बघून जॅक काही निष्कर्ष काढतो. वाऱ्याचा वेग वाढला की हा थवा खाली बसतो. जमिनीलगत रेंगाळतो. वारा कमी झाला की तो पुन्हा वर चढतो... हे उद्‌भवलेले वर्तन आहे... ते प्रोग्रॅममध्ये लिहिलेले नसते. याचा अर्थ प्रत्येक एजंटकडे मेमरी आहे... ही मेमरी शेजारच्या एजंटशी संवाद साधू शकेल एवढीच आहे...



### ४

भक्ष्य-भक्षक अशा स्वरूपाचा प्रोग्रॅम असल्याने हा थवा एखाद्या प्राण्याचा (उदा. ससा, सर्प) पाठलाग करून त्याला ठार करू शकतो– हे बघून जॅकला आपला प्रोग्रॅम उत्तम प्रकारे काम करीत आहे हे लक्षात येते. (१५७)

तरीही 'हा थवा कॅमेऱ्यांचा आहे, मग तो सशाला ठार का करतोय?'असा प्रश्न जॅकला पडतो. त्यावर त्या प्रकल्पावर काम करणारा रिकी 'मला त्याची कल्पना नाही' असे उत्तर देतो.

प्रेड-प्रे प्रोग्रॅम हा सजीव प्रणालीची नक्कल करणारा होता.

**मूळच्या प्रोग्रॅममध्ये बदल करून कोणीतरी या थव्याला स्वयंचलित आणि टिकाऊ बनवले आहे. नॅनो कणांचा हा बंडखोर थवा आहे आणि त्याचा नाश करायला हवा. आपण त्यांचा नाश करू शकू अशी खात्रीही जॅकला वाटते.**

सावज टिपल्यावर भक्षक त्याचा चट्टामट्टा करतात; परंतु हे सूक्ष्म यंत्रमानवी एजंट भक्ष्य टिपल्यावर त्याचे काय करतात असा विचार जॅकच्या मनात येतो. मूळ प्रोग्रॅममध्ये त्याबद्दल काय लिहिले आहे ते त्याला आठवत नाही. सशावर हल्ला करून सशाला ठार केल्यावर काही मिनिटांनी थवा एका लयीत वर जाऊ लागतो.

त्यावरून जॅकच्या लक्षात एक महत्त्वाची गोष्ट येते.

मूळच्या प्रोग्रॅममध्ये बदल करून कोणीतरी या थव्याला स्वयंचलित आणि टिकाऊ बनवले आहे. नॅनो कणांचा हा बंडखोर थवा आहे आणि त्याचा नाश करायला हवा. आपण त्यांचा नाश करू शकू अशी खात्रीही जॅकला वाटते. थव्यांचे पुनरुत्पादन होते; हे थवे शिकारी वृत्तीचे होते; आपल्या प्रोग्रॅममध्ये काही बग राहून गेला आहे का अशीही शंका त्याच्या मनाला चाटून जाते.

जॅक त्या सशाचे काय झाले ते बघण्यासाठी सशाजवळ जातो. त्याच्याबरोबर कॅमेरा घेऊन रोझी कास्ट्रो ही देखील जाते. डाव्या डोळ्यावर व्हिडिओ कॅमेरा व हेडसेट बसवून जॅक सशाकडे जातो. रोझी त्या सशाचे तिथल्या तिथे डिसेक्शन करते. सशाच्या जठराच्या अस्तरात नॅनो कण मिळतात. ते अन्ननलिकेतून खाली घुसलेले असतात. श्वासनलिकेतही नॅनो कण दिसतात. ती श्वासनलिका आतून काळी पडलेली असते...

जॅक व रोझी यांनी लगेच तेथून परतावे असा संदेश डेव्हिड ब्रूक्स वगैरे मुख्य इमारतीतील सहकारी देतात... जॅकला ते म्हणतात, 'पळत पळत ये.'

जॅक मागे बघतो– तर तो थवा त्याच्या मागे लागलेला असतो... तो थवा मुख्य दरवाजाशी जॅकची वाट अडवून उभा असतो.

**याचा अर्थ या थव्यांचे पुनरुत्पादन होते. जीवाणूंमधून हे असेंब्लर तयार होतात. त्यांना स्वतःची निर्मिती करता येते, त्यामुळे एकमेकांशी जुळून ते मोठे रेणू बनवत जातात. त्यातून सूक्ष्म एजंट तयार होतात. त्यांना फारशी मेमरी लागत नाही.**

प्रेड-प्रे प्रोग्रॅमच्या कोडमध्ये हा थवा हलणाऱ्या उद्दिष्टाचा पाठलाग करील अशी आज्ञावली असते... तेव्हा हातातली काळी पिशवी गरगर फिरवून जॅक ती दूर भिरकावून देतो– तो थवा त्या पिशवीमागे धावतो... पण जॅकच्या हालचालीमुळे दुसरा थवा त्याच्यामागे लागतो. त्याची वाट अडवतो... हा भाग मूळच्या प्रोग्रॅममध्ये नसतो... परिस्थितीनुसार वर्तन बदलण्याची क्षमता मूळ प्रोग्रॅममध्ये नसते...

आपल्या अंगावरचा शर्ट गरगर फिरवत जॅक मध्ययुगीन योद्ध्याप्रमाणे त्या कणांच्या थव्यात शिरतो– आपल्या शरीरावर असंख्य सुया टोचल्या जाताहेत अशा वेदना त्याला होतात...

पण तो त्या इमारतीत शिरतो. एअर लॉकच्या पलीकडे दाराशी उभा राहतो– दार उघडते. तो आत शिरतो. दार बंद होते. त्याच्यावर रसायनांचा फवारा मारला जातो– तो बेशुद्ध पडतो.

ॲनाफायलेक्टिक शॉकमुळे, जबरदस्त ॲलर्जीसारख्या प्रतिक्रियेमुळे जॅकचा श्वास कोंडला जातो. कोलिफॉर्म टॉक्सिन (इ-कोलाय) च्या जीवाणूला जॅकच्या शरीराने प्रतिक्रिया दिली असे निदान मे चॅंग ही शास्त्रज्ञ करते.

डेव्हिड त्याला सांगतो, 'पाचसहाशे किलो संदूषक पदार्थ जीवाणू, रेणू आणि वेगवेगळे असेंब्लर– गेल्या तीन आठवड्यात एक्झॉस्ट फॅनमधून बाहेर टाकले गेले. दोन आठवड्यापासून हे थवे दिसू लागले... ते थवे मेमरी चिपमधील कार्बन असणारा भाग खाऊन टाकतात. त्याचा भुगा करतात. त्यामुळे बरेच संगणक बिघडले आहेत.' (१८३)

याचा अर्थ या थव्यांचे पुनरुत्पादन होते. जीवाणूंमधून हे असेंब्लर तयार होतात. त्यांना स्वत:ची निर्मिती करता येते, त्यामुळे एकमेकांशी जुळून ते मोठे रेणू बनवत जातात. त्यातून सूक्ष्म एजंट तयार होतात. त्यांना फारशी मेमरी लागत नाही. वितरित बुद्धिमत्तेचा मुख्य गाभा म्हणजे मेमरी कमी लागते. अनुभवातून एकत्रितपणे शिकण्याएवढे ते बुद्धिमान आहेत. प्रेड-प्रे प्रोग्रॅममुळे ते समस्या सोडूव शकतात. नवनवीन गोष्टी ते निर्माण करू शकतात. एकत्रित बुद्धिमत्ता असल्याने अनुभवातून शिकणारे हे थवे– सजीवाप्रमाणे वागतात. या यांत्रिक सजीवांपासून निर्माण झालेला हा एक प्रकारचा प्लेगच होय. यांच्या उत्क्रांतीचा वेगही फार प्रचंड आहे. त्याच्यामध्ये क्षेत्रीय प्रभुत्वाची कल्पनाही असावी. मुख्य



इमारत म्हणजे त्यांना आपले हक्काचे क्षेत्र वाटत असावे...

**या थव्याची आणखी काही वैशिष्ट्ये जॅक सांगतो. या थव्यामध्ये कोणीही नेता नसतो. त्याच्यात मध्यवर्ती बुद्धिमत्ता केंद्र नसते. त्याची बुद्धिमत्ता ही सर्व नॅनो कणांच्या बुद्धिमत्तेची बेरीज या स्वरूपात असते.**

## ५

या थव्याशी जॅक फोरमनची पत्नी ज्युलिया आरंभी खेळत राही... तिला हा थवा जिवंत ठेवायचा होता. त्यावर नियंत्रण ठेवायचे होते. या थव्यामुळे कंपनीला फायदा होईल असे ज्युलियाला वाटत असते. हा थवा जिवंत आहे– म्हणून त्याला एखाद्या लहान मुलाप्रमाणे वागवावे ही तिची कल्पना. हा थवा तिच्या वागण्याला प्रतिसाद देऊ लागला... तिने दिलेल्या मोठ्या खेळण्यांशी खेळू लागला. त्या थव्यांपैकी एक छोटा थवा तिचा खास आवडता होता. तो थवा नेहमी तिच्या अवतीभवती रहायचा. ती त्याच्याशी बोलायची... तो थवा तिचे ऐकायचा... चमत्कारिक आवाज काढायचा...

या थव्याचा लवकरात लवकर नाश करण्याची गरज आहे असे जॅक फोरमन सांगतो. पेन्टागॉनला कळवून लष्कराला पाचारण करून या थव्यावर नियंत्रणाची व्यवस्था करायला हवी असे तो म्हणतो, पण तेथील शास्त्रज्ञ त्याला विरोध करतात. कंपनी बरबाद होईल. ती वाचवायला हवी असे त्यांचे प्रतिपादन असते. त्याचमुळे ते जॅकला या प्रोग्रॅमिंगचे बदललेले कोड देण्याची टाळाटाळ करतात.

तेवढ्यात डेव्हिडवर हा थवा हल्ला करतो. डेव्हिड तडफडत पाय झाडू लागतो. काही वेळातच त्याची हालचाल थांबते.

या थव्याची आणखी काही वैशिष्ट्ये जॅक सांगतो.

या थव्यामध्ये कोणीही नेता नसतो. त्याच्यात मध्यवर्ती बुद्धिमत्ता केंद्र नसते.

त्याची बुद्धिमत्ता ही सर्व नॅनो कणांच्या बुद्धिमत्तेची बेरीज या स्वरूपात असते.

हे नॅनोकण आपोआप थव्यांच्या रूपात संघटित होतात... हे थवे आपल्यासारखे– माणसासारखे दिसण्याचा प्रयत्न करतात... त्यामुळे एकाच वेळी तीन-तीन चार्ली तीन ठिकाणी असल्याचा भास होतो...

थव्यांवर ताबा ठेवता येत नाही हे लक्षात आल्यावर रिकीने त्यातील धोका ओळखून त्या थव्यांना वेळीच नष्ट करायला हवे होते... ते न केल्याने आता त्यांची उंची अत्यंत प्रचंड वेगाने होत होती, त्यांची वाढ रोखणे अवघड झाले होते. थव्यामध्ये असणाऱ्या ई-कोलाय जीवाणूमध्ये उत्क्रांती झाली होती आणि

> **असेंब्ली लाइनमध्ये विषाणू सोडायचे, त्यामुळे त्यांची निर्मिती प्रचंड प्रमाणात होईल आणि ते विषाणू हवेत पसरवायचे- स्प्रिंकलरमध्ये सोडायचे म्हणजे इथले शास्त्रज्ञ विषाणू असलेल्या पाण्याने चिंब भिजतील आणि त्यांच्यापैकी कोणी संसर्ग-बाधित असेल तर लक्षात येईल...**

त्यावेळी टँकमध्ये जीवाणूंना संसर्ग घडवणारे जे फाज विषाणू होते त्यांच्यातही उत्क्रांती झाली होती.

असेंब्ली लाइनमध्ये विषाणू सोडायचे, त्यामुळे त्यांची निर्मिती प्रचंड प्रमाणात होईल आणि ते विषाणू हवेत पसरवायचे– स्प्रिंकलरमध्ये सोडायचे म्हणजे इथले शास्त्रज्ञ विषाणू असलेल्या पाण्याने चिंब भिजतील आणि त्यांच्यापैकी कोणी संसर्ग-बाधित असेल तर लक्षात येईल... ही जॅकची योजना.

तो या जीवाणूंचा आक्रमक प्रकार नष्ट करून टाकण्यात यश मिळवतो. हेलिकॉप्टरमधून जॅक आपल्या घरी येतो. बरोबर मे ही डॉक्टरही असते. बाकीचे सर्वजण नेवाडामध्येच राहतात.

झायमॉसची वाळवंटामधील सर्व फॅसिलिटी नष्ट होते.

त्या ठिकाणी असणाऱ्या मिथेनच्या आगीच्या लोळाचे तापमान दोन हजार डिग्री फॅरनहीट असते. या तापमानाला कोणताही सजीव प्राणी टिकू शकत नाही. त्यामुळे तेथे कोणाचाही मृतदेह किंवा सांगाडा मिळाला नाही.

### ६

स्वयंचलित यंत्रमानवाच्या संदर्भातील नवे झायमॉस अल्गोरिथम बनवण्याचा पहिला प्रयोग डॅनी हिलीस याने करून दाखवला होता.

आर्टिफिशियल लाइफ, स्वार्म इंटेलिजन्स, सेल्फ ऑर्गनायझेश इन बायॉलॉजिकल सिस्टिम्स, मॅक्रोपॅरासाइटस, नॅनोसिस्टिम्स, मल्टी-एजंट सिस्टिम्स, डिस्ट्रिब्युटेड आर्टिफिशियल इंटेलिजन्स, स्पॉटॅनियस इमर्जन्स ऑफ सेल्फ-रिप्लिकेटिंग प्रे-प्रिडेटर गेम मॉडेल, को-इव्हॉल्विंग प्रिडेटर अँड प्रे रोबोट यासारख्या विषयांवरील बऱ्याच पुस्तकांची यादी शेवटी दिलेली आहे. त्यामुळे ही कथावस्तू काल्पनिक असली तरी विज्ञानविषयक ज्या संकल्पना त्यात आलेल्या आहेत, त्यांना भक्कम वैज्ञानिक पाया आहे असे म्हणता येईल.

मायकेल क्रायटनसारखे लेखक एखाद्या वैज्ञानिक कल्पनेच्या पाठपुरावा करून तिच्याभोवती कथावस्तू निर्माण करतात तेव्हा किती मेहनत घेतात हे बघून कोणीही थक्क होईल. मराठीत अशी मेहनत घेऊन लिहिणाऱ्या लेखकांची नवी पिढी यायला हवी. ती मराठी साहित्य विश्वपातळीवर नेऊ शकेल.

**पृष्ठे : ३७७ ● किंमत : ३०० रु. ● सभासदांना : २१० रु. ● पोस्टेज : २५रु.**



## दखल

**कॅनडातील 'Mcclelland & Stewart' या प्रकाशनसंस्थेच्या सन्मानार्थ कॅनडा सरकारने खास टपाल तिकीट काढले आहे.**

**२००६ साली या प्रकाशनसंस्थेला १०० वर्षे पूर्ण झाली. 'कॅनडा'च्या सांस्कृतिक जडणघडणीत महत्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल या प्रकाशनसंस्थेचा गौरव करण्यात येत आहे असे कॅनडा सरकारने आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.**






## देहविक्रय करणाऱ्या एका केरळीय महिलेची आत्मकथा

# सेक्स वर्कर

**नलिनी जमीला**

**अनु. सुप्रिया वकील**

सेक्सवर्कर हे देहविक्रय करणाऱ्या एका महिलेचे मूळ मल्याळी भाषेतील आत्मकथन तीन वर्षांपूर्वी 'डी सी बुक्स' या कोट्टायमच्या अग्रगण्य प्रकाशनसंस्थेने प्रसिद्ध केले. त्याचवेळी त्याबद्दलच्या बातम्या भारतातील सर्व वृत्तपत्रांमधून झळकल्या आणि या पुस्तकाविषयी कुतूहल चाळवले गेले. 'औप्यू लैंगिकतेळिळालीयुडे आत्मकथा'च्या पहिल्या शंभर दिवसांत सहा आवृत्त्या निघाल्या आणि त्याच्या १३ हजार प्रती विकल्या गेल्या. पुढे इंग्रजी व इतर भाषांमध्येही ते निघाले.

या आत्मकथनाचा मराठी अनुवाद 'सेक्स वर्कर' या नावाने उपलब्ध झाला आहे. नलिनी जमीला हिने आपल्या आयुष्याची झालेली परवड मांडणारे हे पुस्तक लिहिले हेच एक आश्चर्य मानायला हवे. ती काही लेखिका नव्हे, सराईत लेखिका तर नव्हेच नव्हे.

आपल्या आयुष्यातील काही नाट्यपूर्ण घटनांबद्दल परिचितांशी ती बोलत असे, तेव्हा 'हे सर्व तू लिहून काढ' असे मित्रांनी सुचवले. तशात देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांबाबत जागृती निर्माण करणाऱ्या ज्वालामुखी या संस्थेच्या माध्यमातून आणि 'फेस्टिवल ऑफ प्लेझर' या सेक्स वर्कर्सच्या परिषदेच्या आयोजनातून नलिनी जमीला हिला भरपूर प्रसिद्धी मिळाली. टीव्हीवर तिच्या मुलाखती झाल्या. थायलंडमध्येही कॅमेरा प्रशिक्षण सत्रात सहभागाची संधी मिळाली. या क्षेत्रातील अनेक कार्यकर्त्यांशी तिचा संबंध आला. त्यातूनही आत्मकथनलेखनाबाबतचा आग्रह होत राहिला.

अखेर एके दिवशी 'मी नलिनी. माझा जन्म अम्बाल्लूर जवळच्या कल्लूर येथे झाला. मी एकोणपन्नास वर्षांची आहे' हे वाक्य वहीत लिहून तिने लेखनाला आरंभ केला. वहीतले ते वाक्य वाचून तिचे एक गिऱ्हाईक निघून गेले. तिचे



वय जास्त आहे हे जाणून त्याने पळ काढला. त्यामुळे लेखनाचा हा विपरीत परिणाम बघून तिचा उत्साह मावळला. परंतु इ.स. २००४ मध्ये केरळ सोशल फोरमचे आय. गोपीनाथ यांनी तिच्या आठवणी टेप करून एक पुस्तक तयार केले. ते बरेच त्रोटक होते. तेव्हा सुधारित आत्मचरित्राचा घाट घातला गेला; आणि डी सी बुक्सने ते प्रकाशित करण्याचे मनावर घेतले. त्यामुळे हे पुस्तक आता सुधारित स्वरूपात वाचकांपुढे येत आहे.

**नऊ वर्षांची नलिनीही त्यामुळे चौथीपर्यंत शिकून कौलाच्या कारखान्यात मजुरी करू लागते. फुटकी कौले पाटीत भरून बाजूला नेऊन टाकण्याचे भर उन्हात काम करताना तिची दमछाक होई. दिवसाला दीड रुपया मिळे**

या सुधारित आत्मकथनातही फारशी सफाई नाही, घटनांचा क्रम मागेपुढे आहे, अनेक व्यक्तींचे अर्धवट उल्लेख आले आहेत; त्यामुळे अधेमधे अडखळायला होते.

नलिनी जमीलाच्या आयुष्यात खूप चढउतार आहेत, त्यामुळे तिच्या आयुष्यातील घटनांमध्ये वैचित्र्य आहे. परंतु पोरनोग्राफिक किंवा अश्लील असे या पुस्तकात काहीही नाही. स्वत:बद्दल इतरांची अनुकंपा वा करुणा दाखवावी अशी नलिनी जमीलाचाही अपेक्षा नाही. एका वेश्येचे आत्मकथन म्हणून ते जिज्ञासा जागवणारे आहे; परंतु भडक वा उत्तेजक वर्णनांनी भरलेले नाही.

नलिनी ही तसं पाहिलं तर केरळमधल्या एका मोठ्या घरातली मुलगी. तीन शयनगृहे, दोन दिवाणखाने आणि एक स्वयंपाकघर असं चांगलं प्रशस्त कौलारू घर. वडील सैन्यदलातून निवृत्त झालेले. निवृत्तीच्या वेळी मिळालेल्या पैशातून घर बांधलेले असले तरी घरात वरचष्मा होता तो थोरले काका वलियाचन आणि काकी वल्लाम्मा यांचा. वडील कम्युनिस्ट असल्याने आईची सूतगिरणीतली नोकरी गेली. वडिलांना मिळणारे पेन्शन बेताचेच होते. त्यामुळे घरची परिस्थिती ढासळत गेली. सहा मुले आणि भावनाशून्य नवरा यांना पोसण्याची जबाबदारी आईवर पडलेली.

नऊ वर्षांची नलिनीही त्यामुळे चौथीपर्यंत शिकून कौलाच्या कारखान्यात मजुरी करू लागते. फुटकी कौले पाटीत भरून बाजूला नेऊन टाकण्याचे भर उन्हात काम करताना तिची दमछाक होई. दिवसाला दीड रुपया मिळे. पुढे मातीच्या खाणीत ती काम मिळवते. मोठ्या घरची मुलगी म्हणून तिला कामगार सांभाळून घेत. कमी वजनाची पाटी उचलायला देत. तिच्याबरोबर काम करणारा कुन्हिबापू हा ख्रिश्चन कामगार तिला टॉफी आणून देई. टॉफी हे उमलत्या

रोजा तिला बाथरूममध्ये नेऊन व्यवस्थित न्हाऊ घालते. चांगले कपडे देते. सजवते... तिचे रंगरूपच पालटते. पहिली रात्र एका झुबकेदार मिशावाल्या 'स्वप्नातल्या राजकुमाराबरोबर' जाते. मग एक राजबिंडा पोलीस उपनिरीक्षक...

प्रणयाचं प्रतीक हे नलिनीच्या लक्षात आले. तो तिला मागणी घालतो; तर तिचे वडील त्याला हाकलून लावतात. 'आपण इळवा; तो ख्रिश्चन' असेही वडिलांच्या विरोधाचे कारण असते. पालियेक्कारा अँथनी हाही तिच्या मागावर असतो. नंतर सुब्रमण्यम हा तीस-बत्तीस वर्षांचा खाणीतून वाळू उपसणारा एक कामगार तिला नादी लावतो. आपल्या मामाच्या घरी तो तिला घेऊन जातो आणि आसपासचे लोक सुब्रमण्यम आणि नलिनी यांना नवराबायको समजू लागतात. तो तिला पुरुषार्थाचा नमुना वाटतो. तो हातभट्टीची दारू गाळत असे, जुगार खेळत असे, गुंडगिरी करीत असे. एका पन्नाशीतल्या बाईशीही त्याचे संबंध होते. त्याची आई आणि बहीण नलिनीला खूप त्रास देतात. साडेतीन वर्षे नलिनी त्याच्याबरोबर राहते. तिला दोन मुले होतात. एक मुलगा एक मुलगी. सुब्रमण्यम कर्करोगाने हैराण होतो. दारूच्या प्याल्यात विष मिसळून तो मृत्यू पत्करतो. नलिनीवर मुलांची जबाबदारी पडते. तशात सासूही तिच्याकडे रोज पैसे मागते. तेव्हा मुलांना अनाथाश्रमात ठेवायचे असे ती ठरवते. पण तिची मैत्रीण तसे करण्याऐवजी पुरुषांबरोबर जाण्याचा, पुरुषांना हवं ते देऊन पैसे मिळवण्याचा मार्ग सुचवते. ती म्हणते, 'लोक काय म्हणतील?' मैत्रीण म्हणते, 'हे काम इथे करायचे नाही. दूरवरच्या थ्रिशूरला जाऊन करायचे. येथे कोणाला कळणार नाही. एकेक पुरुष पन्नास रुपये देईल.' खाणीत काम करून दोनतीन रुपये मिळणार. येथे पन्नास. नलिनी तयार होते.

ती थ्रिशूरला जाते. 'रोजा'ला भेटते. रोजा तिला बाथरूममध्ये नेऊन व्यवस्थित न्हाऊ घालते. चांगले कपडे देते. सजवते... तिचे रंगरूपच पालटते. पहिली रात्र एका झुबकेदार मिशावाल्या 'स्वप्नातल्या राजकुमाराबरोबर' जाते. मग एक राजबिंडा पोलीस उपनिरीक्षक... त्यानंतर वाकनूरमधील एका 'कंपनी हाऊस'मध्ये ती गिऱ्हाइकांना खूष करू लागते.

तो आणीबाणीचा काळ... पोलिसांचा ससेमिरा... पण नलिनीकडे मोठमोठे अधिकारीही येत राहतात... तिच्या सहवासाची मजा लुटतात...

थ्रिशूरमध्ये मैत्रिणीकडे राहून हा व्यवसाय करणे त्रासदायक होऊ लागते तेव्हा नलिनी मंगलोरमधील 'कंपनी हाऊस'मध्ये हे काम करू लागते. जहाजावरून



येणाऱ्या सायिप्पांकडून रात्रीसाठी तीनशे रुपये मिळू लागतात...

बंदरावर काम करणारा कोयक्का तिला लग्नाचं विचारतो. त्याची आधी दोन लग्ने झालेली. पण तो तिला हे सांगत नाही. दुसरी बायको बाळंतपणासाठी गेलेली असताना तो तिला घरी नेतो. नलिनीलाही दिवस जातात. दुसरी बायको परत आल्यावर तिचा व नलिनीचा खटका उडतो... दुसरे भाड्याचे घर घेऊन तो तिला तेथे ठेवतो... तो मुसलमान... नलिनी मुलीचे नाव झीनत ठेवते...

'माझ्या नातलगांना माझी बायको मुस्लीम आहे ही गोष्ट पटायला हवी' असे तो म्हणतो तेव्हा नलिनी आपल्या नावापुढे 'जमीला' लावते. तो तिला घर भाड्याने घेऊन देतो... बारा वर्षे दोघे नवराबायकोसारखे राहतात.

पुढे कोयक्काशीही तिचे बिनसते. ती थ्रिशूरला परत येते. तेथे तिला शाहूल हमीद भेटतो. तो तिला मुलीसह सांभाळण्याचे वचन देतो. 'माझ्या नातलगांना माझी बायको मुस्लीम आहे ही गोष्ट पटायला हवी' असे तो म्हणतो तेव्हा नलिनी आपल्या नावापुढे 'जमीला' लावते. तो तिला घर भाड्याने घेऊन देतो... बारा वर्षे दोघे नवराबायकोसारखे राहतात. त्या काळात नलिनीला देहविक्रय करावा लागत नाही.

शाहुलचा प्लॅस्टिकच्या नेमप्लेट करण्याचा व्यवसाय असतो... नलिनीची मुलगी झीनत त्याला पापा म्हणते. ती तेरा वर्षांची होते. तेव्हा सावत्र बापाकडून लैंगिक छळवणुकीचा धोका नलिनीला जाणवतो. १९९४ साली शाहुलला सोडून नलिनी टिंगरामधील मशिदीत रहायला जाते... तेथेही तिच्यावर फिदा होणारे लोक तिला भेटतात. झीनतवरही डोळा ठेवणारे भेटतात... नलिनीची तब्येत बिघडते. तिला रुग्णालयात बावीस दिवस राहावे लागते...

...तिरुअनंतपूरला झीनतला ठेवून नलिनी थ्रिशूरला येते. पुन्हा देहविक्रयाकडे तिला वळावे लागते.

त्याचवेळी ज्वालामुखी या संघटनेशी तिचा संबंध येतो. देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी, पोलिसांचा जाच कमी करण्यासाठी ही संघटना काम करत असते. या स्त्रियांना जामीन मिळवून देणे, न्यायालयात वकील देणे वगैरे कामेही ज्वालामुखी करते. या संघटनेने घेतलेल्या मेळाव्यात नलिनी भाषण करते. भाषण चांगले होते. तिचा आत्मविश्वास वाढतो. मोर्चा पोलीसचौकीवर जातो. एचआयव्ही आणि पुरुषांची भूमिका या विषयावरील परिसंवादात नलिनी भाषण करते.

**सेक्स ही फक्त पुरुषाचीच गरज नाही. स्त्रीचीही गरज आहे. देहविक्रय आणि लैंगिक शोषण या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. सेक्स रॅकेट आणि देहविक्रय याचाही संबंध नाही.**

आणीबाणी असल्याने पोलीस तिला पकडतात. सुटण्याच्या प्रयत्नात ती विहिरीत पडते... पण वाचते...

इंडियन सेक्स वर्कर्स फोरम या संघटनेची स्थापना होते. त्यावेळी ३ मार्च हा दिवस 'सेक्स वर्कर्स डे' म्हणून कलकत्त्याला साजरा केला जातो. नलिनी त्यात भाषण करते. ललिता, जयश्री, पॉलसन, मैत्रेयन वगैरे कार्यकर्त्यांशी तिची घनिष्ठ मैत्री होते. माहितीपट व टीव्ही यात तिला संधी मिळते. मुंबई, मद्रास, दिल्ली, कलकत्ता वगैरे ठिकाणी दौरे होतात. थायलंडमध्ये एका प्रशिक्षण वर्गालाही ती जाऊन येते. कॅमेरा हाताळण्याचे कौशल्यही ती आत्मसात करून एक तीन मिनिटांची फिल्म तयार करते.

ज्वालामुखीच्या वार्तापत्रात ती लेख लिहिते.

झीनत या आपल्या मुलीचे लग्न ती 'माले'मधील एका तरुणाशी लावून देते. झीनत मालेमध्ये वर्षभर राहते. नवऱ्याच्या बेकरीत राबते. पण नवरा गुलाम म्हणून तिला वागवतो तेव्हा ती तेथून सुटका करून घेऊन परत भारतात येते. कोझीकोडोला बांगलादेश वसाहतीतल्या शांतीनगर कॉलनीत घर बांधून राहते.

एशिया बेट न्यूज अवर, सन टीव्हीवरील कथायल्ला निजम वगैरे कार्यक्रमातून टेलिव्हिजनवर नलिनी जमीला झळकली. 'ज्वालामुखीकर' आणि 'मौनात डोकावताना' हे दोन माहितीपट– त्यात देहविक्रेत्यांचे अनुभव आणि पोलिसी क्रौर्य यांचे चित्रण आहे. त्यात काही मागण्या करण्यात आल्या आहेत.

देहविक्रय हा गुन्हा मानला जाऊ नये असे ज्वालामुखीचे म्हणणे.

डॉक्टर व पोलीस यांच्याकडून अधिकृत मान्यता, कायद्याची लाल फीत यामुळे भ्रष्टाचाराला वाव मिळतो. दोन व्यक्तींना परस्पर संमतीने शरीरसंबंध ठेवायचा असेल, त्यामुळे इतर कुणाला त्रास होत नसेल तर त्या शरीरसंबंधावर प्रश्नचिन्ह लावता कामा नये. कलकत्ता व कर्नाटक येथे कुंटणखाने चांगल्या प्रकारे चालवले जातात. ग्राहक ठरवणे, मोबदला नक्की करणे, प्रत्येक ग्राहकाला वेळ देणे– हे अधिकार तेथील देहविक्रेत्यांना आहेत. सेक्स ही फक्त पुरुषाचीच गरज नाही. स्त्रीचीही गरज आहे. देहविक्रय आणि लैंगिक शोषण या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. सेक्स रॅकेट आणि देहविक्रय याचाही संबंध नाही. सेक्स रॅकेटमध्ये तरुण मुलींना अमानुषपणे कुस्करले जाते, दयामाया न दाखवता



भोगले जाते. त्यांच्या मनाचा, देहाचा, आरोग्याचा विचार केला जात नाही. लैंगिक शोषणामध्ये लग्न किंवा नोकरीचे खोटे वचन देऊन, वा अन्य आमिष दाखवून किंवा मौजमजेसाठी तरुण मुलींचा वापर करणे; बऱ्याचदा हे त्यांच्या संमतीविनाच घडते. अशा मुली देहविक्रय व्यवसायात येण्याची शक्यता असते.

**देहविक्रय म्हणजे सेक्स नव्हे पाहणं, कुरवाळणं, स्पर्श करणं किंवा उत्कट प्रणय करणं- या सगळ्यात सेक्स असतो. प्रेम, आपुलकी, जिव्हाळा यात- शाररिक भाग किती आणि मानसिक भाग किती याचा हिशेब मांडत बसणे हा वांझोटा उद्योग आहे.**

त्यामुळे पुनर्वसनाचा विचारही आवश्यक आहे.

ज्यांना या व्यवसायातून बाहेर पडायचे आहे त्यांना मदत करण्याचा प्रयत्न ज्वालामुखीसारख्या संघटना करू पाहतात. समाजाची दृष्टीही त्यासाठी बदलायला हवी.

देहविक्रय म्हणजे सेक्स नव्हे.

पाहणं, कुरवाळणं, स्पर्श करणं किंवा उत्कट प्रणय करणं– या सगळ्यात सेक्स असतो. प्रेम, आपुलकी, जिव्हाळा यात– शारीरिक भाग किती आणि मानसिक भाग किती याचा हिशेब मांडत बसणे हा वांझोटा उद्योग आहे.

प्रत्येकानं सेक्स विकत घ्यावा असे कुणीच सांगत नाही. ज्याला हवं आहे तो विकत घेऊ शकतो. ज्याला गरज नाही त्यानं ते विकत घेऊ नये...

प्रत्येक लैंगिक संबंधाची परिणती कौटुंबिक संबंधातच व्हायला हवी असा आग्रह कशाला हवा?

देहविक्रेत्यांचे मुख्यत्वे शोषण होते ते दलाल आणि नवरे यांच्याकडून. बरेचसे नवरे हेच दलाल असतात.


अशी अनेक निरीक्षणे नलिनी जमीलाने या पुस्तकात नोंदवली आहेत.

सेक्स वर्करचे पुस्तक म्हणजे उत्तान मादक प्रसंगांची चुरचुरीत वर्णने– असा काही प्रकार येथे नाही... वेगवेगळे पुरुष जीवनात येतात खरे... पण ते तेवढ्यापुरतेच! त्यांचे बरेवाईट अनुभव येतात, बरेवाईट स्वभाव कळतात.

नीतिमत्ता आणि लैंगिक व्यवहार यांची सांगड आपल्या सामाजिक जीवनात घातली गेली आहे, त्यामुळे विवाहसंस्थेला महत्त्व आहे. त्या चौकटीबाहेरच्या संबंधांना निषिद्ध मानले गेले आहे. 'सेक्सवर्कर'सारख्या पुस्तकामुळे या चौकटीबाहेरच्या जीवनाची थोडीफार झलक दिसून येते.

**पृष्ठे: १४४ ● किंमत : १२० रु. ● सभासदांना: ८४ रु. ● पोस्टेज: २० रु.**

## जेम्स बाँड मालिकेतील नवे कोरे ......




# द मॅन विथ द गोल्डन गन

**अनु. डॉ. देवदत्त केतकर**

**८०रु. पोस्टेज २०रु.**

केजीबी या रशियन गुप्तहेर संस्थेच्या आणि स्थानिक माफियाच्या मदतीने स्कॅरामांगा हा खतरनाक पिस्तुलबाज, जमैकात ब्रिटीश हेरखात्याला जेरीस आणतो.... याला आव्हान देण्याची जबाबदारी जेम्स बाँडवर पडते...... पण स्कॅरामांगाला जमैकात जाऊन आव्हान देणं म्हणजे सिंहाच्या गुहेत जाऊनं मृत्यूचं आमंत्रण स्विकारणं.....


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



**ब्रिटीश संशोधकाला शत्रुदेशाच्या तावडीतून सोडवण्यासाठी केलेले अतुलनीय साहस**

## द लास्ट फ्रन्टियर

**ॲलिस्टर मॅक्लीन**
**अनु. अशोक पाध्ये**




'फिअर इज द की', 'दि गोल्डन गेट', 'द डार्क क्रूसेडर', 'द गोल्डन रॉन्देव्ह्यू', 'साउथ बाय जावा हेड' या पाठोपाठ 'द लास्ट फ्रंटियर' ही ॲलिस्टर मॅक्लीनची थरारकथा मराठीत आली आहे. अशोक पाध्ये यांनीच हा अनुवाद केला आहे.

या अनुवादाला पाध्यांनी जोडलेले निवेदन वाचनीय आहे. पुस्तक वाचून होत आले तरी हे काय चालले आहे, कशासाठी चालले आहे, पुढे काय होणार वगैरे प्रश्न वाचकांना पडतात; असे त्यांनी म्हटले आहे. या थरारकथांतील तपशील, वेगळ्या जीवनशैलीची वा वातावरणाची बारकाईने माहिती देणारे असतात; त्यामुळे ते कधीकधी पाल्हाळिकही वाटतात अशीही प्रतिक्रिया वाचक प्रकट करतात. एका घटनेची थरारकथा आपल्या मनावर आघात करीत असते, तिच्या प्रभावातून बाहेर पडण्याच्या आतच दुसरी धक्कादायक थरारक घटना घडवून आणण्याचे मॅक्लीनचे तंत्र वाचकांना धक्क्यावर धक्के देऊन नायक आणि खलनायक यांच्यातील शह-प्रतिशह 'उत्कलन' बिंदूवर नेऊन ठेवते; त्यामुळे वाचक त्या नाट्याने दडपून जातो असेही काहीजणांना वाटते.

ॲलिस्टर मॅक्लीनच्या थरारकथांचे विषयही अचाट आणि असंभाव्य असतात.

'दि गोल्डन गेट'मध्ये अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षालाच पळवून नेऊन ओलीस ठेवण्याची अफलातून कल्पना मध्यवर्ती ठेवून नाट्य निर्माण करण्यात आले आहे.

'फिअर इज द की'मध्ये समुद्राच्या तळाशी १४० फूटांवर खोल बुडालेल्या विमानातील सोन्याचा खजिना हस्तगत करण्यासाठी त्या विमानाच्या कंपनीचा मालक टालबोट हा प्रयत्न करत असतो. त्या खजिन्याजवळच्या तेराव्या तेलविहिरीच्या जवळ पाणबुड्याच्या वेषात टालबोट बुडी मारून शोध घेत असतो.

**अफलातून कल्पनांभोवती कथावस्तूची उभारणी करून ॲलिस्टर मॅक्लीन वाचकांना वेगवेगळ्या भूप्रदेशांची आणि तंत्रज्ञानक्षेत्रांची सैर घडवून आणतो. निसर्गाची, भूप्रदेशाची आणि तांत्रिक बाबींची तपशीलवार वर्णने तो देतो.**

एक्स-१३ या तेलविहिरीच्या तळाशी असणाऱ्या बेथिस्कॅपमध्ये काहीतरी बिघाड झालेला असतो आणि त्याची दुरुस्ती करण्याची क्षमता फक्त टालबोटमध्येच असते...

'दि डार्क क्रूसेडर'मध्ये क्षेपणास्त्राच्या उड्डाणासाठी द्रवरूप इंधन वापरण्याच्या तंत्रातील तज्ज्ञ डॉ. बेन्टॉल याला प्रवाळबेटावर नेण्यात येते; त्या क्षेपणास्त्राला फ्यूज बसवण्याचे काम त्याला करायचे असते. 'दि डार्क क्रूसेडर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अग्निबाणाची पहिली चाचणी त्यानंतर घेण्यात येते. ह्या फ्यूजचे वायरिंग करताना दुसरे क्षेपणास्त्र निकामी होईल अशी व्यवस्था बेन्टॉल करतो...

अशा अफलातून कल्पनांभोवती कथावस्तूची उभारणी करून ॲलिस्टर मॅक्लीन वाचकांना वेगवेगळ्या भूप्रदेशांची आणि तंत्रज्ञानक्षेत्रांची सैर घडवून आणतो. निसर्गाची, भूप्रदेशाची आणि तांत्रिक बाबींची तपशीलवार वर्णने तो देतो. ती काही वाचकांना कंटाळवाणी पाल्हाळिक वाटतात; परंतु काही वाचकांना शास्त्रीय-भौगोलिक ज्ञानात भर टाकणारी वाटतात. बेस्टसेलर कादंबरी तीन-चारशे पृष्ठांची तरी हवी असाही मॅक्लीनचा स्वयंनिर्धारित बाणा... त्यामुळे आपल्या कथावस्तूत तो सविस्तर चर्चांनाही सामावून घेतो... तपशीलांचा डोंगर उभा करतो.

'दि लास्ट फ्रंटियर' या थरारकथेचा काळ १९५०-६० च्या दरम्यानचा आहे. त्यावेळी अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यातील शीतयुद्ध ऐन भरात होते. हंगेरीतील इम्रे नाज याचे तथाकथित बंड मोडून काढण्यासाठी रशियाने आपले सैन्य व रणगाडे घुसवून बंडखोरांचा बंदोबस्त केला होता. हंगेरीतील शासन त्यामुळे जनतेवर अधिकच जुलूम-जबरदस्ती करू लागले. १९६० च्या सुमाराला या कादंबरीतील घटना वेग घेतात.

ब्रिटिश शास्त्रज्ञ डॉ. हेरॉल्ड जेनिंग्ज हे क्षेपणास्त्र, तोफगोळे, अग्निबाण वगैरे हवेतून वेगाने जाणाऱ्या उपकरणांमधील जगातील अग्रगण्य गणले जातात. राष्ट्र ही संकल्पना जुनी झाली. आता प्रत्येक माणसाने आपल्या विवेकबुद्धीनुसार सर्व जगासाठी विज्ञान असे समजून काम करावे असे मत त्यांनी एकदा व्यक्त केले. तेव्हा रशियाने त्यांच्याशी संपर्क साधून आपण रशियात या, तुम्हाला सर्व सुविधा आम्ही पुरवू असे आमंत्रण त्यांनी दिले. डॉ. जेनिंग्ज यांनी रशियनांचे राष्ट्रीयत्व



**डॉ. जेनिंग्ज हे हंगेरीतील ब्युडोपेस्टला एका आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदेत शोधनिबंध वाचण्यासाठी येणार आहेत, त्यांना तेथे गौरव करण्यात येणार आहे असे जाहीर झाल्याने त्यांना येथूनच सोडवून ऑस्ट्रियामार्गे परत ब्रिटनला न्यावे अशी योजना ब्रिटिश गुप्तहेरखाते आखते**

हे ब्रिटिशांच्या राष्ट्रीयत्वापेक्षाही भयानक आहे असे म्हणून रशियाला नकार दिला. त्यानंतर दोन महिन्यांनी डॉ. जेनिंग्ज यांचा सोळा वर्षांचा मुलगा ब्रायन आणि त्यांची पत्नी कॅथरिन यांनी सुटीसाठी स्वित्झर्लंडला प्रयाण केले. डॉ. जेनिंग्ज हे त्यांना दोन दिवसांनी झुरिचच्या हॉटेलमध्ये भेटणार होते. त्याप्रमाणे ते हॉटेलवर गेले तर त्यांना मुलगा आणि पत्नी यांचा ठावठिकाणा लागला नाही. त्यांचे अपहरण केले गेले असे त्यांना कळवण्यात आले. रशियाचे हे कृत्य आपल्याला रशियात येणे भाग पाडण्यासाठी केले असावे हे त्यांच्या लक्षात आले... डॉ. जेनिंग्ज हे त्यामुळे रशियात गेले... मॉस्कोमध्ये त्या तिघांचे वास्तव्य आहे हे पुढे ब्रिटिश हेरखात्याला कळले...

डॉ. जेनिंग्ज हे हंगेरीतील ब्युडोपेस्टला एका आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदेत शोधनिबंध वाचण्यासाठी येणार आहेत, त्यांना तेथे गौरव करण्यात येणार आहे असे जाहीर झाल्याने त्यांना येथूनच सोडवून ऑस्ट्रियामार्गे परत ब्रिटनला न्यावे अशी योजना ब्रिटिश गुप्तहेरखाते आखते आणि ती कामगिरी मायकेल रेनॉल्डस या गुप्तहेरावर सोपवण्यात येते. डॉ. जेनिंग्ज यांच्या पत्नीला ती आजारी पडल्यामुळे लंडनला परत पाठवण्याला रशियन सरकार तयार होते. त्याप्रमाणे ती लंडनला जाते. मुलगा ब्रायन पोलंडमध्ये युवक चळवळीतर्फे अभ्यासदौऱ्यावर गेलेला असून त्या गटाचा पुढचा मुक्काम स्वीडनमध्ये ठरलेला असतो. त्यामुळे त्याला स्वीडनमधून इंग्लंडला नेण्याचाही व्यूह ठरलेला असतो. रेनॉल्डसने डॉ. जेनिंग्जशी संपर्क साधून त्यांना ऑस्ट्रियामार्गे इंग्लंडला न्यायचे– अशी योजना असते. या कामी हंगेरीतील एव्हीओ या प्रतिगुप्तहेर संघटनेचे सहकार्य त्याने घ्यावे असेही त्याला सांगण्यात आलेले असते. या संघटनेचे एक काम हंगेरीतील पोलिसांच्या हाती सापडणाऱ्या परदेशी गुप्तहेरांना सोडवून नेऊन त्यांजकडून काही माहिती मिळवणे हे असते. रशिया धार्जिण्या हंगेरीतील शासकांना ती माहिती मिळू नये असा प्रयत्न ही या संस्थेतील काही अधिकाऱ्यांना असतो.

या संघटनेतील अधिकारी एकमेकांवर कुरघोडी करण्याचा छुपा प्रयत्न करीत असतात. प्रत्येकजण दुसऱ्याला शह देण्याची संधी शोधत असतो.

मायकेल रेनॉल्डस हंगेरीमध्ये विमानाने प्रवेश करू शकत नाही; कारण

> **'हातात घेतलेले कार्य महत्त्वाचे आहे. फक्त त्याचाच विचार करीत रहा. दुसऱ्या कशाचाही विचार नको- यशापयशाचाही विचार नको... हाती घेतलेले कार्य तडीस नेणे एवढेच तुझे काम... डॉ. जेनिंग्जला सहीसलामत हंगेरीबरोबर काढणे हेच एकमेव लक्ष्य रेनॉल्डसपुढे होते.**

विमानतळ सुरक्षेच्या कारणासाठी बंद होता आणि आगामी विज्ञान परिषदेसाठी विमानतळावर सुरक्षा बंदोबस्त वाढवण्यात आला होता. रेल्वेस्थानकांवरही तशीच सावधगिरी घेतली जात होती. म्हणून एका ट्रकने चोरून ब्युडापेस्टला जायचे, मध्ये कुठे तपासणी होण्याची शक्यता दिसली तर तेथे उतरून पुढे पायी जायचे... असे त्याला सांगण्यात आलेले असते. 'हातात घेतलेले कार्य महत्त्वाचे आहे. फक्त त्याचाच विचार करीत रहा. दुसऱ्या कशाचाही विचार नको– यशापयशाचाही विचार नको... हाती घेतलेले कार्य तडीस नेणे एवढेच तुझे काम... डॉ. जेनिंग्जला सहीसलामत हंगेरीबरोबर काढणे हेच एकमेव लक्ष्य रेनॉल्डसपुढे होते.

त्यावेळी बर्फ पडत होते... थंडी भयानक होती...

एका फांदीचा धक्का लागून रेनॉल्डस ट्रकमधून खाली पडतो. ब्युडापेस्ट तेथून दहावीस किलोमीटरवर असणार... वाटेत तपासणी नाके... तेथे त्याला त्याचा ट्रक चौकीबाहेर दिसतो... पोलीस कुत्र्यांना घेऊन त्याच्या मागावर निघालेले दिसले... रस्त्याच्या कडेने जाणाऱ्या रेनॉल्डसला पोलीस अडवतात. वरवर त्याची झडती घेतात... त्याला चौकीवर नेतात. रेनॉल्डस आपली कागदपत्रे-पासपोर्ट दाखवून मला लवकर जाऊ द्या म्हणतो. ''तू पळून का जात होतास? ट्रकनेच का आलास? विमानाने वा कारने का नाही? व्हिएन्नावरून आला तर सरहद्द किती वाजता ओलांडली?'' तो सरहद्द सहा वाजता ओलांडली म्हणतो; पण ऑस्ट्रिया-हंगेरी सरहद्द सकाळपासून बंद असते. त्यामुळे रेनॉल्डस खोटे बोलत आहे म्हणून पोलीस अधिकारी त्याला बेड्या ठोकतो. रेनॉल्डस ब्युहल असे नाव सांगून त्याचा पासपोर्ट तयार ठेवतो.

त्याची चौकशी करणारा आणखी एक लष्करी अधिकारी येतो. तो पोलिसांना म्हणतो, 'ही आमची लष्करी केस आहे. तुम्ही याची चौकशी करू शकत नाही. कैद्यांना प्रश्न विचारण्याचा, मारहाण करण्याचा अधिकार तुम्हाला नाही....'

–आणि तो अधिकारी मिस्टर ब्युहलला घेऊन जातो.

त्या अधिकाऱ्याचे नाव कर्नल स्झेन्द्रो... तो त्याला ब्युडापेस्टला घेऊन जातो. त्याच्या हेडक्वार्टरऐवजी दुसऱ्या एका इमारतीत नेतो. 'या वास्तूमध्ये तुमच्या धाडसाचा आणि शौर्याचा उपयोग होणार नाही... तुमची कागदपत्रे खोटी आहेत... तुमचे खरे नाव सांगा...'

> **''मला तुमच्याबद्दल कर्नल मॅकिन्टॉशने बरीच माहिती दिली आहे. तुम्ही मेजर जनरल ॲलोक्सिस इल्युरिन. जन्म रशिया- कलीनोव्हका गाव- जन्मतारीख १८ ऑक्टोबर १९०४. विवाह १८ जून १९३१.**

हे एव्हीओ या गुप्त पोलीस हेरखात्याचे कार्यालय नसावे असे रेनॉल्डसला वाटू लागते.

काही वेळाने एक तरुणी तेथे येते आणि तेथील एका वयस्क व्यक्तीला म्हणते, 'जान्स्की, तुम्ही अजून जागे का आहात? रात्रीचा एक वाजलाय.

'जान्स्की' नाव ऐकल्याबरोबर रेनॉल्डस तिला विचारतो, 'तू जान्स्की म्हणालीस?'

'हो...' रेनॉल्ड त्या वृद्धाकडे बघून विचारतो.

'म्हणजे एक चार एक चार एक आठ दोन?' त्या वृद्धाच्या हातावर ती संख्या गोंदलेली असते.

'मला तुमच्याबद्दल कर्नल मॅकिन्टॉशने बरीच माहिती दिली आहे. तुम्ही मेजर जनरल ॲलोक्सिस इल्युरिन. जन्म रशिया– कलीनोव्हका गाव– जन्मतारीख १८ ऑक्टोबर १९०४. विवाह १८ जून १९३१. पत्नी कॅथरिन. मुलीचे नाव ज्युलिया... ती हीच ना?'

पुढे रेनॉल्डस सांगतो, 'मला एका कॅफेचा पत्ता देण्यात आला होता. तेथे तुम्हाला गाठायचे होते. परवलीची खूण– माझा टाय...' हंगेरीतील सरकारविरोधी संघटनेचे सहकार्य तो मिळवतो.

–आणि जान्स्की त्याला सांगतो, 'हा स्झेन्द्रो... नाकेबंदीच्या ठिकाणी जाऊन पोलिसांच्या हातून परदेशी गुप्तहेरांना सोडवून आणतो. पोलिस हेडक्वार्टरवर त्यांना जाऊ देत नाही. एव्हीओचा अधिकारी म्हणून तो हे काम करतो; परंतु पोलिसांना मात्र तो तोतया वाटावा असे त्याचे वागणे असते... तुम्ही परदेशी हेर नसून एव्हीओनेच तुम्हाला परदेशी हेराचे सोंग घ्यायला लावून हंगेरीत घुसवले असे त्यांना वाटले असेल... स्झेन्द्रो हा मेजर आहे. त्याला गुप्त फायली बघायचे अधिकार नाहीत.'

–आणि रेनॉल्डस डॉ. जेनिंग्ज यांना ब्युडापेस्टमधील परिषदेत गाठून त्यांना हंगेरीबाहेर नेण्याच्या कामगिरीची कल्पना देतो...

गुल्यास सूप आणि तोकानी खिमा हे खास हंगेरियन पदार्थ देऊन ज्युलिया

**एका वृद्ध माणसाच्या नशिबी परकीय भूमीवर मृत्यू येऊ नये, आपल्या कुटुंबापासून आणि मित्रांपासून कायम दूर राहण्याची पाळी येऊ नये म्हणून- शक्य तेवढी मदत आम्ही करू. परमेश्वराची साथ मिळाली तर तुमचा हा वृद्ध शास्त्रज्ञ पुन्हा आपल्या माणसात परतेल''**

त्याचा पाहुणचार करते... ज्युलियाला परदेशांबद्दल विशेष आकर्षण असते...

ब्युडापेस्टमधील डॉ. जेनिंग्जच्या हॉटेलचा व रूमचा पत्ता मिळवणे, त्यांना गाठून ब्रिटनमध्ये नेण्याची योजना आखणे... हे तेवढे सोपे नसते. जॉन्स्की रेनॉल्डसला मदत करायला तयार होतो. 'शास्त्रज्ञांचे युद्धाला मदत करणाऱ्या यंत्रात रूपांतर करणारे तुम्ही नाही... एका वृद्ध माणसाच्या नशिबी परकीय भूमीवर मृत्यू येऊ नये, आपल्या कुटुंबापासून आणि मित्रांपासून कायम दूर राहण्याची पाळी येऊ नये म्हणून– शक्य तेवढी मदत आम्ही करू. परमेश्वराची साथ मिळाली तर तुमचा हा वृद्ध शास्त्रज्ञ पुन्हा आपल्या माणसात परतेल' असे जान्स्की म्हणतो.

...पहिल्या शंभरएक पृष्ठांत या थरारकथेचा हा प्रारंभीचा टप्पा पार पडतो.

प्रत्यक्ष डॉ. जेनिंग्जना सोडवण्याच्या प्रयत्नात पुढे अडीचशे पृष्ठांचा पसारा मांडला जातो. ॲलिस्टर मॅक्लीन ही प्रक्रिया गुंतागुंतीची करण्याबाबत आपले तल्लख डोके पुरेपूर वापरतो... कर्नल स्झेन्ड्रो हा जान्स्कीचा मित्र व विश्वासू सहकारी; पण तो हंगेरीच्या गुप्तहेरांचाच प्रतिनिधी म्हणून पुढे रेनॉल्डसच्या मार्गात एकापाठोपाठ एक अडथळे आणतो... त्यामुळे कथानकातील नाट्याला आणखीनच धार चढते...

ज्युलियाला तो हंगेरीतून बाहेर नेतो– ते तिला जीवनाची जोडीदार म्हणून. हा रेनॉल्डसाला मिळालेला बोनस.

ॲलिस्टर मॅक्लीनच्या चाहत्यांना या कादंबरीतील एकूण मालमसाला नेहमीप्रमाणेच गुंतवून ठेवणारा वाटेल.

**पृष्ठे: ३५६ ● किंमत: २८० रु. ● सभासदांना: १९६ रु. ● पोस्टेज: २५रु.**



# आगामी


# इ|ति|वृ|त्त

आव्हाने स्वीकारणारा जिद्दी संपादक, भ्रष्टाचारी मुख्यमंत्री, नेतृत्त्वबदलासाठी बंडखोरी करणारे आमदार,आणि सावध भूमिका घेणारे मालक यांच्या परस्परसंबंधांचा आधुनिक लोकशाही मूल्यांच्या संदर्भात वेध घेणारी, एखाद्या वेगवान चित्रपटासारखी उलगडत जाणारी, नाट्यपूर्ण शैलीतील जोमदार कादंबरी.




**ह. मो. मराठे**

**किंमत : २०० रु.**
पोस्टेज : २५ रु.




**इतरांशी आपले संबंध सौहार्दपूर्ण असणे, इतरांशी उत्तम प्रकारे संवाद साधता येणे हे सुंदर मनाचे लक्षण**

## सुंदर मन

**एडवर्ड डी बोनो**
**अनु. सुभाष जोशी**

'सुंदर मन', 'सुंदर चेहरा' असे आपण सर्रास म्हणतो. सौंदर्याचे गुणगान गातो. पण 'सुंदर मन' असे क्वचितच म्हणतो. 'हाऊ टू हॅव ब्युटिफुल माइंड' या नावाचे पुस्तक एडवर्ड डी बोनो या लेखकाने लिहिले आणि 'ए ब्युटिफुल माइंड' असा शब्दप्रयोग सर्वत्र रूढ झाला. मराठीतही तो आता रुळेल यात शंका नाही.

आपला चेहरा सुंदर दिसावा असे प्रत्येक व्यक्तीला वाटते. त्यासाठी नाना प्रकारची सौंदर्यप्रसाधने वापरली जातात. चेहऱ्यावरचे डाग, मुरुमे, तीळ, नाकाचा आकार वगैरे बदलण्यासाठी कॉस्मेटिक शस्त्रक्रियाही केल्या जातात.

आपली देहयष्टी कमनीय, प्रमाणबद्ध, डौलदार, रेखीव, आकर्षक दिसावी म्हणून आपण जागरूक असतो. त्यासाठी व्यायाम व आसने करतो. शरीरातील अतिरिक्त चरबी काढून टाकण्यासाठी उपाययोजना करतो.

आपला चेहरा, आपली देहयष्टी या आपल्याला निसर्गत:च मिळालेल्या असतात. आपल्या त्वचेचा रंग, आपली उंची, आपले केस यांच्यात फारसा बदल घडवणे शक्य नसते. 'पी हळद हो गोरी' असा प्रकार संभवत नाही. तसे कधी काळी काही घडले तर ते अपवादात्मकच!

शरीराबरोबरच आपले मनही सुंदर असावे यासाठी आपण फारसे प्रयत्न करीत नाही. 'मन सुंदर' ही कल्पनाच काहीशी अनोखी वाटते. चांगले मन, निर्मळ मन, सरळ मन, स्वच्छ-स्पष्ट मते असणारे मन... असायला हवे. श्यामची आई श्यामला म्हणते, 'पायाला चिखल लागून ते मळू नयेत म्हणून तू जपतोस, तेवढंच आपल्या मनाला कुविचारांचा मळ लागू नये म्हणून जप.' मनाचे सौंदर्य जपायचे, मन सुंदर घडवायचे म्हणजे आपले विचार निकोप, निरामय करायचे. आपले इतरांशी असणारे संबंध आत्मीयतेने करायचे, इतरांवर प्रेम करायचे.



**सहमती प्रकट करण्याचे मार्ग शोधणे हे सुंदर मनाचे एक लक्षण आहे. तसेच असहमती प्रकट करतानाही समंजसपणा दाखवणे हेही सुंदर मनासाठी आवश्यक आहे. आपली असहमती प्रकट करताना उद्धटपणा, अहंकार, विरोधासाठी विरोध, तुच्छताबुद्धी नसावी.**

इतरांशी संवाद साधण्यात प्रांजळपण ठेवायचे. या दृष्टीने एडवर्ड डी बोनो यांनी काही सूत्रे स्पष्ट केली आहेत.

तुमचे मन सुंदर घडवायचे असेल तर इतरांशी संवाद साधण्यातले तुमचे कौशल्य विकसित करणे ही पहिली गोष्ट. संवाद साधण्यासाठी इतरांशी आपले कुठल्या बाबतीत जुळते, कुठल्या बाबतीत आपले एकमत होते किंवा सहमती होते हे शोधायला हवे. सहमती असेल तर संवाद साधता येतो. सहमती नसेल, विरोध असेल तर संवाद शक्य होत नाही. विचारांचे आदानप्रदान होत नाही. याचा अर्थ इतरांशी प्रत्येक बाबतीत शंभर टक्के सहमती हवी असा नाही. काही बाबतीत असहमती राहणारच. आपला प्रयत्न सुवर्णमध्य गाठण्याचा हवा. आपलंच म्हणणं बरोबर हा अहंभाव दोघांनाही वाटत असेल तर संवाद साधणारच नाही. दुसऱ्या माणसाचा दृष्टिकोन समजावून घेता आला तर अनेक वादाचे मुद्दे संपुष्टात येतात. विशिष्ट नीतिमूल्ये गृहीत धरणारा माणूस विशिष्ट मताचा आग्रह धरतो; अशावेळी माझी नीतिमूल्ये वेगळी आहेत म्हणून मला तुझे मत पटत नाही, परंतु तुझ्या जागी मी असतो तर तुझ्यासारखीच भूमिका घेतली असती हे स्पष्ट करा. एखादे मत विशिष्ट संदर्भात योग्य असते; परंतु सरसकट ते मान्य करण्यासारखे नसते. एकाच गोष्टीकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन असू शकतात याची जाणीव ठेवली तर सहमती होणे सुकर ठरते असे लेखकाचे प्रतिपादन आहे.

सहमती प्रकट करण्याचे मार्ग शोधणे हे सुंदर मनाचे एक लक्षण आहे, तसेच असहमती प्रकट करतानाही समंजसपणा दाखवणे हेही सुंदर मनासाठी आवश्यक आहे. आपली असहमती प्रकट करताना उद्धटपणा, अहंकार, विरोधासाठी विरोध, तुच्छताबुद्धी नसावी. 'हे तुझ्या नीतिमूल्यांशी सुसंगत आहे, पण ते माझ्या बाबतीत बरोबर नाही... हे मत भावनेच्या किंवा पूर्वग्रहांच्या भरात तू मांडत आहेस... हे चुकीच्या पायावर वा तर्कावर आधारलेले आहे... यातून प्रश्न सुटत नाही...' यासारखे असहमतीचे अनेक पर्याय दाखवता येतील.

मतभेद प्रकट करतानाही अशीच दक्षता घ्यायला हवी.

वेगवेगळ्या भूमिका वा नीतिमूल्ये प्रमाण मानल्यामुळे दोन व्यक्तीत मतभेद होतात. वैयक्तिक अनुभवातील फरकामुळेही दृष्टिकोनात भिन्नता दिसते. अनुभव

**वेगळ्या शक्यता व पर्याय शोधल्यामुळे संवाद दर्जेदार व चित्तवेधक होतो... नव्या कल्पनांमुळे, समांतर विचारपद्धतीने, आपल्या प्रतिपादनाला सर्वंकष सत्यशोधनाचे स्वरूप येते... लोकांवर त्यांचे वजन पडते.**

व माहिती यात फरक असेल, भविष्यकाळाबद्दलचे आडाखे वेगवेगळे असतील, वैयक्तिक आवडीनिवडी आणि अग्रक्रम यात फरक असेल तर मतभेद होतात. नक्की कुठे मतभेद आहेत हे नीट समजून घ्या आणि दोन्ही बाजू मांडून निर्णय घ्या.

याच प्रकारे लेखकाने पुढील मुद्द्यांचा ऊहापोह केला आहे.

१. वादविवाद जिंकण्यापेक्षा तो चित्तवेधक कसा करावा?

वेगळ्या शक्यता व पर्याय शोधल्यामुळे संवाद दर्जेदार व चित्तवेधक होतो... नव्या कल्पनांमुळे, समांतर विचारपद्धतीने, आपल्या प्रतिपादनाला सर्वंकष सत्यशोधनाचे स्वरूप येते... लोकांवर त्यांचे वजन पडते.

२. प्रतिसाद कसा द्यावा?

उपदेशपर दाखले, उदाहरणे, दृष्टान्त देऊन चर्चा अधिक वास्तव व मनोवेधक करता येते. गोष्टीतून मूलतत्त्व, संभाव्यता, घटनाक्रम दाखवून, सरसकट केलेल्या विधानाला आव्हान देता येते.

३. चांगला श्रोता कसे व्हावे?

ऐकण्याची क्षमता ठेवणे आणि तिचा आनंद घेणे हा सुंदर मन घडवण्याचा महत्त्वाचा मार्ग आहे. वक्ता काय सांगतो आहे आणि त्याच्या वक्तव्यातून कोणते मुद्दे उपस्थित होतात यातून नवा दृष्टिकोन मिळू शकतो.

४. प्रश्न कसे विचारावे?

कुठल्याही चर्चेत वा संभाषणात प्रश्न हेच देवाणघेवाण करण्याचे मुख्य साधन असते. श्रोत्यांनी प्रश्न विचारण्याच्या संधीच्या शोधात राहावे. लक्ष वेधून घेण्याचा एक मार्ग म्हणून प्रश्न विचारले जातात. सत्यशोधनासाठी प्रश्न उपयोगी ठरतात.

५. समांतर विचार करण्याची पद्धत.

६. आपलं मन सुंदर असण्यासाठी संकल्पना नीट हाताळता यायला हव्या. विचार करण्याच्या प्रक्रियेचे संकल्पना हे महत्त्वाचे अंग आहे. उद्योग, मूल्य, प्रणाली, व्यवहार अशा क्षेत्रांशी संबंधित संकल्पना लक्षात आल्यावर त्यांचे गुणदोष तपासून बघा. संकल्पना नेहमी परिपूर्ण असतातच असे नाही. त्या



कोणत्याही गोष्टीचे सार काढू पाहतात.

७. सुंदर मन पर्याय शोधत असते. पर्याय शोधण्याच्या क्षमतेवर सुंदर मनाचे मोजमाप ठरते. पर्याय शोधण्याची इच्छा, पर्याय शोधण्याचा सर्जनशील प्रयत्न आणि पर्यायाने मूल्यमापन आणि योग्य पर्यायाची निवड... प्रचलित पद्धतीपेक्षा अधिक सरस असा पर्याय मिळू शकतो.

८. भावना आणि मते हे विचाराचे महत्त्वाचे घटक होत. त्याद्वारे आपली मूल्ये प्रकट होतात. तीव्र भावना आणि विशिष्ट मताचा आग्रह यामुळे आकलनाला मर्यादा पडतात.

**सुंदर मन हे नेहमी मतपरिवर्तनाला तयार असते. थोड्या माहितीवर आधारलेली आग्रही मते आणि भरपूर माहितीवर आधारलेली मते- ही दोन्ही टोके टाळून सुवर्णमध्य गाठावा. नव्या माहितीने मत बदलू शकते;**

९. आपल्या आवडीनिवडी ठरवण्यात मूल्यांचा निकष महत्त्वाचा असतो. पायाभूत मूल्ये परिस्थितीनुसार बदलत नाहीत; पण त्यांची क्रमवारी बदलू शकते. तुमची मूल्ये, प्रतिपक्षाची मूल्ये आणि ज्यांच्याविषयी चर्चा होत आहे त्यांची मूल्ये– असे मूल्यांचे तीन संच संभवतात. प्रत्येक संस्थेची उद्दिष्टानुसार व कार्यपद्धतीनुसार मूल्ये असू शकतात. मूल्ये दर्जेदार, कल्पक व पर्यावरणाशी संबंधित असतात.

१०. माहिती आणि तंत्रज्ञान यांच्या आधारे आपली हुशारी आणि गुणवत्ता प्रकट होऊ शकते. माहिती जमवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न हवा. योगायोगाने मिळालेली माहिती पुरेशी नसते. संभाषणाला रंगत आणण्यासाठी चमत्कृतिपूर्ण गोष्टींची माहिती आपल्या पोतडीत हवी.

११. सुंदर मन हे नेहमी मतपरिवर्तनाला तयार असते. थोड्या माहितीवर आधारलेली आग्रही मते आणि भरपूर माहितीवर आधारलेली मते– ही दोन्ही टोके टाळून सुवर्णमध्य गाठावा. नव्या माहितीने मत बदलू शकते; दुसरी मूल्ये स्वीकारली तरी मत बदलू शकते. मतभेदांची दरी दूर करण्याचा प्रयत्न व्हावा.

१२. संभाषणात मध्येच आपले मत मांडणे हे उद्धटपणाचे ठरते. परंतु चर्चा अकारण लांबत गेली तर मध्ये बोलणेही योग्य ठरते. आव्हानात्मक व्यत्यय हे अनेकदा महत्त्वपूर्ण व योग्य असतात. चर्चेत हस्तक्षेप करताना थोडक्यात मुद्दा मांडा वा शंका विचारा.

१३. आपला स्वभाव आपल्या प्रतिमेशी सुसंगत असतो. मौजमजा करण्याचा स्वभाव, संशोधक स्वभाव, विद्यार्थी स्वभाव, भांडखोर स्वभाव, अहंकारी स्वभाव, मूल्यरक्षक, अतिसमजूतदार किंवा अतिरेकी स्वभाव, संशयी स्वभाव, अधिकार

**आपले मन सुंदर ठेवणे याचा अर्थ इतरांशी आपले संबंध सुंदर असणे, त्यासाठी आकर्षक संभाषण करता येणे; सौहार्द व सामंजस्य निर्माण करणे, सकारात्मक दृष्टीने प्रत्येकाकडे बघणे, त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये विकसित करून त्यांचा वापर करणे.**

गाजवणारा स्वभाव- अशा स्वभावांच्या व्यक्ती आपल्याला पदोपदी भेटतात. त्यांच्याशी चर्चा करताना आपल्या स्वभावाचेही प्रकटीकरण होण्यास, इतरांच्या बोलण्यास त्यांच्या स्वभावानुसार होणारा आविष्कार म्हणून आनंद घेता येईल.

१४. संभाषणाचा आरंभ करणे आणि संभाषणात विजय मिळवणे हाही आनंद मिळवण्याचा मार्ग आहे. अभिवादन, वैयक्तिक माहितीची देवाणघेवाण, सामाजिक गप्पागोष्टी, यासाठी ताजे विषय पेपरमधून, बातम्यांमधून शोधा. रंगतदार विषयावर रंजकपणे बोलणे हे सुंदर मनाचे एक लक्षण आहे.

अशा प्रकारे 'संभाषण' रंगतदार करण्याच्या, दुसऱ्यांशी सुसंवाद साधण्याच्या, दुसऱ्याच्या अंतरंगात शिरण्याच्या अनेकविध शक्यता आणि क्लृप्त्या या पुस्तकात दाखवण्यात आल्या आहेत.

आपले मन सुंदर ठेवणे याचा अर्थ इतरांशी आपले संबंध सुंदर असणे, त्यासाठी आकर्षक संभाषण करता येणे; सौहार्द व सामंजस्य निर्माण करणे, सकारात्मक दृष्टीने प्रत्येकाकडे बघणे, त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये विकसित करून त्यांचा वापर करणे. सुंदर मन याचा अर्थ या लेखकाच्या दृष्टीने सुंदर संभाषणाद्वारे, सम्यक विचाराद्वारे इतरांशी संवाद साधणे असा आहे. हा एक खेळ आहे. या खेळात आपण लढायचे आहे, आक्रमकपणे इतरांना नामोहरम करायचे आहे असे नाही. इतरांचे दोष वा त्रुटी दाखवून त्यांना चूक ठरवणे, हीन लेखणे असे नाही. लढाईच्या भावनेने दुसऱ्यावर मात करण्याची भावना बाळगणे हे काही सुंदर मनाचे वा समंजस प्रगल्भ मनाचे लक्षण नाही.

यासाठी जास्तीत जास्त सहा जणांचे एक संभाषण मंडळ काढून, त्यांनी परस्परांशी संपर्क ठेवून संवाद साधत राहावा असा एक मार्ग लेखकाने सुचवला आहे.

नियमितपणे सभा घेणे, निरीक्षकांचे मते ऐकून संभाषणाचे कौशल्य सुधारत जाणे, संवादाच्या वेळी मांडलेल्या कल्पना, पुरावे व मूल्ये यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार मानांकन देणे, इंटरनेटवर त्याविषयी माहिती थोडक्यात देणे– असेही सुचवले आहे. अशी संभाषण मंडळांना एडवर्ड डी बोनो संभाषण मंडळ असे नाव देऊन त्यांची नोंद करता येईल. www.edwarddebono.com,



wwww.edwdebono.com या संकेतस्थळांवर याबद्दल जास्त माहिती मिळू शकेल.

आपल्या व्यक्तिमत्त्वातील नकारात्मक, अहंकेंद्रित आणि स्वार्थपूरक गोष्टींना समंजस सामाजिक भान देऊन, इतरांशी असणारे आपले संबंध सुसंवादी करण्यासाठी एडवर्ड डी बोनोच्या या पुस्तकामुळे प्रेरणा मिळेल. आपल्या स्वभाववृत्तीत, विचारपद्धतीत परिवर्तन घडून येईल.

**पृष्ठे :१६८ ● किंमत:१२० रु. ● सभासदांना:८४ रु. ● पोस्टेज:२०रु.**



## आरोग्य / माहितीपर

| | | |
|---|---|---|
| हृदयविकार निवारण | शुभदा गोगटे | २०० |
| चाळिशीनंतरची वाटचाल | डॉ.सुभाष दांडेकर | १२० |
| सुखद मातृत्व | डॉ.रत्नावली दातार | ७० |
| २० मिनिटे तंदुरुस्तीसाठी : शेली बात्रा | अनु.गंगाधर महाम्बरे | १३० |
| डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी | डॉ. विकास / विनिता गोगटे | २५० |
| बाल परिचर्या | सुधा पाटील | २०० |
| मधुमेह : एक आव्हान | डॉ.अरुणा/अशोक जैन | १२० |
| पाणी :एक अद्‌भुत उपचारपद्धती | अनु.सुभाष जोशी | ७० |
| भारतवैद्यक | डॉ. शाम अष्टेकर | ६०० |
| एकच पेला शिवाम्बूचा | डॉ. शशि पाटील | ९० |
| कर्करोग असाध्य नाही : ए.एन.भिसे | अनु. राम दातार | ५० |
| आपले सौंदर्य आणि त्याची निगा | अनु.मीना टाकळकर | १०० |
| रेकी | शुभदा दामले | ६० |
| आरोग्यासाठी योग | अनु.मंगेश कश्यप | ८० |
| तणावमुक्तीसाठी योगसाधना | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५० |
| वजन कमी करण्यासाठी योगसाधना | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५० |
| कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना | अनु. अरुंधती महाम्बरे | ५० |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

पोस्टेज खर्च वेगळा

## नवे कोरे




### द स्पाय हू लव्ह्ड मी

**इयान फ्लेमिंग**
**अनु. अजित ठाकूर**

**किंमत ११०रु.**
**पोस्टेज २५रु.**

'तो जवळ जवळ सहा फूट उंच, सडपातळ पण तंदुरुस्त दिसत होता. उन्हाने तांबुसलेल्या त्याच्या उभ्या चेहऱ्यावर करड्या-निळ्या रंगाचे स्वच्छ डोळे खुलून दिसत होते. त्या दोघांवर पडलेली त्याची नजर मात्र सावध आणि थंड होती. त्याच्या देखण्या रुपामध्ये मला एक थरारक आणि थोडीशी क्रूर झाक दिसत होती. मला थोडी भीतीच वाटली. पण एव्हाना मला समजलं होतं की, त्याला हसताही येतं.

मला त्याचा चेहरा खूप आकर्षक वाटला. यापूर्वी कोणत्याही चेहऱ्याकडं मी इतकी आकर्षित झाले नसावे. विव्हियन मिचेल नक्कीच संकटात सापडली होती. आपल्या भूतकाळापासून सुटका करून घेताना ती अमेरिकेतल्या एका जंगलमय प्रदेशात पळून आली होती आणि शेवटी 'ड्रीमी पाईन्स मोटर कोर्ट' इथे थांबली होती. तिच्या जगापासून खूपच दूर. दोन निर्दय मारेकरीसुध्दा या मोटेलमध्ये उतरले होते. अत्यंत विकृत सॉल हॉरर आणि स्लग्सी मोरांट.

मोटेलच्या दाराशी थंड डोक्याचा पण आकर्षक असा एक इंग्लिश युवक अवतरला. तेव्हा संकटात सापडलेल्या विव्हियनला नुसतंच हायसं वाटलं नाही; तर ती एकदम हुरळून गेली. कारण तो होता ००७ जेम्स बाँड..... हा माणूस तिला नक्कीच वाचविणार होता. आणि का कोण जाणे तिला वाटलं की, हा गुप्तहेर कदाचित आपल्या प्रेमातही पडणार..



### अमेरिकेतील स्थलांतरित मराठी माणसाच्या द्विधा मानसिकतेचे प्रत्ययकारी चित्रण

### फॉर हिअर, ऑर टू गो?

**अपर्णा वेलणकर**




माहितीतंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे अमेरिकेत भारतीय तरुणांना सध्या खूपच मागणी आहे. त्यामुळे एच-वन व्हिसा, ग्रीनकार्ड वगैरे बातम्यांनाही वृत्तपत्रात अग्रस्थान मिळू लागले आहे. अमेरिकेतील मराठी माणसे त्यामुळे नवीन आत्मविश्वासाने आपली प्रतिमा निर्माण करू पाहत आहेत. बृहन्महाराष्ट्र संमेलनातून त्याची प्रचीती येते.

खरे तर १९६० नंतर अमेरिकेत जाणाऱ्या मराठी तरुणांचे प्रमाण वाढले... आणि आता ते दीड-दोन लाखांच्या घरातही गेले... हे स्थलांतरित झालेले मराठी लोक अमेरिकेतील जीवनशैलीशी, मुख्य प्रवाहाशी कितपत समरस झाले, अमेरिकेत राहूनही ते आपले मराठीपण आणि सांस्कृतिक वळण टिकवून धरण्यात कितपत यशस्वी झाले, त्यांना अमेरिकन समाजव्यवस्थेत उपरेपण कितपत जाणवत राहिले याबद्दल वेगवेगळी मते व्यक्त होत राहिली आहेत.

अमेरिकेत काही काळ घालवून बरेच डॉलर्स साठवून उत्तरायुष्यात भारतात यायचे असे म्हणणारे अनेक मराठी तरुण शेवटी अमेरिकेतच स्थिरावतात; ग्रीनकार्ड घेऊन तेथील नागरिकत्व स्वीकारतात. मुलाबाळांवर मराठी भाषेचे, सणावारांचे, संस्कृतीचे संस्कार करून आपला 'अपराधभाव' कमी करू पाहतात. तेथील वातावरणात जी जीवनशैली सहजतया मुलांना बघायला मिळते ती शैली मुले आत्मसात करतात. तेथील खाणेपिणे, डेटिंग वगैरे. त्यामुळे टीनएजर्स व तरुणवर्ग आणि त्यांचे आईवडील यांच्यात दुरावा उत्पन्न होतो... त्यातूनही काही ताणतणाव निर्माण होतात... दर दोनचार वर्षांनी भारतात महिना-पंधरा दिवस यायचे आणि जुने नातेसंबंध पुन्हा जोडायचे– हा खेळही काही काळ चालू राहतो. पुढे त्यातही औदासीन्य व निरुत्साह येतो. मुलामुलींचे विवाह आपल्याच जातीजमातीत व्हावेत– ही इच्छा बहुतेक पालकांची असते; परंतु अमेरिकन वा अन्य कोणा मुलाशी वा

> **‘मॅक्डोनाल्ड’ सारख्या रेस्टॉरन्टमध्ये गेल्यावर पदार्थ तेथेच बसून खाणार की पार्सल बांधून घरी नेणार (‘फॉर हिअर, ऑर टू गो)’? असा प्रश्न विचारला जातो. तो आपल्या स्थलांतरित मराठी कुटुंबांनाही चपखल लागू पडतो.**

मुलीशी प्रेम जुळणे आणि लग्न न करता किंवा लग्न करून एकत्र राहणे असे काही झाले की मराठी पालकांच्या पोटात गोळा उठतो...

अमेरिकेत स्थायिक झालेला, स्थलांतरित झालेला मराठी माणूस हा अशा मानसिक ओढाताणीत कायम असतो.

‘मॅक्डोनाल्ड’ सारख्या रेस्टॉरन्टमध्ये गेल्यावर पदार्थ तेथेच बसून खाणार की पार्सल बांधून घरी नेणार (‘फॉर हिअर, ऑर टू गो)’? असा प्रश्न विचारला जातो. तो आपल्या स्थलांतरित मराठी कुटुंबांनाही चपखल लागू पडतो. ‘येथे राहणार की परत भारतात जाणार?’ असा प्रश्न ही माणसे विचारत असतात. स्वत:ला तसेच आपल्या सहकाऱ्यांना!

पत्रकार अपर्णा वेलणकर यांनाही अमेरिकेला बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला पहिल्यांदा भेट दिल्यावर या प्रश्नाचे गांभीर्य जाणवले... त्याबाबत अधिक माहिती मिळवून, तेथील मराठी कुटुंबांना भेटून, वेगवेगळ्या पिढ्यांतील मराठी माणसांची मनोगते जाणून घेऊन एखादे पुस्तक लिहावे असे त्यांच्या मनात आले. या कल्पनेला तेथील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्रीनिवास ठाणेदार यांनी आर्थिक सहाय्य देण्याची तयारी दाखवली. त्यामुळे अमेरिकेत काही काळ वास्तव्य व प्रवास करून अपर्णा वेलणकर यांनी ‘फॉर हिअर, ऑर टू गो?’ हे पुस्तक तयार केले आहे. ते वाचनीय आहे, माहितीपूर्ण आहे तसेच अंतर्मुख करणारेही आहे. त्याचे प्रकाशन बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नुकत्याच भरलेल्या अधिवेशनात सिॲटल येथे १ जुलै रोजी झाले.

महिना-दीड महिना अमेरिकेचा धावता दौरा करून दहावीस स्थळांना भेटी देऊन लिहिली गेलेली प्रवासवर्णने मराठीत बरीच निघाली आहेत. काही कलावंतांनीही आपल्या दौऱ्यांच्या निमित्ताने भेटलेल्या व्यक्तींबद्दल आणि स्थळांबद्दल थोडेफार लिहिले आहे. अपर्णा वेलणकर यांचे हे पुस्तक त्या धर्तीवरचे नाही. अमेरिकेतील पर्यटनस्थळांची माहिती देण्यासाठी हे पुस्तक लिहिलेले नाही. अमेरिकन जीवनशैलीची आणि वैभवाची नवलाई सांगण्यासाठी हे पुस्तक तयार केलेले नाही. तर अमेरिकेत स्थलांतरित होऊन स्थायिक झालेल्या मराठी माणसांच्या मानसिकतेचा वेध घेणारे हे पुस्तक आहे. अमेरिकेत उपरे म्हणून वावरता वावरता भारताशी असणारी



> **“कुठलाही पूर्वग्रह दूषित विचारांचा चष्मा न घालता, मनाची पाटी कोरी ठेवून, अभ्यासपूर्ण नितळ नजरेनं दिसेल ते पाहण्याचा, न दिसू शकणारं पाहता यावं म्हणून धडपडण्याचा अट्टाहास करून माणसं आणि त्यांचे अनुभव टिपले आहेत...**

आपली नाळ तुटू नये म्हणून धडपडणाऱ्या बऱ्याच मराठी कुटुंबांनी आता अमेरिका हाच आपला देश, हेच आपले परमनिधान अशा मानसिकते-पर्यंतचा पल्ला गाठलेला आहे... स्थलांतरितांच्या या मानसिक स्थित्यंतरांची प्रक्रिया समजावून घेण्याचा प्रयत्न करणारे हे पुस्तक आहे.

प्रस्तावनेत दिलीप चित्रे यांनी म्हटल्याप्रमाणे अपर्णा वेलणकर यांनी ‘कुठलाही पूर्वग्रह दूषित विचारांचा चष्मा न घालता, मनाची पाटी कोरी ठेवून, अभ्यासपूर्ण नितळ नजरेनं दिसेल ते पाहण्याचा, न दिसू शकणारं पाहता यावं म्हणून धडपडण्याचा अट्टाहास करून माणसं आणि त्यांचे अनुभव टिपले आहेत... कल्पनाशक्तीला ताण न देता वास्तवाचं भान ठेवलं... स्थलांतरितांच्या प्रत्येक प्रश्नाला स्पर्श केला आणि आमच्याच जीवनाच्या दीर्घ चित्रपटाची रिळं उलगडली.’

वेगवेगळ्या व्यक्तींच्या गप्पाटप्पा यात आहेत आणि त्याद्वारे एका समूहाचा, देशान्तरितांच्या आयडेन्टिटीचा हा शोध आहे.

अमेरिकेच्या पहिल्या भेटीनंतर विजय तेंडुलकर यांनी लेखिकेला ‘कशी वाटली अमेरिका..? असा प्रश्न विचारला. त्याला ‘अमेरिका बॉर्न कनफ्युज्ड देसीज’ (ए बी सी डी) मला काही दिसले नाहीत असे तिने उत्तर दिले. तेव्हा तेंडुलकर म्हणाले, ‘एकदम पुढे कशी उडी मारतेस? त्या मुलांच्या आईवडिलांच्या पिढीशी बोल. तो महत्त्वाचा विषय आहे. डोक्याला चांगला त्रास देईल तुझ्या.’

त्यातून या पुस्तकाचे मध्यवर्ती सूत्र निश्चित झाले. कॅनडा-अमेरिकामधील पन्नासावर कुटुंबाशी संपर्क साधून चर्चा करून मुलाखती, मनोगते, हकीकती, पूर्वप्रसिद्ध साहित्य, एकता वगैरे मासिकांचे अंक, यशोगाथा याद्वारे या पुस्तकातील तपशीलाची रूपरेखा तयार झाली.

चुरचुरीत गप्पांच्या शैलीत हा सारा अनुभवाचा व चिंतनाचा पट मांडण्यात आला आहे. ‘बो, टाय, लिंबाचं लोणचं आणि वन वे तिकीट’ घेऊन १९६० च्या दशकात मराठी तरुण अमेरिकेत जाऊन आपले बस्तान बसवण्यासाठी धडपडू लागला... सोवळं सोडलं पण ओवळं गवसेना; तरी धीर न सोडता पावला पावलावर आव्हानं स्वीकारत, पुढं जात राहून आपलं द ग्रेट अमेरिकन ड्रीम प्रत्यक्षात आणण्यासाठी... अविरत परिश्रमांची रास रचली... त्यावेळी अमेरिकेत

**१९६५ साली अमेरिकेच्या इमिग्रेशन कायद्यात दुरुस्ती झाली. त्यानंतरच्या दहा वर्षांत महाराष्ट्रातून बरेच तरुण अमेरिकेत गेले... फॅमिली रियुनिफिकेशनमुळे पत्नी-मुलांना अमेरिकेत नेणे शक्य झाले.**

जाणाऱ्या पावलांचेच ठसे उमटत, आता तिकडून परतणाऱ्या पावलांचीही वर्दळ दिसते... नव्या आधुनिक तंत्रज्ञानात अग्रगण्य असणाऱ्या ग्लोबल तारुण्याचा दिमाख आज दिसतो... ही श्री शिल्लक... येथपर्यंतची मराठी माणसाची गेल्या चाळीस-पन्नास वर्षांतील मजल अठरा प्रकरणांद्वारे उलगडून दाखवली गेली आहे.

चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी अमेरिकेला नशीब काढायला गेलेल्या विनायक गोखले यांच्या डायरीतल्या नोंदीतून त्यावेळच्या मराठी तरुणांच्या मानसिकतेची कल्पना येते.

दोन सूट, दोन वुलन पँटस्, चार शर्टस, ब्रुकबॉन्ड चहा, लोणचं, बुटांची लेस, डिक्शनरी... यासारखी यादी त्यावेळच्या गरजांची प्राथमिकता स्पष्ट करते... बोटीने प्रवास करावा लागे.

१९६५ साली अमेरिकेच्या इमिग्रेशन कायद्यात दुरुस्ती झाली. त्यानंतरच्या दहा वर्षांत महाराष्ट्रातून बरेच तरुण अमेरिकेत गेले... फॅमिली रियुनिफिकेशनमुळे पत्नी-मुलांना अमेरिकेत नेणे शक्य झाले. अमेरिकेचे नागरिकत्व मिळालेल्या व्यक्तींना आपली अविवाहित मुले, जोडीदार (स्पाऊज), विवाहित मुले, भावंडे... वगैरेंना अमेरिकेत जाण्याचे दरवाजे बरेचसे उघडे झाले.

विमान सेवेमुळे बोटीने प्रवासाचे प्रमाण कमी होत गेले...

पंढरपूरच्या गोविंद पाच्छापूरकरांच्या, राष्ट्रसंघात काम करणाऱ्या नाना पटवर्धनांच्या, आर्किटेक्ट गायतोंडे यांच्या कहाण्यांतून साठच्या दशकातले वातावरण समोर येते (प्रकरण चार).

हे तरुण भारतात येऊन लग्ने करीत... पत्नी भारतातच राही... पाच-सात महिन्यांनी व्हिसा मिळे... नवरा दिवसभर ऑफिसमध्ये, बायको घरी... तेथे भारतीय वस्तू, भाज्या, डाळी यांचा शुकशुकाट... एकांतवासाची कैद... जीवघेणी थंडी... बोलायला कोणी नाही... भारतीय मसाल्याचे पदार्थ वगैरे मोजक्या शहरी मिळत... तेव्हा ओळखीच्या अशा जागा शोधाव्या लागत... तेथील खाद्यपदार्थ... त्यांची सवय हळूहळू होई... गोऱ्या कातडीची भीड... इंग्रजी ॲक्सेंटचा न्यूनगंड... मराठी शब्द कानावर पडणे मुश्किल....

...तशात 'एशियन्स' म्हणून कधीकधी होणारा पक्षपात... आपले उपरेपण जाणवून देई.



पुढे मुलेबाळे घरात बागडू लागली... त्यांच्या शाळा... त्यांचे अमेरिकानायझेशन... थोडी सुबत्ता... आपल्या भाषेची, साहित्याची, कलाकौशल्याची, स्मरणरंजनाची ओढ... मराठी मंडळ काढणे, नाटके करणे, सण साजरे करणे, आपलेपणाचा आभास निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले...

तरीही भारतात परतायचे स्वप्न घोटाळत राही...

**१९९० च्या दशकात या मुलामुलींच्या लग्नाचे प्रश्न 'इमिग्रन्ट फॅमिली पॅटर्न'मध्ये जाणवू लागतात. ''एकमेकांबरोबर लग्न न करता राहणे बरे वाटते... लग्नाची मात्र भीती वाटते'' असे सॉनयासारख्या मुली स्पष्ट करतात.**

मुले मोठी होत– तसे नवे प्रश्न निर्माण होत. त्या मुलांवर मराठी संस्कार करायचा हट्ट पालक करीत. पण मुले आपल्या शाळेतील इतरांचे अनुकरण करणेच योग्य समजत... त्यातून होणारी घुसमट... संघर्ष... १९७०-८० च्या दशकात हा नवा संघर्ष...

दोन संस्कृतींतील दुरावा... दोन पिढ्यांमध्ये दुरावा निर्माण करू लागला...

बॉयफ्रेंड- गर्लफ्रेंड- डेटिंग- धूम्रपान- बीअरचा स्वाद- डान्स...

आजी-आजोबांना आणून मुलांवर संस्कार करायचा प्रयत्न... त्यातही ताणतणाव...

१९८५ च्या पुढे अमेरिका बॉर्न कॉन्फिडंट देसीज ही पिढी प्रभावशाली ठरली. क्लेरी चॉव या चायनीज-अमेरिकन लेखिकेच्या 'नाईट आउट'वरून या पिढीची मानसिकता स्पष्ट होते (प्रकरण नऊ). 'नमस्ते इंडिया' मधील पद्मा रंगास्वामीला भेटणारा तरुण 'व्हेन इंडियन पेरेन्टस से सक्सेस दे मीन मनी' हे सूत्र दिसते.

१९९० च्या दशकात या मुलामुलींच्या लग्नाचे प्रश्न 'इमिग्रन्ट फॅमिली पॅटर्न'मध्ये जाणवू लागतात. ''एकमेकांबरोबर लग्न न करता राहणे बरे वाटते... लग्नाची मात्र भीती वाटते'' असे सॉनयासारख्या मुली स्पष्ट करतात.

आपल्या देशांतराची किंमत आपली मुले मोजत आहेत असा अपराध भाव पालकांना सतावतो.

अशावेळी परदेशी सून वा परदेशी जावई... स्वीकारायलाही तयारी असावी लागते.

लैंगिक शुचिता, व्हिक्टोरियन नीतिमूल्ये– घर, संसार, मुलं, धर्म व लग्न यांबद्दलच्या सांकेतिक कल्पना पार ढवळून निघतात.

'महाराष्ट्र मंडळांचा सांस्कृतिक आग्रह म्हणजे आपला इगो सुखावण्यासाठी

> **लैंगिक शुचिता, व्हिक्टोरियन नीतिमूल्ये- घर, संसार, मुलं, धर्म व लग्न यांबद्दलच्या सांकेतिक कल्पना पार ढवळून निघतात. ''महाराष्ट्र मंडळांचा सांस्कृतिक आग्रह म्हणजे आपला इगो सुखावण्यासाठी आणि हातखंडा स्मरणरंजनासाठी शोधलेला शॉर्टकट''**

आणि हातखंडा स्मरणरंजनासाठी शोधलेला शॉर्टकट'' असे या तरुण पिढीला वाटते. (१२६)

या पिढीला डॅड-मॉमकडून पैसे घेणे अपमानास्पद वाटते. स्वत:च्या पायावर उभे राहण्याची जिद्द असते.

एक्स = एक्स + १ सिंड्रोमी हा एनआरआय एक्सपिरियन्सही एका प्रकरणाचा विषय होतो (प्र. १०). या व्याधीची लक्षणे : रेस्टलेसनेस, अँक्झायटी, होप आणि नॉस्टॅल्जिया.

आपण परत मायदेशी जायचे. यंदा? म्हणजे 'एक्स' वर्षी?

यंदा नको, पुढच्या वर्षी नक्की. एक्स + १.

दरवर्षी एक्सची व्हॅल्यू बदलत राहते. त्यामुळे या व्याधीची लागण होते.

ही व्याधी स्थलांतरित भारतीयांनाच जास्त होते. चिनी, जपानी, कोरियन वगैरेंना त्रास देत नाही.

'एकदा अमेरिकेत जाण्याची पहिली चूक केलीस, आता परत येण्याची दुसरी चूक करू नकोस.' असे काहीजण स्पष्ट सांगतात. उगाच मनाची द्विधा अवस्था नको. (१४३)

सुखसमृद्धीचा लाभ होऊनही काही माणसांची, उत्तरायुष्यात परवड होते. आपल्याच मुलाबाळांच्या संसारात उपरेपण जाणवते. त्याबद्दलचे किस्से अकराव्या प्रकरणात आले आहेत.

स्थलांतरितांच्या कुटुंबातील वृद्ध व्यक्तींची परवड, पराधीनता, एकाकीपणा, वैफल्य, आपले सोवळे-ओवळे पाळण्याचा आग्रह– आणि यातूनही तग धरणाऱ्या काही व्यक्ती. (प्र. १२)

अमेरिकेत राहणाऱ्या मुलाशी लग्न झाल्यामुळे ध्यानीमनी नसताना अमेरिकेसारख्या देशात आल्यावर नवपरिणित मुलीची होणारी अवस्था... तिचा मागोवा तेराव्या प्रकरणात घेतला आहे.

अमेरिकेतील म्हातारपणाचे उत्तररंगही लता देशपांडे, दुर्गा पाच्छापूरकर, माधुरी बापट वगैरेंच्या मनोगतांतून उघड होतात.

अमेरिकेत राहिल्याबद्दल आपल्या भारतीय नातलगांच्या प्रतिक्रियाही मजेशीर असतात. 'आपलेपणा'ही कमी होतो.



रमेश मंत्री, सुभाष भेंडे आणि बाळ सामंत या तिघांनी अमेरिका प्रवासानंतर जे लेखन केले ते अनेक मराठी माणसांना दुखावणारे ठरले– त्याच्या खपल्याही काढून त्या जखमा खुल्या करणारे पंधरावे प्रकरण सुन्न करते.

भारतातून येणारे पाहुणे– त्यांच्या टीकाटिपण्या– त्यांची शेरेबाजीही क्लेशकारक ठरते.

> **मायदेशाची ऊब व सुरक्षितता सोडून दहा हजार मैलांवर अनोळखी वातावरणात जाऊन स्वतःचे घरटे आणि स्थान निर्माण करण्यातले आव्हान आणि त्यातील जिद्द यांची वस्तुनिष्ठ कल्पना देणारे हे पुस्तक**

मायदेशाची ऊब व सुरक्षितता सोडून दहा हजार मैलांवर अनोळखी वातावरणात जाऊन स्वत:चे घरटे आणि स्थान निर्माण करण्यातले आव्हान आणि त्यातील जिद्द यांची वस्तुनिष्ठ कल्पना देणारे हे पुस्तक– म्हणूनच अंतर्मुख करणारे आहे.

चुरचुरीत, प्रकट चिंतनात्मक शैलीमुळे आत्मटीकेची धार बरीच सुसह्य होते, हे खरे असले तरी अमेरिकेतील वास्तव्याची किंमत चुकवतच तेथे स्थिर होऊन आपली आत्मप्रतिमा जपणे हे आव्हान आहेच हे मनावर ठसवणारे हे पुस्तक आहे.

**पृष्ठे :३१२ ● किंमत: २२५ रु. ● सभासदांना: १५७ रु. ● पोस्टेज: २५रु.**





अकाली वैधव्य आल्यामुळे प्रपंचात येणाऱ्या अनेक अडीअडचणींना, कोर्ट-खटल्यांना धीरोदात्तपणे सामोऱ्या जाणाऱ्या जिद्दी स्त्रीव्यक्तीमत्वाचे दर्शन.

**केतकरवहिनी**


**उमा कुलकर्णी**

**१५०रु. पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## जेम्स बाँड मालिकेतील नवे कोरे ......

# यू ओन्ली लिव्ह ट्वाइस




**इयान फ्लेमिंग अनु. जयवंत चुनेकर**

**किंमत : १६०रु.** पोस्टेज : २० रु.

'द टाइम्स' मध्ये मृत्युलेख लिहिताना 'एम्'नी लिहिलं : 'कमांडर बाँड हे जपानला शासकीय कामगिरीवर असताना ठार झाल्याचे समजते. ते वाचले असण्याची आशा आता सोडून द्यायला हवी ...'

कमांडर बाँड म्हणजे जेम्स बाँड. प्रसन्न, मोहक व्यक्तिमत्त्वाचा, सुसंस्कृत, देखणा, थंड, निर्दयीपणाने शत्रूचा समाचार घेणारा; अतिशय धोकादायक ब्रिटिश सीक्रेट एजंट.

अर्न्स्ट स्टावरो ब्लोफेल्ड. बुद्धिमान पण सैतानी, विकृत मनोवृत्तीचा शास्त्रज्ञ. साऱ्या जगाच्या सुरक्षिततेला वेठीस धरणारा.

ब्लोफेल्डचे दोन प्रकल्प बाँड उद्ध्वस्त करतो, म्हणून त्याच्या पत्नीची ब्लोफेल्ड हत्या घडवतो. मनानं खचलेल्या बाँडची कारकीर्दच संपुष्टात येऊ पाहते. पण 'एम्' त्याला ह्या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी अखेरचा प्रयत्न म्हणून जवळपास अशक्यप्राय अशा जपानच्या कामगिरीवर पाठवतात. बाँडचा तिथल्या एका गूढ वास्तूत – 'मृत्युदुर्गात' प्रवेश होतो.

आणि त्याची गाठ पडते त्याच्या जुन्या शत्रूशी! दोन वेळा तावडीतून सुटलेल्या अर्न्स्ट स्टावरो ब्लोफेल्डशी!

आता मात्र शेवट अटळ आहे.

कुणाचा? एम् नी म्हटल्याप्रमाणे बाँडचा...?



**नोकरीविरहित अर्थव्यवस्थेत आपल्या करिअरची सृजनशील रचना करण्याचे आव्हान**

## डिझाईन युअर करिअर

**श्रीनिवास पंडित**

**अनु. सुप्रिया वकील**




पदवीधर व्हायचे आणि नोकरी मिळवायची... नोकरी मिळाली की आयुष्यभराची सुरक्षितता. दरमहा पगार, सुट्या, रजा. अशी आजवर आपली मानसिकता.

परंतु आता प्रत्येक ठिकाणी राखीव जागा. आपली गुणवत्ता असली, शिक्षण असले तरी योग्य नोकरीची शाश्वती नाही.

पूर्वी नोकरी लागली की ती जन्मभराची असे समजले जाई. जन्मभर शिक्षक, प्राध्यापक, शिपाई, कारकून, कामगार, स्टेनो टायपिस्ट, सेल्समन, पोस्टमन, बँक कर्मचारी, आयुर्विमा कर्मचारी...

आता नोकरीला सुरुवात करताना सेल्समन असणारा तरुण अल्पावधीत सेल्स मॅनेजर होऊ शकतो. स्वत:चा उद्योगही सुरू करू शकतो.

नोकऱ्यांचे प्रमाण आणि स्वरूप आता बदलत आहे.

'सुरक्षित नोकरी'ची मानसिकता आता बदलत आहे.

आयपीओ, बीपीओमध्ये महिना तीस-चाळीस हजार रुपये पगार मिळवणारा तरुण पदवीधरही आता नोकरी एके नोकरी हे ध्येय समोर ठेवून समाधान मानत नाही. तो स्वत:ची कन्सल्टन्सी, सॉफ्टवेअर सर्व्हिस सुरू करू पाहतो. नोकरीत राहून तेच ते चाकोरीतले काम यांत्रिकपणे करीत राहण्याऐवजी, तो आपल्या बुद्धीचा, कल्पकतेचा, ज्ञानाचा वापर करून प्रगतीची उमेद बाळगतो... एखादी नवी कल्पना आपल्याला कुठल्या कुठे घेऊन जाईल हे त्याला जाणवत राहते. हॉटमेलचा सबीर भाटिया, इन्फोसिसचे डॉ. नारायण मूर्ती, विप्रोचे अझीम प्रेमजी, माइंड ट्रीचे अशोक सूता, बायोकॉनची किरण मुझुमदार... त्याला खुणावत असतात...

'नोकरीविरहित' करिअर करण्याची ओढ तुम्हाला असेल तर 'डिझाइन युवर

**७४ वर्षे (६ लाख ४८ हजार तास) आयुर्मान मानले आणि काम करण्याची प्रत्यक्ष वर्षे ३५ धरली तर आपण प्रत्यक्षात फक्त २५०६० तास काम करतो (वर्षात पगारी सुट्या वगैरे धरून प्रत्यक्षा कामाचे दिवस १७९; दररोज प्रत्यक्ष काम ४ तास असे गृहीत धरले आहे).**

करिअर' हे पुस्तक तुम्ही वाचायला हवे. अभ्यासायला हवे. आत्मसात करायला हवे.

श्रीनिवास पंडित यांनी व्यवस्थापन समुपदेशक म्हणून दीर्घकाळ काम केले आहे. यशस्वी व्यक्तींशी संपर्क साधून यशाचे गुपित जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'थॉट लीडर्स' सारखे पुस्तकही लिहिले आहे. 'स्वत:ला कमी लेखू नका. तुम्ही सर्जनशील आहात. सदैव नव्या गोष्टी आत्मसात करा आणि त्या प्रत्यक्ष आचरणात आणण्यात मग्न राहा' असा संदेश ते देऊ पाहतात.

'डिझाइन युवर करिअर' या पुस्तकासाठी त्यांनी दोन वर्षे मेहनत घेतली आहे. 'त्यासाठी दोन वर्षे आपले जिवलग मित्र आणि कुटुंबीय यांच्याशी संपर्क जवळपास टाळला' असे त्यांनी स्वत:च म्हटले आहे. त्यामुळे या पुस्तकातील विवेचन अधिकच अर्थपूर्ण ठरायला हवे.

'नोकऱ्या नष्ट होतात; काम टिकून राहते', 'नवे करिअर', 'नवी मनोभूमिका', 'तुमचे बलस्थान', 'तुमच्या सामर्थ्याचा वापर', 'सर्जनशीलता' अशी प्रकरणे या पुस्तकात असून, हे सगळे ज्ञान प्रत्यक्षात आणण्याचे कळकळीचे आवाहन केले आहे.

नोकरीला अभेद्य सुरक्षित कवच देणारी सरकारी ध्येयधोरणे आणि कायदेकानून यांनी कार्यसंस्कृतीविरोधी वातावरण निर्माण केले. काम ही गोष्ट अप्रतिष्ठित ठरवली. कामाऐवजी कामगाराला प्रतिष्ठा दिली. त्यामुळे भ्रष्टाचाराचे स्तोम माजले. 'आपल्याला ज्या कामासाठी पैसे मिळतात ते कामच न करणे हा भ्रष्टाचार आहे.' ७४ वर्षे (६ लाख ४८ हजार तास) आयुर्मान मानले आणि काम करण्याची प्रत्यक्ष वर्षे ३५ धरली तर आपण प्रत्यक्षात फक्त २५०६० तास काम करतो (वर्षात पगारी सुट्या वगैरे धरून प्रत्यक्ष कामाचे दिवस १७९; दररोज प्रत्यक्ष काम ४ तास असे गृहीत धरले आहे). म्हणजे आपली उत्पादनक्षमता फक्त साडेतीन-चार टक्के आहे हे लक्षात येते. माणसे नोकरी करतात; पण काम करीत नाहीत ही सद्य:स्थिती जागतिकीकरणाच्या आणि स्पर्धेच्या वातावरणात टिकू शकणार नाही; त्यामुळे नोकऱ्या कमी होत आहेत; स्वेच्छानिवृत्तीद्वारे अतिरिक्त कर्मचाऱ्यांना घरी बसवले जात आहे.

माहिती तंत्रज्ञानक्षेत्रातील क्रांतीमुळे नोकऱ्या (जॉब्ज) कमी होत आहेत; आणि कामे (वर्क) करून घेण्यासाठी गुणवत्ता आणि कालबद्ध कार्यप्रणाली यांवर भर



देऊन नवी कार्यसंस्कृती अंगीकारली जात आहे. उद्योगव्यवसायाचे जग वैश्विकदृष्ट्या एकसंध होत आहे. वेगवेगळ्या टाइम झोन्सचा आणि अंतरांचा विचार करून माहिती तंत्रज्ञान कंपन्यांनी वैश्विक नमुने प्रत्यक्षात आणून नव्या कार्यपद्धतीला चालना दिली आहे.

**''नोकरीविरहित अर्थव्यवस्थेत समृद्धी साधण्यासाठी आपण आपल्या सामर्थ्यांच्या तरफ बळाचा सृजनशील वापर करायला हवा, त्यासाठी स्वतःवरच परिश्रम घ्यायला हवेत... करिअरची रचनात्मक आखणी करायला हवी.**

स्वयंचलित यंत्रे, स्पर्धात्मक मागणीवर आधारित उत्पादनक्षमता यामुळे नव्या कौशल्यक्षमतेची गरज वाढत आहे. त्यामुळे काम वाढत आहे; पण नोकऱ्या कमी होत आहेत. तेव्हा नोकरीविरहित जगात आपल्याला आपले करिअर करायचे आहे ही खूणगाठ मनाशी बाळगून आपण आपले जीवनविषयक धोरण ठरवायला हवे हे या पुस्तकाद्वारे श्रीनिवास पंडित हे आपल्या मनावर ठसवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे युक्तिवाद करीत आहेत.

लोकसंख्यावाढ, माहिती तंत्रज्ञान, विकासकार्यांची वाढती गरज, बदली व्यक्तींची गरज, जागतिकीकरण, कामांचा अनुशेष यामुळे आगामी काळात सॉफ्टवेअर, डॉट कॉम्स, मल्टिमीडिया, करमणूक क्षेत्र, किरकोळ व्यापार, आरोग्य सुविधा, विमा, दूरसंचार या प्रचंड वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रात लाखो कार्यसंधी उपलब्ध होणार आहेत. या सर्व क्षेत्रात 'आउटसोर्सिंग'मुळे एकूण कार्यपद्धतीचे स्वरूपही बदलत राहणार आहे. टेलिवर्किंग, मेडिकल ट्रॅन्सक्रिप्शन, कॉलसेंटर्स, डाटाबेस सेवा, कार्यालयांतर्गत कामे, माहितीचे संकलन-वर्गीकरण-रूपांतर यामुळे नवनव्या कामांची जागतिक क्षितिजे खुली होत आहेत. टेक्निकल तज्ज्ञ, टेकी किंवा टेक्नोप्रेनर हे आपले समकालीन आदर्श आहेत.

'नोकरीविरहित अर्थव्यवस्थेत समृद्धी साधण्यासाठी आपण आपल्या सामर्थ्यांच्या तरफ बळाचा सृजनशील वापर करायला हवा, त्यासाठी स्वत:वरच परिश्रम घ्यायला हवेत... करिअरची रचनात्मक आखणी करायला हवी. पूर्वी उत्तुंग संस्थात्मक भिंती होत्या, त्या चढून जाण्यासाठी शिड्या होत्या; आज त्या भिंतीही नाहीत आणि शिड्याही नाहीत... त्यामुळे संपत्तीनिर्मितीसाठी नव्या पॅराडइम शिफ्टची (नव्या आकलनाची, नव्या संदर्भ चौकटीची) गरज आहे...'

यापुढे आपण स्वत: म्हणजेच एक संस्था आहोत अशा पद्धतीने स्वत:कडे बघायला हवे. 'इन्डिव्हिज्युअलाइज्ड कॉर्पोरेशन' या पुस्तकात सुमंत्रा घोसाल आणि ख्रिस्तोफर बार्टलेट यांनी त्याबद्दल विवेचन केले आहे.

**ताजे तरतरीत मन, चांगल्या उदाहरणांचे आदर्श, दर्जेदार उत्पादन, उत्कृष्ट सेवा, कार्य व संपत्ती, करिअर-केंद्र, कर्तृत्वाची फलनिष्पत्ती, शोधकौशल्य, शिकण्याची क्षमता या नऊ गुणवैशिष्ट्यांनी नव्या युगातील मनोभूमिकेची जडणघडण व्हायला हवी.**

स्वयंरोजगार हे यापुढच्या काळात अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे सूत्र राहणार आहे.

स्वयंरोजगाराला कसलेही सुरक्षा कवच नाही.

तुम्हीच तुमचे बॉस. एखादे काम हाती घेणे, वेळेत पूर्ण करणे, तुमच्या ग्राहकाच्या त्याबाबतच्या अटी व अपेक्षा लक्षात घेऊन वेळेचे व्यवस्थापन करणे हे तुमचे तुम्हीच करायचे.

यापुढे कामाचे तास हेही बदलते राहतील (फ्लेक्सी टाइम व शिफ्ट वर्क). नऊ ते पाच अशी एकच एक कार्यालयीन वेळ ही संकल्पनाच मोडीत निघेल.

वाढत्या आयुर्मर्यादेमुळे यापुढे एकच एक धोपटमार्गी करिअर ही कल्पनाही बाजूला सारून जोड करिअर, तिसरे करिअर यासारख्या गोष्टींचा स्वीकार करावा लागेल. साठाव्या वर्षी निवृत्त होणारा माणूस पुढे दहा-पंधरा वर्षे काम करण्यास सक्षम असायला हवा. पुढे अर्धवेळ नोकरी किंवा स्वयंरोजगार यामार्गे थोडेफार अर्थार्जन करणे आणि मानसिक समाधान मिळवणे क्रमप्राप्त ठरेल. साठी वा निवृत्ती म्हणजे भावी काळाबद्दल नकारात्मक, निराशावाद– हे चूक होय.

कार्यरत जीवन ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. सर्वांमध्ये समान क्षमता असतात असे गृहीत होते. परंतु ते आता मागे पडले आहे.

आपल्या प्रत्येकात निरनिराळ्या क्षमता असतात. त्यांचा वापर करा. कामगिरीनुसार मोबदला द्या (किंवा घ्या) हा आजचा युगविशेष आहे.

आता वस्तूऐवजी आर्थिक विकासाची 'कल्पना' (आयडिया) हे सूत्र बनले आहे. त्यामुळे स्वयंसंघटन, नवी कार्यप्रणाली, नवा परस्परावलंबी आकृतिबंध, नवी विचारप्रक्रिया, नवे नेटवर्क यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

ताजे तरतरीत मन, चांगल्या उदाहरणांचे आदर्श, दर्जेदार उत्पादन, उत्कृष्ट सेवा, कार्य व संपत्ती, करिअर-केंद्र, कर्तृत्वाची फलनिष्पत्ती, शोधकौशल्य, शिकण्याची क्षमता या नऊ गुणवैशिष्ट्यांनी नव्या युगातील मनोभूमिकेची जडणघडण व्हायला हवी.

त्यासाठी स्वॉट अभ्यासपद्धतीने स्वत:ची बलस्थाने, वैगुण्ये वा दुबळे घटक, संधी आणि धोके यांची बारकाईने तपासणी करा. स्वत:चा डाटाबेस तयार करा.

डाटा या शब्दाच्या स्पेलिंगनुसार इच्छा (डिझायर), क्षमता (ॲबिसिटी), स्वभाव (टेंपरामेंट), बलस्थाने (ॲसेट्स) यांचीही नोंद करा.



ट्रॅन्स्फरेबल स्किल्स हे तुमचे सर्वात मोठे बलस्थान होय. त्यात माहिती, विविध वस्तू, माणसे व कल्पना यांचा समावेश होतो. त्याद्वारे स्वत:चे स्वत:बद्दलचे आकलन वाढवा.

**आयन रँड या लेखिकेच्या मते अमेरिकन लोकांचे सर्वात अभिमानास्पद असे वेगळेपण म्हणजे पैसा कमावणे या वाक्प्रचाराची निर्मिती हे आहे. संपत्ती ही स्थिर, स्थावर नसते. ती वारशाने, वाटून, लुटून वा मेहेरबानी म्हणून मिळवायची नसते.**

त्याचबरोबर आपण ज्या लोकांबरोबर काम करीत आहोत, त्यांचा तुमच्यावर किंवा तुमचा त्यांच्यावर जो प्रभाव व परिणाम होत आहे, त्याचाही मागोवा घ्या. तुम्हाला यश मिळते ते कोणामुळे, अपयश येते ते कोणामुळे– हे शोधा. आपल्या सहकाऱ्यांपैकी काही माणसे आपल्या कर्तृत्वाला पूरक-पोषक ठरतात; काही माणसे अडसर ठरतात. अनुत्पादक कामात तुमचा वेळ जात असेल तर तो आकृतिबंध झुगारून देण्याची गरज आहे. आपल्या हातून उत्तम कार्य व्हायला हवे, ते कार्यक्षमताधिष्ठित हवे, आपल्या क्षेत्रात आपण अग्रगण्य हवे अशी मानसिकता त्यासाठी आवश्यक आहे.

उत्तम आदर्श समोर ठेवा. नारायण मूर्ती (इन्फोसिस), वर्गीस कुरियन (आणंद सहकारी दुग्ध क्रांतीचे प्रणेते), दीपक पारेख (हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन) यांच्यासारखे आदर्श समोर ठेवले तर आपणासही काहीतरी चांगले करण्याची प्रेरणा होईल. तसे बळ लाभेल.

अमेरिका हा देश आज आर्थिकदृष्ट्या सर्वात अग्रेसर आहे.

याचे कारण पैसा कमावणे, संपत्ती निर्माण करणे या बाबींकडे अमेरिकन लोकांनी आपले लक्ष प्रथमपासूनच केंद्रित केले. आयन रँड या लेखिकेच्या मते अमेरिकन लोकांचे सर्वात अभिमानास्पद असे वेगळेपण म्हणजे पैसा कमावणे या वाक्प्रचाराची निर्मिती हे आहे. संपत्ती ही स्थिर, स्थावर नसते. ती वारशाने, वाटून, लुटून वा मेहेरबानी म्हणून मिळवायची नसते. ती निर्माण करायची असते हे अमेरिकन लोकांनी सगळ्यात आधी जाणले आणि त्यासाठी पोषक नीतिमूल्यांची चौकट उभी केली. 'सुईच्या नेढ्यातून एकवेळ उंट जाईल पण धनिक जाणार नाही', 'संपत्ती ही कामगारांच्या शोषणातून निर्माण होते' यासारखे समज संपत्तीच्या निर्मितीकडे पाहण्याची दूषित वा विकृत दृष्टी स्पष्ट करतात. त्यामुळे आपण आपल्यासमोर काही सूत्रे ठेवायला हवी.

१. मला श्रीमंत व्हायचे आहे. मी निर्माण केलेली संपत्ती मला उत्तम जीवनमान मिळवून देईल. माझ्या कुटुंबियांना समृद्ध करील, माझ्या आवडीच्या

क्षेत्रात प्रगती करण्यासाठी वापरता येईल. त्यायोगे देशाच्या समृद्धीला माझा हातभार लागेल.

२. मला स्वतंत्र व्हायचे आहे. माझ्या जीवनाचे उत्तरदायित्व माझे मलाच स्वीकारायचे आहे.

३. मला माझ्या पृथगात्म 'स्व'ची अभिव्यक्ती घडवण्यासाठी योग्य असे अपूर्व करिअर घडवायचे आहे.

४. मला माझी विधायक, सृजनशक्ती योग्य प्रकारे वापरायची आहे, मुक्त करायची आहे.

५. करिअर घडवणे म्हणजे जे माझ्या बाबतीत आज अस्तित्वात नाही, ते घडवणे, ते मिळवणे. त्यासाठी माझी इच्छाशक्ती, माझी नवनिर्मितीची ओढ मला उपयोगात आणायची आहे.

**करिअर घडवणे म्हणजे जे माझ्या बाबतीत आज अस्तित्वात नाही, ते घडवणे, ते मिळवणे. त्यासाठी माझी इच्छाशक्ती, माझी नवनिर्मितीची ओढ मला उपयोगात आणायची आहे.**

या सर्जनशील व्यक्तीची काही स्वभाववैशिष्ट्येही सांगता येतील.

१. आक्रमकता व सहकार्य वृत्ती. उदा. विक्री व्यवस्थापक कार्यालयात आक्रमक असू शकतो. पण ग्राहकांशी पूर्ण सहकार्य करतो.

२. सर्जनशील व्यक्ती एका टोकापासून दुसऱ्या टोकाकडे लंबकाप्रमाणे आंदोलने घेतात. ती दोन्ही टोकांच्या अनुभवांना सामोरी जाते. अपयशाची भीती आणि यशाचा आनंद– दोन्ही घेऊ शकते.

३. अशा व्यक्तीची शारीरिक ऊर्जा प्रचंड असते; पण अंतर्यामी ती निवांत, चिंतनशील असते.

४. चिकाटी, शिस्त, सहनशीलता, चिवटपणे पाठपुरावा करण्याची वृत्ती, विशिष्ट प्रमाणात सकारात्मक आनंदी वृत्ती.

५. एका बाजूला कल्पकता आणि काल्पनिकता यातील पर्याय निवडण्याची क्षमता; दुसऱ्या बाजूला वास्तवाचे भान. कलावंत, कवी, शास्त्रज्ञ, संगीतकार यांच्याचप्रमाणे उद्योगपती आणि व्यवस्थापक यांच्यातही अशी क्षमता आवश्यक.

६. बंडखोर आणि स्वतंत्र. स्वत:च्या क्षेत्रात प्रस्थापित; पण सर्व ज्ञानक्षेत्रात संचार.

७. एकाच वेळी अभिमानी आणि नम्र. आपल्या योगदानाचे मोल जाणतात; पण पूर्वसुरींचे ऋणही मान्य.

थोरामोठ्यांच्या उदाहरणावरून आपल्यापुढे एक मार्गदर्शक नकाशा ठेवायला हवा, असे लेखक म्हणतो. हा नकाशा कसा आहे?

१. तुमच्या करिअरसाठी विशिष्ट दृष्टी-व्हिजन विकसित करा.

२. या भव्यदिव्य दृष्टीतून निर्माण होणाऱ्या ज्ञानाधिष्ठित व्यवसायांचा कल्पक विचार करा.

३. त्यातून स्वत:ला सुयोग्य ठरणारा व्यवसाय निवडा.

वर्गीस कुरियन, नारायण मूर्ती, अनू आगा, डॉ. माशेलकर यांच्या उदाहरणांद्वारे या नकाशातील जागा पुस्तकात भरून दाखवल्या आहेत.

इच्छा जिकडे वळेवल, तिकडेच मन वळायला हवे. अशी एकाग्रता असेल तर हवे ते साध्य करता येते. तज्ज्ञांची मदत आणि निरंतर सराव ही यशाची गुरुकिल्ली होय, असे डॉ. पॉल ब्रन्टन म्हणतात.

नूतनीकरण हे तत्त्व समोर हवे.

ते आपल्याला विकास व परिवर्तनाच्या, सतत सुधारणेच्या उर्ध्वगामी दिशेने पुढे नेते.

सतत शिकत रहा, बांधिलकीच्या भावनेने कार्य करीत रहा... हे चक्र सतत चालू हवे.' हे 'सेव्हन हॅबिटस ऑफ हायली इफेक्टिव्ह पीपल' या पुस्तकात दिलेले सूत्रही श्रीनिवास पंडित शेवटी उद्धृत करतात.

आपण स्वत:ला तुच्छ वा सामान्य समजून, सुमार आकांक्षा बाळगतो. सुमार नोकरीपेशा पत्करून, दुय्यम जिणे जगतो. आपण अनंत क्षमतांनी युक्त सृजनशील आणि कार्यक्षम आहोत, उच्चतर यश मिळवून आपण जीवनात कृतार्थता अनुभवू शकतो अशी प्रेरणा आणि भावना जागे करणारे हे पुस्तक आहे.


**आपण स्वतःला तुच्छ वा सामान्य समजून, सुमार आकांक्षा बाळगतो. सुमार नोकरीपेशा पत्करून, दुय्यम जिणे जगतो. आपण अनंत क्षमतांनी युक्त सृजनशील आणि कार्यक्षम आहोत, उच्चतर यश मिळवून आपण जीवनात कृतार्थता अनुभवू शकतो**

नोकरी न करता स्वत:च्याच कौशल्यावर स्वतंत्र उद्योगधंदा सुरू करून प्रगतीचे शिखर आपण गाठू शकतो– ते गाठण्यात आपला पुरुषार्थ आहे असा संदेश देणारे हे पुस्तक आहे.

तुमच्या कर्तृत्वाला आणि सर्जनशीलतेला साद घालणारे हे पुस्तक आहे.

**पृष्ठे: १३८ ● किंमत: १२० रु. ● सभासदांना: ८४ रु. ● पोस्टेज: २० रु.**

**एका स्फूर्तिदायी जीवनप्रवासाचे दर्शन**




# अंतराळवीर सुनीता विल्यम्स

**कॅप्टन एस. शेषाद्री**
**अराधिका शर्मा**

**अनु. चित्रा वाळिंबे**

प्रकाशक एखाद्या ताज्या घटनेवर किती झटपट पुस्तकं काढतात याचे उदाहरण म्हणजे सुनीता विल्यम्सचे चरित्र. अवघ्या तीन आठवड्यांत ते प्रसिद्ध झाले.

अंतराळात १९४ दिवस १८ तास १५ मिनिटे राहून विक्रम करणारी सुनीता विल्यम्स ही २२ जून २००७ रोजी पहाटे १ वाजून १९ मिनिटांनी कॅलिफोर्नियातील एडवर्डस एअर बेसवर सुखरूप उतरली; तेव्हा जगभरच्या लक्षावधी चाहत्यांना हायसे वाटले असणार! याआधी फेब्रुवारी २००३ मध्ये कल्पना चावला अंतराळात राहून पृथ्वीजवळ पोहोचली; पण कोलंबिया अवकाश यान पेटून तिचा इतर सहा अंतराळवीरांसह अंत झाला होता. त्यामुळे सुनीताच्या बाबतीत तसे काही घडू नये अशी सर्वांच्याच मनात धाकधूक होती. तिचे अटलांटिस अवकाश यान फ्लोरिडामध्ये उतरणार होते; तेथे त्यावेळी ८००० फुटांवर ढगांची दाटी असल्याने उतरविणे शक्य नव्हते; तेव्हा चोवीस तासांनी ते कॅलिफोर्नियात उतरविण्यात आले... आणि १३ जुलैला सुनीताचे चरित्र मराठीतही आले. प्रकाशकांच्या तत्परतेची ही एक अभिनंदनीय झलकच होय!

या विक्रमी अंतराळकन्येबद्दल भारतीयांना आत्मीयता वाटणे स्वाभाविकच आहे. कारण तिचा जन्म अमेरिकेत झाला असला आणि ती सध्या अमेरिकन नागरिक असली तरी तिचे वडील डॉ. दीपक पंड्या हे भारतीयच आहेत. गुजरातमधील अहमदाबादजवळचे मंगरोळ हे त्यांचे गाव. डॉ. दीपक पंड्या यांनी १९५८ मध्ये इंग्लंडला प्रयाण केले. तेथून ते अमेरिकेतील ओहायो येथील युक्लीड हॉस्पिटलमध्ये उमेदवारी करून अमेरिकेतच स्थायिक झाले. डॉ. दीपक पंड्या यांचे बोनी उर्सालिन त्यालोकार या स्लोव्हेनिअन मुलीवर प्रेम बसले. त्यांचा विवाह झाला आणि



लवकरच सुनीताचा जन्म झाला... बॉस्टनजवळच्या नीडहॅममध्ये तिचे बालपण गेले. अमेरिकेच्या नौदल अकादमीतून तिने बी.एस. ही पदवी घेतली. एनसाइन कमिशन मिळवून 'नेव्हल एव्हिएटर' म्हणून ती काम करू लागली (१९८९). त्याआधी नेव्हल ॲकॅडमीमध्येच तिच्या बरोबर असणारा वर्गमित्र मायकेल विल्यम्स याच्याशी तिचे लग्न झाले. हेलिकॉप्टर पायलट म्हणून तिने काम सुरू केले. एअरक्राफ्ट हँडलर, असिस्टंट एअर बॉस ही पदेही तिने भूषविली. परंतु अंतराळवीर बनण्याचे तिचे स्वप्न होते. १९९८ मध्ये २३०० फ्लाइट तासाच्या उड्डाणांचा अनुभव गाठीला बांधून ती अंतराळवीर म्हणून 'नासा'मध्ये पोहोचली... अवकाश प्रकल्पासाठी तिची निवड झाली... ९ डिसेंबर २००६ रोजी स्पेसशटलने तिने उड्डाण केले; ११ डिसेंबर २००६ रोजी अवकाश स्थानकात ती पोहोचली... सहा महिन्यांवर तेथे ती राहिली... सुखरूप परत आली.

**'पृथ्वी विशाल आहे. सुंदर आहे. तिला सीमा नाहीत. कुंपणं नाहीत. एखाद्या विशिष्ट भूप्रदेशासाठी लोक का भांडतात, लढाया करतात हेच अनाकलनीय वाटते.'**

सुनीता विल्यम्स हे पुस्तक तसे छोटे आहे. ऐंशी पृष्ठांचा मजकूर. ३२ पृष्ठे छायाचित्रे. पत्रकारितेच्या अंगाने त्याचे लेखन झाले आहे. त्यात सुनीताचे वडील दीपक पंड्या, सुनीताचा भाऊ जय (बोनी) पंड्या, पती, सासू, वृत्तपत्रातील बातम्या, इंटरनेट वगैरेंच्या मदतीने बरेच तपशील दिले गेले आहेत. कॅप्टन एस. शेषाद्री आणि अराधिका शर्मा यांनी मूळ इंग्रजी पुस्तक 'रूपा प्रकाशन'साठी तयार केले. चित्रा वाळिंबे यांनी मराठी अनुवाद केला आहे. सुनीता विल्यम्स ही आजच्या तरुणतरुणींना महत्त्वाकांक्षेचे क्षितिज विस्तारण्याचा संदेश देते.

'साहसी बना. उत्तम आरोग्य ठेवा. सातत्याने नवीन गोष्टी आत्मसात करा. पुढे जात राहा.'

अंतराळ स्थानकावर राहताना तिला काय जाणवले?

'पृथ्वी विशाल आहे. सुंदर आहे. तिला सीमा नाहीत. कुंपणं नाहीत. एखाद्या विशिष्ट भूप्रदेशासाठी लोक का भांडतात, लढाया करतात हेच अनाकलनीय वाटते.'

म्हणूनच हे पुस्तक प्रेरणादायक आणि प्रबोधनपर वाटेल.

**पृष्ठे:७८ ● किंमत:८० रु. ● सभासदांना: ५६ रु. ● पोस्टेज:२० रु.**

## २००७ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| | **कादंबरी** | |
| **उल्का** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **मंद्र : डॉ. एस्. एल्. भैरप्पा** | अनु. उमा वि. कुलकर्णी | ४००/- |
| **फाईव्ह पॉइंट समवन** : चेतन भगत | अनु. सुप्रिया वकील | २००/- |
| **साम्राज्य बुरख्यामागचे :** कारमेन बिन लादेन | अनु. अविनाश दर्प | १५०/- |
| **गोल्डफिंगर : इयान फ्लेमिंग** | अनु. माधव कर्वे | १८०/- |
| **सीजर :** रॉबिन कुक | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३००/- |
| **ब्लॅकबर्ड** | मनोहर धोत्रे | ८०/- |
| **टारफुला** | शंकर पाटील | २४०/- |
| **सोनेरी स्वप्नं भंगलेली** | वि. स. खांडेकर | १००/- |
| **द लास्ट फ्रन्टियर** : ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २८०/- |
| **द नेमसेक** : झुंपा लाहिरी | अनु. उल्का राऊत | २००/- |
| **द मॅन विथ द गोल्डन गन** : इयान फ्लेमिंग | अनु. डॉ. देवदत्त केतकर | ८०/- |
| **यू ओन्ली लिव्ह ट्वाइस**: इयान फ्लेमिंग | अनु. जयवंत चुनेकर | १६०/- |
| **थंडरबॉल :** इयान फ्लेमिंग | अनु. जयंत कर्णिक | १६०/- |
| **द स्पाय हू लव्ह्ड मी :** इयान फ्लेमिंग | अनु. अजित ठाकूर | ११०/- |
| **लिव्ह अँड लेट डाय :** इयान फ्लेमिंग | अनु. अनिल काळे | १६०/- |
| **टू सर विथ लव्ह** : ई. आर. ब्रेथवेट | अनु. लीना सोहोनी | १५०/- |
| | **अनुभवपर** | |
| **फॉर हिअर, ऑर टू गो?** | अपर्णा वेलणकर | २२५/- |
| | **कथासंग्रह** | |
| **पाटलांची चंची** | शंकर पाटील | १३०/- |
| **खुळ्याची चावडी** | शंकर पाटील | १२०/- |
| **धिंड** | शंकर पाटील | १००/- |
| **स्पॉटलाईट :** तारिक असलम 'तस्नीम' | अनु. उज्ज्वला केळकर | १२०/- |
| **थर्ड पर्सन** | यशोधरा काटकर | १६०/- |
| **संवेदना :** डॉ. कमल चोपडा | अनु. उज्ज्वला केळकर | १३०/- |
| **जुगलबंदी** | शंकर पाटील | ९०/- |



| | | |
|---|---|---|
| **बंधारा** | शंकर पाटील | १००/- |
| **इल्लम** | शंकर पाटील | ९०/- |
| | **प्रेरणादायक कथा** | |
| **चिकन सूप फॉर द सोल :** जॅक कॅनफिल्ड/मार्क व्हिक्टर हॅन्सन | अनु. उषा महाजन | १६०/- |
| **चिकन सूप फॉर द वुमन्स सोल :** जॅक कॅनफिल्ड/मार्क व्हिक्टर हॅन्सन जेनिफर रीड हॉथॉर्न/मार्सी शिमॉफ | अनु. श्यामला घारपुरे | १६०/- |
| | **चरित्रे** | |
| **वपु** | स्वाती चांदोरकर | १२०/- |
| **अंतराळवीर सुनीता विल्यम्स :** कॅप्टन एस. शेषाद्री/अराधिका शर्मा | अनु. चित्रा वाळिंबे | ८०/- |
| | **ललित** | |
| **मैत्र जिवाचे** | डॉ. भवान महाजन | १००/- |
| **स्वप्नातील चांदणे** | रत्नाकर मतकरी | ७०/- |
| | **विज्ञानविषयक** | |
| **तंत्रज्ञानाची मुळाक्षरे** | कविता भालेराव | २३०/- |
| | **मार्गदर्शनपर** | |
| **गाऊन्स** | हेमा कळके | १६०/- |
| | **व्यक्तिमत्वविकसन** | |
| **झटपट व्यक्तिमत्वविकास :** स्वपरिवर्तनाचे नवीन तंत्र | संजीव परळीकर | ५०/- |
| **डिझाईन युअर करिअर :** श्रीनिवास पंडित | अनु. सुप्रिया वकील | १२०/- |
| **सुंदर मन** | सुभाष जोशी | १२०/- |
| | **आत्मकथन** | |
| **ए कॉल टू ऑनर : जसवंत सिंग** | अनु. अशोक पाध्ये | ४००/- |
| **पहिली पावलं : वि. स. खांडेकर** | संपा. डॉ. सुनीलकुमार लवटे | ९०/- |
| **सेक्स वर्कर : नलिनी जमीला** | अनु. सुप्रिया वकील | १२०/- |
| | **संकीर्ण** | |
| **जागतिक अर्थव्यवस्था** | मधुसूदन दत्तात्रय साठे | २२०/- |

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| **चला जाणून घेऊ या! उपयुक्त कानमंत्र** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! सौंदर्याचे रहस्य** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! डोकेदुखी :** डॉ. सावित्री रामैया | अनु. ज्योतिका चितळे | ३०/- |

## वास्तुशास्त्र

| | | |
|---|---|---|
| **वास्तु-अजित** | अजित राजाराम जाधव | ३००/- |

## कवितासंग्रह

| | | |
|---|---|---|
| **ब्लॅक अँण्ड व्हाईट** | संजय चुरमुरे | ९०/- |

## नाटक

| | | |
|---|---|---|
| **जादू तेरी नजर** | रत्नाकर मतकरी | ६०/- |

## बिझनेस ॲन्ड मॅनेजमेंट

| | | |
|---|---|---|
| **बिझनेस इकॉनॉमिक्स - १** | डॉ. ए. बी. कलकुंद्रीकर | १४०/- |
| **प्रिन्सिपल्स ऑफ मॅनेजमेंट** | डॉ. प्रकाश हेरेकर | १६०/- |

## बाल वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| **घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **खेळ खेळा चित्र रंगवा** | रमेश मुधोळकर | ३०/- |
| **रंगांची रंगीत गोष्ट वाचा, रंगवा, प्रयोग करून पहा.** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ३०/- |
| **ठकुबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ३०/- |
| **रमज्या गमज्या आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ३०/- |
| **पंचरंगी खार आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **इमानी मित्र आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **ड्रॅगनचं घर आणि मजेदार गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३०/- |



| | | |
|---|---|---|
| **घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी** | उमा खरे | ३०/- |
| **गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी** | उमा खरे | ३०/- |
| **जादूचं तळं आणि इतर गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **जादूचं बटणं आणि इतर गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या** | चारुता पुराणिक | ३०/- |
| **जादूचं रबर आणि इतर गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या** | चारुता पुराणिक | ३०/- |
| **हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या** | चारुता पुराणिक | ३०/- |

## मेहता पब्लिशिंग हाऊसची दर्जेदार ग्रंथसंपदा 'ऐका' आता थेट नभोवाणीवर...

**वाचकमित्रहो...**

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यावधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www.mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. 'मेहता मराठी ग्रंथजगत' सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आता पुणे नभोवाणीच्या सहकार्याने सकाळच्या प्रहरी, दर गुरुवारी, ठीक सात वाजून पन्नास मिनीटांनी (बातम्यांनंतर) आपण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची ओळख 'ऐकू' शकाल. 'इथे पुस्तके भेटतात' मध्ये.

या कार्यक्रमामध्ये वाचक-श्रोत्यांना एक प्रश्न विचारला जाईल. प्रश्नाचे उत्तर 'पोस्टकार्ड'द्वारे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'पुणे' येथील पत्त्यावर पाठवावे. सहभागी स्पर्धकांमधून भाग्यवान विजेत्याची निवड केली जाईल व त्याला मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे दर्जेदार पुस्तक भेट मिळेल.

**चला तर मग... भेटूया दर गुरुवारी सकाळी ठीक ७:५० वाजता 'पुणे नभोवाणीवर'.**

## सार्धंसुधं...

# व्वा! क्या बात है!

**प्रमोदिनी वडके-कवळे**

एखादा दिवसच अगदी त्रासदायक उगवतो. काहीही कारण नसताना आपल्याशी निगडित असलेले जगातले सगळे घटक तोंड फिरवून शत्रूपक्षाला सामील होतात आणि आपल्याशी युद्ध पुकारतात. कारणं काही फार मोठी किंवा महत्त्वाची नसतात पण त्यांनी आपल्या दिवसभराच्या मूडवरच घाला बसतो.

साधी दूधाच्या पातेल्यासारखी क्षुल्लक गोष्ट! आदल्या दिवशी रात्री आवरायला उशीर झाल्यामुळे मी पातेलं काढून ठेवायची विसरले. पहाटे दूधवाला आला तेव्हा दिवे गेलेले होते. झोपेतच अंदाजाने घेतलेलं पातेलं लहान पडलं आणि 'बहुधा दूधवालाही झोपेत असल्यामुळे' त्यानेही न बघताच त्यात दूध ओतलं. झालं! पहाटेपहाटे माझ्या दारात दूधाची गंगा अवतरली. चरफडत मी दारातली फरशी नीट पुसून घेईपर्यंत सकाळच्या काठोकाठ बसवलेल्या वेळापत्रकातली तब्बल सात मिनिटं खर्ची पडली. त्या वैतागाच्या भरात पोळीची कणिक नेहमीपेक्षा जरा जास्तच सैल भिजवली गेली. म्हणजे पोळया लाटताना तारेवरची– चुकलं– पोळपाटावरची कसरत करणं आलं. भाजीसाठी कांदा चिरताना बोट कापलं गेलं. पण असल्या किरकोळ जखमांकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. कंपनीची बस गाठण्यासाठी पावनखिंड लढवायला हवीच होती. झोंबऱ्या जखमेने तसाच स्वयंपाक उरकला.

सगळं आवरायला नेहमीपेक्षा उशीर झाला तरी एक दिलासा होता. आज अमितला सकाळचं लेक्चर होतं. त्यामुळे त्याने मला त्याच्या बाईकवरून बस स्टॉपपर्यंत सोडलं असतं. म्हणजे निदान माझी पायी जाण्याची आठ मिनिटं तरी हाताशी होती.

पण नाही. आज दिवस माझा नव्हताच. मी आंघोळीला गेले तरी दिवे आलेले नव्हते. अर्थातच गीझरचं मस्तक थंड होतं आणि माझ्या तापलेल्या डोक्यात पाणी गरम करण्याएवढी ताकद नव्हती. गार पाण्याने आंघोळ उरकून बाहेर आले तर चिरंजीव 'ड्राय डे' साजरा करून कॉलेजला निघून गेलेले.

चरफडत मी बाहेर पडले.

परिणाम अपेक्षितच होता. कंपनीची बस मला खिजवून माझ्या डोळ्यादेखत पसार झाली.



एरवी मी बस चुकली म्हणून दांडी मारून घरी आले असते. कारण रिक्षाने कंपनीत जायचं म्हणजे दीडशे रुपयांचा चुराडा! पण आज तसं करण्यातही अर्थ नव्हता. दुपारी पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वाची मिटींग होती आणि त्यासाठी लागणारी सर्व माहिती पुरवण्याची जबाबदारी माझी होती. बरीचशी माहिती तयार असली तरी काही थोडेफार दुवे अजून मिळवायचे होते.

मुकाट्याने पर्स चाचपली. पुढल्या महिन्यातल्या साड्यांच्या सेलसाठी चोरकप्प्यात ठेवलेले पैसे बाहेर काढले आणि रिक्षाला हात केला.

पण आज नुसतं घरच नाही तर कंपनीचे वासेही माझ्यासाठी फिरलेलेच होते ज्याच्यासाठी मी एवढी धडपड करून आणि साड्यांच्या सेलचं अंदाजपत्रक मोडून ऑफिसला गेले ती मिटींग काही अपरिहार्य कारणामुळे दुपारी अचानक रद्द झाली आणि दुसरा एक सहकारी अचानक गैरहजर राहिल्यामुळे त्याचं तुंबलेलं अर्जंट काम माझ्या गळ्यात पडलं.

आख्ख्या दिवसाची अशी वाट लागल्यानंतर संध्याकाळकडून मी काही वेगळी अपेक्षा ठेवलीच नाही. आज नक्कीच घरी कोणीतरी माझी फजिती करणारे. आयत्या वेळचे पाहुणे उगवलेले असणार किंवा मोलकरणीने दांडी मारलेली असणार नाहीतर अद्याप वीज आलेली नसल्यामुळे नळाला पाणीही नसणार... असं जास्तीत जास्त वास्तव चित्र डोळ्यासमोर आणत मी घरी आले. येतायेता काहीही झालेलं असलं तरी आता कशाचा त्रास करून घ्यायचा नाही, कुणाची पर्वा करायची नाही, रात्री फक्त मुगाची खिचडी करायची असा दृढनिश्चय 'मनातल्या मनातच' करून टाकला.

सोसायटीच्या दारात रिक्षांची भलीमोठी रांग लागलेली. सगळ्या रिक्षा चकचकीत पुसून त्यांना फुलांचे भरघोस हार घातलेले. एका बाजूला सत्यनारायणाची 'महापूजा' मांडली होती आणि तिथेच स्पीकर्सची काळी भिंत कर्कश्श आवाजात हिंदी गाणी ओकत होती.

म्हणजे आज रात्री उशिरापर्यंत हा संगीत धुमाकूळ सहन करावा लागणार! माझ्या कपाळावरच्या आठ्या आणखी दाट झाल्या.

जिन्यातच सोसायटीतल्या मनात येईल त्या वेळी जिने झाडणाऱ्या साजीबाई हातातला झाडू फडकावत सामोऱ्या आल्या. 'लई दमलेल्या दिसताय जनू.'

'हं' मी बोलायच्या मूडमधे नव्हते. पण मनात कुठेतरी बरं वाटलं. आपली दिवसभराची दगदग चेहऱ्यावर दिसतेय म्हणायची.

'बाई..' साजीबाई जिना झाडणं थांबवून माझ्यापाठोपाठ दोन पायऱ्या चढून आली.

'आता काय?' मी चेहरा त्रासिक केला. नक्कीच हिला पैसेबियसे हवे असणार.

'बाई मागल्या म्हयन्यात तुमी दिलेलं पिवळं लुगडं नेसलंय आज. लई मऊसूत हाय.'

'हो का?' आत्ता मी तिच्याकडे नीट पाहिलं. जरीचे काठ काळे पडलेली माझी जुनी साडी तिच्या अंगावर होती आणि डोळ्यांतून माझ्या 'दातृत्त्वा'चं अपार कौतुक ओसंडत होतं.

माझ्या चेहऱ्यावर स्मिताची अस्फुट रेघ उमटली.

जिना चढून वर आले. दाराला कुलूपच होतं. दार उघडलं तरी माझ्या कल्पनेतलं काहीएक घडलेलं मला दिसलं नाही. फक्त फोन मात्र जोरजोरात वाजत होता. कर्कश्श गाण्यांच्या आवाजात दार उघडेपर्यंत मला तो ऐकू आला नव्हता. बहुतेक ह्यांचा किंवा मुलांपैकी एकाचा असणार. . घरी यायला उशीर होत असल्याबद्दल. . अशा खात्रीनेच मी फोन उचलला. 'हॅलोऽ'

'हॅलो प्रमोदिनी कवळे का?' आवाज थोडा कापरा प्रौढ. . . पण नेहमीचा माझ्या ओळखीतला नव्हता.

'बोलतेय.' मी जरा शिष्ट स्वरात म्हटलं.

'नमस्कार. मी रमा देसाई. तळेगावहून बोलतेय.' अजूनही मला ओळख लागेना.

'आपली तशी प्रत्यक्ष ओळख नाही. पण आजच मी तुमचा 'मेहता ग्रंथ जगत'मधला जत्रा हा लेख वाचला आणि लग्गेच तुम्हाला फोन करावासा वाटला. अगदी माझ्या गावची जत्रा डोळ्यांसमोर उभी राहिली होऽ. आज माझं वय बहात्तर आहे. पण मला अगदी माझ्या बालपणात घेऊन गेलात तुम्ही'. पुढची काही मिनिटे बाई भरभरून बोलत होत्या आणि मी आवडतं चॉकलेट तोंडात घोळवावं तशा चवीने त्यांचं बोलणं ऐकत होते.

जेमतेम पाचसहा मिनिटांचा संवाद. पण त्याने गढूळ पाण्यात तुरटी फिरवावी तशी जादू केली. माझा सकाळपासूनचा वैतागमूड त्या कुणा आजवर अनोळखी असणाऱ्या रमा देसाईंच्या एकेका शब्दानिशी हळूहळू निवळत गेला. मनात प्रसन्नेच्या छोट्याछोट्या लडी अलगदपणे उलगडत गेल्या. फोन खाली ठेवताना तर माझ्याही नकळत मी एक तान घेतली आणि चक्क लाउडस्पीकरवरून थेट माझ्या कानांवर येऊन आदळणाऱ्या हिन्दी गाण्याला साथही दिली.

त्या दिवशी रात्री मी माझ्या बेतानुसार मुगाची खिचडीच केली. पण जोडीला ह्यांच्या आवडीची कढी कोशिंबीरही होती. शिवाय मुलांना लागतात म्हणून पापड-कुरडयाही तळल्या.

रात्री निवांतपणे बसून दिवसभरातल्या घटनांचा विचार करताना दिवसभराचा चिडचिडा मूड आणि संध्याकाळी मनात वाजलेली प्रसन्न धून यातला फरक स्पष्ट जाणवला. संध्याकाळच्या काही क्षणांपाशी आपोआपच थोडं थबकायला झालं.



संध्याकाळी अशी काय जादू झाली? मी तीच होते. परिस्थितीही फारशी बदललेली नव्हती.. . तरीही?

विचार करत गेले तसं मला उमगत गेलं. दिवसभर मला जे मिळालं नव्हतं ते संध्याकाळी कणाकणाने मिळत गेलं होतं. . दाद! एका वाक्यातली आणि भरभरून दिलेलीही.

ही दाद म्हणजे आपल्या जीवनातलं सर्वात पोषक सर्वात शक्तीदायी टॉनिक असतं. अगदी नवशिक्या किंवा थोर कलावंतांनाही मोठमोठ्या पारितोषिकांपेक्षा समोरून येणारी जिवंत दाद जास्त महत्त्वाची वाटते. 'वा'. . एकाक्षरी शब्द. पण तो उत्स्फूर्तपणे उच्चारला गेला तर त्यापुढे पानं भरभरून लिहिलेलं शास्त्रशुद्ध रसग्रहणसुद्धा फिकं वाटतं.

प्रत्येक क्षणाचं. आयुष्याच्या वाटेवर भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचं आपल्यावर काही ना काही ऋण असतं. त्या ऋणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची सोपी पायवाट म्हणजे अशी उत्स्फूर्त दाद. आज केवळ 'थँक यू' अशी कोरडी पावती देऊन आपण मोकळे होत असलो तरी आपल्या पूर्वजांनी मात्र याचं महत्त्व पुरेपूर ओळखलेलं होतं. म्हणूनच आपल्याला आनंद देणाऱ्या, आपल्या उपयोगी पडणाऱ्या प्रत्येक घटनेसाठी सणासमारंभाची आखणी करून त्यांनी त्याला धार्मिकतेचा साज चढवला होता. कारण धर्माचं बंधन घातलं की त्या गोष्टीचं खात्रीने पालन केलं जाईल हे त्यांना ठाऊक होतं.

वटपौर्णिमा, गुरुपौर्णिमा, दिव्याची अमावस्या, नागपंचमी, नारळीपौर्णिमा, बैलपोळा, कोजागिरीपौर्णिमा, तुळशीचं लग्न अगदी पितृपक्षसुद्धा याचीच साक्ष देतात. नव्या युगातही आपण वेगवेगळे 'डेज्' साजरे करतोच की. मात्र बरेचदा त्यातला उत्सवी भाग आपण धूमधडाक्यात मनवतो आणि दाद द्यायचं मात्र विसरूनच जातो.

दाद म्हणजे केवळ स्तुती नसते. त्यात तुमच्या कृत्याची दखल असते. कौतुक असतं आणि कृतज्ञताही असते.

साजीबाईचं 'दमलात जनू' हे साधं वाक्यही सुखावणारं होतं. ते त्यात माझ्या दमलेपणाची दखल घेतली गेली होती म्हणूनच ना!

विचारांच्या नादात अकरा कधी वाजून गेले ते समजलंच नाही. डोळ्यांवर झोप अनावरपणे चढायला लागली तरी मी आधी स्वयंपाकघरात गेले आणि उद्या सकाळसाठी दुधाचं नेमकं पातेलं काढून ठेवलं.

तेवढ्यात अमृता आत आली. 'आई, तुला एक जोक सांगू?'

बाहेर बाबांनी आणि अमितने तिची टर उडवली असणार हे तिच्या रडवेल्या चेहऱ्यावरून, स्वरावरून माझ्या लक्षात आलं. 'सांग ना.' खूप झोप येत असूनही मी म्हटलं.

आज शाळेत नव्यानेच ऐकलेला जोक तिने मला अगदी रंगवून रंगवून सांगितला. खरं म्हणजे तो विनोद मी आधी बरेचदा ऐकलेला होता. तरीही मी चेहऱ्यावर जसा काही पहिल्यांदाच ऐकतेय असा भाव आणून मी तो ऐकून घेतला. आणि तिचं सांगून झाल्यावर म्हटलं. 'वा! क्या बात है!'

अमृता जाम खूष होऊन झोपायला पळाली.

आजचा माझा बिघडलेला दिवस दादीमुळे सुधारला होता आणि आता अमृताचा दिवसही त्यामुळेच सार्थकी लागणार होता.

दाद ही अशीच असते. चलनी नाण्यासारखी!

आपल्याकडून पुढे गेली तरच तिचं मूल्य कायम राखलं जातं.

— — — — — — — — — — —

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

*प्रेमातला अत्युत्कट आनंद, विरहाच्या असह्य वेदना, यांच्याही पलीकडे जाऊन, प्रेमातला त्याग, प्रेमासाठी मोजावी लागणारी किंमत, प्रेमामुळे झालेले अंतर्बाह्य बदल अशा सर्वच प्रेमरंगांची ही गाथा.....*

*आज, काल किंवा उद्या, प्रेमात पडणाऱ्या प्रत्येकानं वाचल्याच पाहिजेत अशा, ठराविक साचा मोडित काढणाऱ्या एकमेवाद्वितीय प्रेमकथा.....*

**स्वप्नातील चांदणे**

— — — — — — — — — —

रत्नाकर मतकरी


— — — — — — — — — —

**७०रु. | पोस्टेज २०रु.**





# नवे कोरे




## सुंदर मन

— — — — — —

सुभाष जोशी

— — — — — —

**किंमत : १२० रु.**
पोस्टेज : २५ रु.

आपण स्वत:ला आकर्षक करण्यासाठी कपड्यावर, सौंदर्यप्रसाधनांवर, आहारावर, व्यायामावर अमाप पैसा खर्च करतो. पण सर्वांचं लक्ष वेधून घेणाऱ्या गोष्टीकडे आपण दुर्लक्ष करतो. ते घडवायला फारसा वेळही लागत नाही. ते म्हणजे **सुंदर मन.**

मन घडवायला ढीगभर ज्ञानाची गरज नाही किंवा उत्तम व्यक्तिमत्वाचीही गरज नाही. फक्त तुमच्यापाशी सर्जनशीलता, कल्पकता व स्पष्टपणा असला म्हणजे झालं. लोकांची विचारप्रक्रिया बदलू शकणारे जगप्रसिध्द **Edward de Bono** यांनी आपल्या संभाषण कौशल्यांनी लोकांना कसं प्रभावित करायचं ते सरळ सोप्या भाषेत या पुस्तकात मांडलं आहे.

— — — — — — — —

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




एक अनोळखी इसम बहामा बेटावर येतो.....
'कॅसिनोत पैसे उधळायला आलेलं गिऱ्हाईक' याच
नजरेनं सर्व रहिवासी त्याच्याकडे पाहतात...
...पण बॉंडच्या मनात पैसे उधळण्यापेक्षाही
वेगळे विचार असतात.
एमिलिओ लार्गो या गूढ व्यक्तीनं पळवून आणलेले
आणि तिथल्याच प्रवाळ बेटांमध्ये दडवलेले दोन
अणुबॉंब शोधण्यासाठी बॉंडकडे आठवड्यापेक्षाही कमी
वेळ उरला होता....
शह-काटशह, कपट-कारस्थानं, रहस्यानं भारलेलं
आणखी एक दमदार बॉंड-नाट्य.... **'थंडरबॉल'**

# थंडरबॉल

**अनु. जयंत कर्णिक**

**१६०रु. पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## पुरस्कार

*** डॉ. अरुणा ढेरे यांना मृण्मयी पुरस्कार**

मृण्मयी पुरस्कार माझ्यासाठी 'वारी'च्या वाटेवरील प्रसाद आहे, असे डॉ. अरुणा ढेरे यांनी हा पुरस्कार स्वीकारताना म्हटले. पुरस्काराचे हे सतरावे वर्ष आहे. 'गोनीदां'च्या पत्नी नीरा दांडेकर यांच्या स्मृतीनिमित्त दिला जाणारा 'नीरा-गोपाल पुरस्कार' ग्रामविकासाचे कार्य करणाऱ्या डॉ. प्रसाद देवधर यांना ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांच्या हस्ते देण्यात आला. प्रत्येकी दहा हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ लेखक आणि साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक उपस्थित होते.

डॉ. ढेरे म्हणाल्या, 'वडिलोपार्जित शेतजमिनीचा सकस तुकडा मिळावा तसे मला घरातूनच इतिहास-संस्कृतीचे शिक्षण मिळाले. 'गोनीदां'मुळे 'भटकंती'कडे पाहण्याची नजर बदलली. झपाटलेपण हे त्यांचे वेगळेपण होते. माझे सर्व लेखन मध्य धारेतील आहे आणि माझी वाङ्मयीन दृष्टी समन्वयावर आधारलेली आहे. जिला आपण चुकीने तळागाळातील संस्कृती म्हणतो, तीच खरी अभिजात संस्कृतीची आई आहे.'

डॉ. देवधर यांनी मनोगतात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील झाराप गावाच्या परिसरात स्वयंपूर्ण ग्रामविकासाच्या करीत असलेल्या कामाची माहिती दिली.

अध्यक्षीय समारोपात प्रा. जाधव म्हणाले,'समाज आणि साहित्याने आपापल्या कोषातून बाहेर पडले पाहिजे. सामान्य माणसाची सुख-दुःखे दाखवणे, उणिवा दूर करणे हेच साहित्याचे काम आहे. डॉ. ढेरे यांनी सांस्कृतिक सत्यधारेचा वारसा लेखनातून मांडण्याचा वसा घेतला आहे. 'स्त्री' हा त्यांच्या लेखनाचा आस्थाविषय असला, तरी त्या आधुनिक अर्थाने स्त्रीवादी नाहीत. त्यांच्या स्त्रीवादात स्त्री-पुरुष नात्याचे प्रगल्भ भान आहे. स्त्रीवादाची वेगळी चूल त्यांनी मांडलेली नाही. लालित्याचा परिसस्पर्श असणाऱ्या त्यांच्या लेखणीतून भविष्यात कादंबरीसारख्या विशाल आकृतिबंधातील लेखनाचीही अपेक्षा आहे.' डॉ. वीणा देव यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले. डॉ. विजय देव आणि मृणाल कुलकर्णी यांनी परिचय करून दिला.

## * युगांडातील लेखिकेला आफ्रिकन बुकर पुरस्कार

युगांडामधील आराक दि नायेकोच्या 'जाम्बुल ट्री' या कथासंग्रहाला आठवा आफ्रिकन बुकर पुरस्कार देण्यात आला आहे. दहा हजार पौंडांचा हा पुरस्कार आहे. ब्रिटनमधील बुकर पुरस्कार समितीचे २५ वर्षे अध्यक्षपद भूषविणाऱ्या सर मायकेल केन यांना आफ्रिकेतील साहित्याबद्दलही खूप आस्था होती; त्यामुळे त्यांच्या प्रेरणेने आफ्रिकेतील लेखकांसाठी हा पुरस्कार सुरू करण्यात आला. २००७ च्या पुरस्कार समितीचे अध्यक्ष म्हणून सुदानी लेखक मजहूब यांनी जाम्बुल ट्री ही कथा दोन पौगंडावस्थेतील मुलांमधील प्रेमाची हृदयस्पर्शी पण खेळकर शैलीत सांगितलेली आहे असे म्हटले आहे. 'लोक अनेकदा भयंकर आपत्तींमधून जाऊनही हताश न होता आंतरिक बळाने जगत राहतात; वैफल्यग्रस्त न होता संघर्ष करीत माझी पात्रे मान ताठ ठेवून जगू पाहतात' असे ही लेखिका म्हणते. निर्वासित छावणीत राहणाऱ्या लोकांची जिद्द आणि जीवनासक्ती प्रकट करणाऱ्या तिच्या कथा युगांडामधील वाचकांना नवे बळ देणाऱ्या वाटतात.

## * चिनुआ अचाबा यांना मान बुकर पारितोषिक

साहित्यातील प्रतिष्ठेचे समजले जाणारे मान बुकर पारितोषिक २००७ या वर्षासाठी नायजेरियाचे लेखक चिनुआ अचाबा (वय ७७) यांना जाहीर झाले आहे. साठ हजार पौंडांचे हे पारितोषिक आहे. यंदाच्या नामांकनात भारतीय वंशाचे प्रसिद्ध लेखक सलमान रश्दी यांचाही समावेश होता. मात्र, अचाबा यांनी बाजी मारली. अचाबा यांना आधुनिक आफ्रिकी साहित्याचे जनक मानले जाते.

दोन वर्षांतून एकदा दिले जाणारे हे पारितोषिक जागतिक कीर्तीच्या हयात लेखकाला दिले जाते. १९५८ मध्ये लिहिलेल्या 'थिंग्ज फॉल अपार्ट' आणि त्यानंतर तीस वर्षांनी आलेल्या 'अँथिल्स ऑफ सवाना' या कादंबऱ्यांमुळे अचाबा प्रसिद्धीच्या झोतात आले. कारकीर्दीच्या सुरुवातीला त्यांनी नायजेरियात राजनीतिज्ञ म्हणून काम केले आहे.

## * बडगे यांना पठ्ठे बापूराव पुरस्कार, मधुवंती दांडेकर यांना बालगंधर्व पुरस्कार

पुणे महापालिकेतर्फे दिला जाणारा यंदाचा 'बालगंधर्व पुरस्कार', गायन आणि अभिनयाने रसिकांची मने जिंकलेल्या मधुवंती दांडेकर यांना तसेच 'लोकशाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार' ज्येष्ठ लोककलावंत केशवराव बडगे यांना देण्यात आला.

स्मृतिचिन्ह, पंचवीस हजार रुपये, असे बालगंधर्व पुरस्काराचे स्वरूप आहे.

मधुवंती दांडेकर यांना गायनाचा वारसा त्यांच्या मातोश्री रमाबाई सहस्रबुद्धे यांच्याकडून मिळाला. तेराव्या वर्षी त्यांनी 'संगीत विशारद' ही पदवी मिळविली. 'स्वयंवर', 'संशयकल्लोळ', 'सौभद्र', 'भावबंधन', 'एकच प्याला', 'रणदुंदुभी,



'मृच्छकटिक', 'सुवर्णतुला' आदी संगीत नाटकातील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. आकाशवाणी, दूरदर्शनसह देश-विदेशात त्यांनी अनेक कार्यक्रम सादर केले आहेत.

याच कार्यक्रमात मराठी रंगभूमीवरील स्वरदा गोखले (गायन), प्रमोद कुलकर्णी (अभिनय), लक्ष्मण भोसले (बॅकस्टेज आर्टिस्ट) आणि रश्मी मोघे यांचाही एक हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह देऊन खास सत्कार केला गेला.

लोकशाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कारासाठी केशवराव बडगे यांची निवड केली गेली.

तबलावादन आणि लोककला या क्षेत्रात बडगे यांनी लक्षणीय कामगिरी केली असून पं. भीमसेन जोशी, तसेच सुधीर फडके यांनाही बडगे यांनी अनेक वर्षे तबल्याची साथ केली. त्यांचा 'गोंधळ' हा कार्यक्रम महाराष्ट्रात गाजला असून त्याचे हजारो प्रयोग झाले आहेत. याच कार्यक्रमात दत्तोबा पाचंगे (चौघडा वादन), भिका देवचंद देवराज (पायपेटी वादक), विष्णू गुलाब कुदळे (तबला वादन), आणि कमला पटवर्धन (गायिका) यांचाही सत्कार केला गेला.

## * वि. भा. देशपांडे यांना भावे नाट्यसमीक्षा पुरस्कार

ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांना 'पु. भा. भावे नाट्यसमीक्षा पुरस्कार' जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण ऑगस्टमध्ये डोंबिवलीत होईल. डॉ. देशपांडे गेली ४० वर्षे नाट्यविषयक लेखन करीत आहेत. त्यांची स्वतंत्र आणि संपादित अशी ३६ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'नाट्यकोशा'चे संपादनही त्यांनी केले आहे.

## * भास्कर चंदावरकर यांना पुरस्कार

ज्येष्ठ संगीतकार आणि सतारवादक पं. भास्कर चंदावरकर यांनी संगीतबद्ध केलेल्या गजेंद्र अहिरे दिग्दर्शित 'बयो' चित्रपटाला स्पेन येथील प्रतिष्ठेच्या 'माद्रिद इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल'मध्ये सर्वोत्कृष्ट संगीता'चा पुरस्कार मिळाला आहे.

'कथेशी एकरूप झालेल्या 'बयो' चित्रपटाच्या संगीताला आंतरराष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळाल्याचा आनंद वाटतो,' अशा शब्दांत पं. चंदावरकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. 'चित्रपटाचे संगीत ही वेगळ्या प्रकारची शिस्त असते. त्यामुळे त्याचे मूल्यमापन त्याच पद्धतीने व्हावे असे मला वाटते. 'बयो'च्या निमित्ताने मराठी संगीत दिग्दर्शकाला प्रथमच आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याचा आनंद मोठा आहे. 'बयो'चे संगीत पूर्णत: भारतीय रागदारी संगीतावर आधारले आहे. या चित्रपटाची कथा स्वातंत्र्यपूर्ण काळात घडते. 'बयो'च्या कथानकाला हे संगीत पुढे नेते, कथेशी एकरूप होते आणि चित्रपटाच्या एकूण आकलनात या संगीताची काही भूमिका आहे, हे तिकडच्या प्रेक्षकांनी-परीक्षकांनी जाणले, यामुळे या पुरस्काराचा आनंद वाटतो, असे ते म्हणाले.

या महोत्सवात या वर्षी सात भारतीय चित्रपटांचा समावेश होता. त्यातील

‘मातीमाय’ आणि ‘बयो’ हे दोन्ही मराठी चित्रपट पुरस्कारप्राप्त ठरले आहेत. योगायोग म्हणजे या दोन्ही चित्रपटांना पं. चंदावरकर यांचेच संगीत आहे.

*** फडकुले प्रतिष्ठानचे पुरस्कार**

दिवंगत साहित्यिक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या स्मरणार्थ डॉ. फडकुले प्रतिष्ठानच्या वतीने साहित्य क्षेत्रातील कामगिरीबद्दल ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रा. ग. जाधव यांना साहित्य सेवा पुरस्कार आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पन्नालाल सुराणा यांना सामाजिक कार्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रत्येकी रोख २१ हजार, शाल, श्रीफल आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. हुतात्मा स्मृती मंदिरात केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. यावेळी डॉ. फडकुले यांच्या स्मरणार्थ काढण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात आले.

❒

## वाचकांचा प्रतिसाद

**मा. संपादक**

**सप्रेम. नमस्कार,**

मा. प्रमोदिनी वडके-कवळे ‘ग्रंथजगत’च्या मान्यवर लेखिका. त्यांचं लालित्यपूर्ण पण सुलभ लेखन नेहमी वाचतो. जून अंकातील त्यांचं ‘स्वरगंगेच्या काठावरती...’ विशेष भावलं. पुन:प्रत्ययाचा आनंद देऊन गेलं. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. पन्नास-पंचावन्न वर्षांपूर्वी आवडीची गाणी ऐकण्यासाठी असाच मी कान देऊन रेडिओला चिकटून असायचो. रेडिओची खरखर- मधूनच आवाज बंद होणं- घरची हाक- हे सर्व असूनही असोशीने रेडिओ ऐकत रहायचो. ती गाणी जन्माची सोबती झाली. रस्त्यावरून जाताना ते ओळखीचे स्वर आले की थबकायचो. क्वचित एका घरून पहिले कडवे ऐकले की चालता-चालता दुसऱ्या घरी दुसरे करता करता गाणे पूर्ण व्हायचे. ही ओढ आज ऐंशीव्या वर्षीही टिकून आहे. प्रमोदिनी वडकेंनी जणू माझ्या मनीचेच भाव प्रकट केले आहेत. आमच्या पिढीतल्या अनेकांची हीच भावना असेल. मन:पूर्वक धन्यवाद.

ग. ना. बापट



## श्रद्धांजली

*** ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कर्दळे**

‘इंडियन एक्सप्रेस’च्या पुणे आवृत्तीचे माजी निवासी संपादक आणि ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कर्दळे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ६६ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी लेखिका आशा कर्दळे आणि चिरंजीव अमोल असा परिवार आहे. नागरी प्रश्नांवर सातत्याने केलेले लिखाण, ‘एक्सप्रेस सिटिझन फोरम’च्या माध्यमातून उभारलेली चळवळ आणि माहितीच्या अधिकाराच्या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केलेले कळकळीचे प्रयत्न आदी त्यांचे पत्रकारितेतील महत्त्वाचे योगदान ठरले आहे.

निवासी संपादक म्हणून काम करताना नागरी प्रश्नांवर सातत्याने त्यांनी प्रकाशझोत टाकला. एखादा नागरी प्रश्न हाती घेतला की त्याची हाताळणी अनेक अंगांनी करण्याची त्यांची पद्धत होती. नागरी प्रश्नांचा मूलभूत अभ्यास करून ते लेखन करीत असत. विकास आराखड्याची अंमलबजावणी व्हावी, यासाठी त्यांनी आपली लेखणी झिजवली. आराखड्यातील आरक्षणे उठविण्याच्या कृतीला ते कडाडून विरोध करीत आणि वृत्तमालिकांद्वारे अशी कृत्ये ते बाहेर आणीत.

‘एक्सप्रेस सिटिझन फोरम’च्या माध्यमातून त्यांनी नागरिकांनाही चळवळीत आणले. या मंचाद्वारे त्यांनी विविध प्रश्नांना वाचा फोडली. या फोरमने शहराच्या विविध भागांमध्ये नागरी प्रश्नांसाठी झगडणारे असंख्य कार्यकर्ते तयार केले. त्याचे श्रेय कर्दळे यांच्याकडे जाते.

स्वातंत्र्योत्तर काळात देशासाठी धारातीर्थी पडलेल्या जवानांना मानवंदना वाहणारे देशातील पहिले नागरी युद्धस्मारक पुण्यात उभे करण्यात कर्दळे यांचा मोलाचा वाटा होता.

एक्सप्रेसच्या निवासी संपादकपदावरून कर्दळे इ.स. २००० मध्ये निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी ‘एक्सप्रेस इनिशिएटिव्ह’चे वरिष्ठ संपादक म्हणून काम केले. ते सोडल्यावर एका इंग्रजी साप्ताहिकाचे ते संपादन करणार होते; पण ते तसेच राहिले. मेहता पब्लिशिंग हाऊस परिवारातर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली.

❒

# बालनगरी

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| आणि गंगा झाली जीवनदात्री | १०३ |
| कर्मयोगी गाडगेबाबा | १०८ |






# ...आणि गंगा झाली जीवनदात्री!

गंगा ही एक अवखळ, लहान मुलगी होती- बर्फाच्छादित हिमालयाच्या कुशीत जन्मलेली, वाढलेली. तिचे वडील हिमावत आणि आई मैना यांनी तिला अतिशय लाडात, कोड-कौतुकात वाढवले होते. तिचे सर्व हट्ट पुरवले होते.

गंगाच्या आवडीची एक बर्फाची गुहा होती. त्याला चमकदार भिंती, खांब आणि बर्फाचे छप्पर होते. सूर्यकिरण त्याच्यावर पडत तेव्हा इंद्रधनुष्याच्या रंगांची तिथे सुरेख उधळण होत असे. गंगा आपला सगळा वेळ ह्या आवडत्या ठिकाणीच घालवत असे.



एक दिवस हिमावत- गंगाचे वडील- अत्यंत दुःखीकष्टी होऊन यात्रेहून परतले. ते भारतभूमीत गेले होते.

'तुम्ही इतके दुःखी का आहात?' मैनाने विचारले.

'संपूर्ण उत्तर भारतभूमीवर भीषण दुष्काळ पडला आहे. सगळी पिकं नष्ट होत आहेत. गाई-बैलं वगैरे पाळीव प्राणी आणि जंगलातलेही पशुपक्षी मृत्यूमुखी पडत आहेत. तहानेनं माणसं मरत आहेत.' हिमावतने उदासपणे सांगितले.

गंगा वडिलांचे दुःखी बोल ऐकत होती. 'बाबा, आपण भारतभूमीतल्या लोकांना या संकटातून बाहेर यायला काही मदत करू शकतो का?'

'हो बाळा, एक उपाय आहे.'

'तो काय?'

'जर एखादी बर्फासारखी शुद्ध, पवित्र नि हिमासारखी शुभ्र कन्या होरपळलेल्या भारतभूमीवर पाण्याच्या रूपात गेली तर हे संकट आपोआपच दूर होईल.' हिमावतने गंगाकडे पाहात सांगितले.

गंगाला त्यांनी अप्रत्यक्षपणे सुचवलेली गोष्ट कळली; पण तिला आपले चमकदार रंगाचे घर सोडायची इच्छा नव्हती. तिने बाबांना सांगितले, 'मी कुठेही जाणार नाही.'

काही दिवसांनी हिमावत परत यात्रेला जाऊन आला. त्याच्या मांडीवर एक लहानशी मृत मुलगी होती. ''ती





तहानेनं मरण पावली आहे.'' त्याने गंगाला सांगितले.

त्या मृत बाळाकडे पाहून गंगाला रडू आले. 'पाण्यामुळे लहान मुलं जीव सोडत असतील तर मी जाईन भारतभूमीत.'' ती रडत रडत म्हणाली. आई-वडिलांनी तिला साश्रू नयनांनी निरोप दिला.


स्वतःच्या गुहेतून गंगा वाहत निघाली. वाहत वाहत ती दुष्काळाने कोरड्या, रखरखीत झालेल्या उत्तर भारतभूमीत येऊन पोहोचली. तहानलेली जमीन, निसर्ग, पशुपक्षी आणि माणसं या सर्वांनी अत्यंत आनंदाने तिचे स्वागत केले. त्या थंड, जीवनदायी पाण्याने त्या सर्वांची तहान भागली, त्यांचे जीव भागवले. गंगा आता त्यांची जीवनदात्री माता बनली.

गंगामाता- जीवन, शुद्धता आणि भरभराटीचे प्रतीक.

**सौ. रश्मी खानवेलकर, पुणे.**

❐

मित्रांनो, अमितच्या प्रत्येक फुग्यातील एक आकडा गायब झाला आहे, फुगा फुटायच्या आत शोधा पाहू तो....






# दिवाळी अंकानिमित्त बाल मित्रांसाठी स्पर्धा

*बॅटमॅन, स्पायडरमॅन, सुपरमॅन ..कोण आवडतो तुम्हाला?*

**बालमित्रांनो,**

तुम्हाला 'कॉमिक्स' वाचायला,बघायला आवडतात...

त्यातील हिरो, त्याच्या करामती, त्याची विशिष्ट ताकद, किती जबरदस्त असते ना! चित्र सुद्धा किती छान छान असतात...

त्यात काही सुपरहीरोही आहेत. ते तुम्हाला माहितच आहेत.

स्पायडरमॅन, सुपरमॅन, बॅटमॅन, आयर्न मॅन, साब्रामॅन, फ्लॅश, वंडरवुमन, फँटम, त्याचबरोबर मिकी माऊस, डोनाल्ड डक, टॉम अँड जेरी, मिस मेरी, शिन चॅन (हंगामा चॅनलवरील खोडकर आणि लबाड जपानी मुलगी,) हेही तुम्हाला आठवतील किंवा मराठीतील फास्टर फेणे.....गोट्या...

तुम्हाला हे सर्व कॉमिक्समधले हीरो आवडतात. तुम्ही त्याची पुस्तके वाचता. चित्रपट बघता...

यापैकी तुम्हाला जास्त कोण आवडतो? तो का आवडतो? त्याचा एखादा छानपैकी किस्सा तुम्हाला सांगता येईल का?

किंवा तुम्ही स्वत: सुपरहिरो कथारुपाने तयार करा. त्याची एक छान 'स्टोरी' तयार करा. आम्हाला ते अधिक आवडेल.

तुमच्या पत्रांपैकी छान छान पत्रे निवडून, त्यातील तीन पत्रांना आम्ही मस्तपैकी बक्षीस देऊ. **प्रत्येकी ५०० रूपयांची गोष्टींची पुस्तके..**

आहे ना मस्त मज्जा?

तर मग या सुपरहीरोंपैकी एका बद्दलची माहिती पत्ररूपाने पाठवा. पत्र चार-पाच पानांचे झाले तरी चालेल.

**पाठवायची मुदत -२० ऑगस्ट २००७.**

**पाठवायचा पत्ता - संपादक, मेहता मराठी ग्रंथ जगत, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०**

**चला तर मग लागा कामाला......**

# कर्मयोगी गाडगेबाबा

आज आपण एका महान समाजसेवकाची ओळख करून घेणार आहोत. त्याचं नाव डेबू!

"डेबू...?"

"हो हो डेबूच. आज सारा समाज त्यांना संत गाडगेबाबा ह्या नावानं ओळखतो."

संत गाडगेबाबा यांचा जन्म विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तहसीलमधल्या 'शेंडगाव' ह्या गावी झाला. जन्मदिवस होता २३ फेब्रुवारी १८७६ आणि वार होता बुधवार.

आईचे नाव सखुबाई आणि वडलांचं नाव झिंगराजी. व्यवसायानं परीट-धोबी.

गाडगेबाबांचा जन्म झाला त्या दिवशी गावात साखरपान वाटण्यात आले. लोकांनी मारुतीच्या पारावर नारळ फोडला. आई सखुबाईनं बाळाचं नाव डेबू ठेवलं.

डेबू दिसामासानं मोठा होऊ लागला. डेबूचे वडील झिंगराजी दारूचे भारी शौकीन. त्या दारूच्या नादात सावकाराचं कर्ज काढलं. सारी शेती सावकारानं गहाण ठेवून घेतली. अखेर झिंगराजी दारूच्या नशेतच देवाचा प्यारा झाला. डेबू... त्याची आई सखुबाई आपल्या माहेरी



दापोरा ह्या गावी डेबूला घेऊन आली.

दापूरा हे मूर्तिजापूर तालुक्यातील प्रमुख गाव. तिथं मूर्तिजापूरच्या तिडके पाटलाचं वजन व वर्चस्व. चंद्रभानजी डेबूचे मामा. गावातील लोकांची कापडं धुवावीत. त्या मोबदल्यात दोन भाकरी पदरात घ्याव्यात हा धंदा.

आपल्या मामाची शेती तिडके सावकारानं कर्जापोटी हडपली हे डेबूला कळले. तो चवताळला.

"सावकार, शेतात वखर तर घालून बघा. नाही तुमचा अन् तुमच्या माणसांचा खून केला तर हा डेबू नाही." तो गरजला,

"नाही तर म्हणावं- त्या माणसानं माझा तरी खून करावा- या समोर."

डेबूची सावकाराच्या गड्यासोबत तुफान हाणामारी झाली.

दर्यापूरच्या कोर्टात केस गेली. पैशाच्या जोरावर सावकार केस जिंकला आणि डेबू हरला. त्या रात्री डेबू रात्रभर झोपला नाही. रात्र अंधारी रातकिड्यांची किर्र... किर्र! दूरवरची कोल्हेकोई ऐकू येत होती. रात्र चढत होती तसा डेबू बेचैन होत होता. आतून बाहेरून तो हादरला होता.

एका रात्री डेबूने आपले घरदार सोडले.

डेबू गावोगावी हिंडू लागला. अंगावर चिंध्यांचा सदरा. दोन कानात दोन कवड्या. हातात एक गाडगं, दुसऱ्या

हातात काठी. कुठंही जावं, त्या घरचं काम करावं आणि आवाज द्यावा,

"माय, लाकडं फोडले, आणखी काई काम असीन तर सांग."

"नाही रे बाबा. आत्ता काही नाही."

"जातो मंग मी."

"तस्सा जाऊ नकोस. थोडंसं जेवून जा."

त्या माऊलीनं, एक भाकर त्यावर भाजी आणून द्यावी. बाबांनी हातावरच ती भाकरी खावी. गाडग्यातलं पाणी प्यावं असा नित्याचा दिनक्रम सुरू झाला.

इकडे घरची मंडळी शोधाशोध करून थकली.

अखेर ऋणमोचनच्या मुदलेश्वराच्या दरवर्षी भरणाऱ्या यात्रेत पौष महिन्यातली या यात्रेत सर्वांची भेट झाली. बाबाचं मन वळवायचा प्रयत्न झाला. पण एकदा समुद्रात गेलेला मासा पुन्हा डबक्यात कधीही येत नसतो. तसंच बाबांचं झालं. ते पुन्हा बायकामुलांत आलेच नाहीत. गावोगावी कीर्तनं करू लागले. अगदी सरळ, सोप्या भाषेत.

"मायबापहो, माझी एकच इनंती हाय की दारुले हात बी लावू नका. ह्या दारुपाई संसाराचा नाश होते. आपल्या शरीराचा नाश होते. ऐकसाल ना माई गोठ?"

"हो!" श्रोते लोक एका सुरात म्हणत.

"शाब्बास गडे हो- आणखी एक गोठ करा. आपल्या लेकराईले शाळा शिकवा. अडाणी राहू देऊ नका. तसंच सावकाराचं कर्ज काढू नका. दिवाळी-दसरा गरिबीतच करा. पण कर्ज काढू नका. काढसाल का कर्ज?"

"नाहीऽऽ" लोकांचा प्रतिसाद.

"मायबापहो- देवाला-देवीला नवस करून कोंबडं-बकरं कापू नका. त्याचा बळी देऊ नका. अशानं देव पावत नाही. आजारपण बिमारी दूर होत नाही. त्यासाठी औशीदपाणी घ्या. उगाच निष्पाप जीवाचा बळी देऊ नका. मायबापहो, एवढीच माई हात जोडून इनंती हाय. आत्ता बोला, गोपाला, गोपाला... देवकीनंदन गोपाला. आणि टाळयांचा कडकडाट नामगजर सुरू व्हायचा. आणि कीर्तन संपायचं.

बाबांनी अनेक ठिकाणी नदीवर घाट बांधले. तीर्थाच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या. गोरगरिबांची लग्नं लावून दिली. अशा कामात ते स्वतः राब-राब राबायचे.

जनता जनार्दनांची सेवा करता करता बाबाचे शरीर साथ देईनासे झाले. हातापायात पहिल्यासारखी ताकद राहिली नाही. ते आजारी पडू लागले. त्यांचा आजार वाढला. त्यांच्या शिष्यांनी त्यांना अमरावतीच्या इर्विन दवाखान्यात भर्ती केले. डॉक्टर औषधोपचार करीत होते. पण बाबांना आराम नव्हता.

शेवटी शिष्यांनी बाबांना नांगरवाडीला नेण्याचे ठरविले. बाबांना मोटारीत झोपवले. सारे शिष्य 'गोपाला-गोपाला देवकीनंदन गोपाला'चा गजर करू लागले. मोटार धावू

लागली.

वलगाव आले. पेढी नदीचा पूल आला. पुलावरून गाडी जाऊ लागली आणि अचानक बाबांनी डोळे पांढरे केले.

"बाबाऽऽ" सारे शिष्य ओरडले. पण बाबांनी एक उचकी देऊन आपला प्राण सोडला. तो दिवस होता २० डिसेंबर १९५६.

अमरावती येथे गाडगेबाबांचे मोठे समाधी मंदिर आहे.

बाबांच्या संदेशाची जाणीव लोकांपर्यंत पोहोचवण्याचं काम अविरत चालू असते. आजही! संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या रूपात.

**- पुरुषोत्तम रोहणकार, नांदेड**

## विज्ञान प्रयोग


**चला, प्रयोग करू या!**


| | | |
|---|---|---|
| उर्जा | मीना किणीकर | २५ |
| उष्णता | मीना किणीकर | २५ |
| अन्न | मीना किणीकर | २५ |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २५ |
| हवा | मीना किणीकर | २५ |
| पदार्थ | मीना किणीकर | २५ |
| अवकाश | मीना किणीकर | २५ |
| हवास्थिती | मीना किणीकर | २५ |
| गती : चलन | मीना किणीकर | २५ |
| ध्वनी | मीना किणीकर | २५ |
| मोजमापे | मीना किणीकर | २५ |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

पोस्टेज खर्च वेगळा




## ओळखा पाहू



'द फादर ऑफ कम्युनिझम' या सार्थ बिरूदाने ही व्यक्ती ओळखली जाते.

साम्यवाद आणि अर्थशास्त्राला अनुसरून यांनी लिहीलेले दोन ग्रंथ आजही प्रमाणभूत मानले जातात.

हे कोण आणि यांनी लिहीलेले दोन ग्रंथ कोणते हे आम्हास २० तारखेपर्यंत कळवा.

विजेत्यास १०१रु.चे रोख पारितोषिक दिले जाईल.

( संपूर्ण पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक आवश्यक )

**जुलै** अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

नामवंत प्रशासक - **कै. श्री. चिंतामणराव तथा सी. डी. देशमुख.**

स्पर्धेच्या विजेत्या - **सौ. सुमन टिळक,राजवाडा,सांगली.**

**अचूक उत्तर पाठवणारे वाचक**

ऋतुराज कुलकर्णी, एन.एच.कुलकर्णी, नेहा आरवाडे - सांगली. प्रज्ञा बारई - बुलढाणा, पंडित पानवलकर, डॉ. विनायक मिराशी, श्री. का. कुलकर्णी, वसुधा परांजपे, सुजाता मारुलकर, प्रताप गोगटे, शिरिष पटवा, सुनील पांडे, मेधा शर्मा, स्नेहलता मालेगावकर, शरदचंद्र पटवर्धन, हरिभाऊ शिंदे, केदार कुलकर्णी, पंडित हिंगे, प्र. द. काळुसकर- पुणे.,जी.एस.मुळे -मध्यप्रदेश,